रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I वर्ष ८९ I अंक २९६ I पृष्ठे १० ▌ RGD/016/2026-28 www.krushival.in

### खरातवर १२वा गुन्हा दाखल

**नाशिक :** भविष्य सांगण्याच्या नावाखाली महिलांचे शोषण केल्याच्या आरोपांमुळे चर्चेत असलेल्या भोंदू अशोक खरात याच्याविरोधात सरकारवाडा पोलीस ठाण्यात एका व्यापाऱ्याने फसवणुकीची तक्रार दिली असून, हा त्याच्यावर दाखल झालेला बारावा गुन्हा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, खरातने एका कांदा व्यापाऱ्याला प्लॉट व्यवसायात गुंतवणुकीचे आमिष दाखवले. त्याने व्यापाऱ्याकडून ६० लाख रुपये किमतीची जागा केवळ २२ लाख २५ हजार रुपयांत वृद्धाश्रमाच्या नावावर घेतली. त्यानंतर चांगल्या ठिकाणी दुसरी जागा मिळवून देण्याचे आश्वासन देत तब्बल ८५ लाख रुपये उकळले.

# कृषीवल

रायगड, रविवार, दि. ५ एप्रिल २०२६

किंमत ४ ₹

आईस क्यूब फॅक्टरी
भाड्याने देणे आहे
- मुख्य वैशिष्ट्ये -
पूर्णतः कार्यान्वित आईस क्यूब प्लांट
शुद्ध पाण्यासाठी RO सिस्टीम कार्यरत
३ फेज इंडस्ट्रियल इलेक्ट्रिकल कनेक्शन
हक्काचा आणि मुबलक पाणी पुरवठा (Water Source)
तयार माल साठवण्यासाठी १ टन क्षमतेचे कोल्ड स्टोरेज
प्रस्थापित डिस्ट्रिब्युशन नेटवर्क (वितरण व्यवस्था)
संपर्क: 98509 80530 / 75078 01905

## वेधक

### सुनेत्रा पवारांना काँग्रेसचे आव्हान

**बारामती :** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत महायुतीकडून सुनेत्रा पवार यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली असताना काँग्रेसनेही या लढतीत उतरायचा निर्णय घेत त्यांना थेट आव्हान दिले आहे. ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी महायुतीकडून प्रयत्न सुरू असले तरी काँग्रेसने उमेदवार देणार असल्याची भूमिका स्पष्ट केली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बारामतीसह राहुरी मतदारसंघासाठी उमेदवारांची चाचपणी पूर्ण झाल्याचे सांगितले. राज्य व राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांशी चर्चा सुरू असून बारामतीसाठी काँग्रेसचा उमेदवार लवकरच जाहीर केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, बिनविरोध निवडीबाबत महायुतीकडून कोणताही अधिकृत संपर्क झालेला नसल्याचेही सपकाळ यांनी सांगितले.

### एलफिन्स्टन पूल इतिहासजमा

**मुंबई :** मुंबईच्या परळ-प्रभादेवीला जोडणारा ११३ वर्षे जुना एलफिन्स्टन पूल अखेर जमीनदोस्त होत आहे. ब्रिटिशकालीन वारसा, स्थानिकांच्या आठवणी आणि शहराच्या विकासाचा साक्षीदार असलेला हा पूल आता नव्या युगाला जागा करून देत आहे. मात्र, हा पहिलाच प्रसंग नाही. मुंबईत याआधीही अनेक जुने पूल पाडून नव्याने उभारण्यात आले आहेत. १९१३ साली बांधलेला हा पूल परळ आणि प्रभादेवीदरम्यान मध्य व पश्चिम रेल्वे मार्गावर महत्त्वाचा दुवा होता. लोअर परेल, लालबाग, दादर, नायगाव या भागांना जोडत, औद्योगिक मुंबईच्या वाढीत त्यानं मोठी भूमिका बजावली आहे.

### शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख

**मुंबई :** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे घेण्यात आलेल्या एलएलबी तृतीय वर्षाच्या ऑनलाइन परीक्षेत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अनादरपूर्वक उल्लेख झाल्याचा प्रकार समोर आल्याने संताप व्यक्त केला जात आहे. २ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या परीक्षेत सामान्य ज्ञान विभागात ‘शिवाजीच्या मंत्रिमंडळाचे नाव काय होते?’ असा प्रश्न विचारण्यात आला होता. याप्रकरणी दौंडचे आमदार राहुल कुल यांनी आक्षेप नोंदवत संबंधित दोषींवर तातडीने कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या आयुक्तांना पत्र पाठवून प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या समितीवर कारवाईची मागणी केली आहे.

# खड्ड्यांचा सापळा पुन्हा जीवघेणा!

- मुरूडनंतर चौलमध्ये मोटार सायकलस्वार खड्ड्यात पडून गंभीर
- ठेकेदाराचा निष्काळजीपणा उघड, रेवदंडा पोलिसात गुन्हा दाखल

**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।।**

मागील महिन्यात मुरूड येथे वनरक्षक सूरज सारंगे यांचा रस्त्यातील खोदलेल्या खड्ड्यात मोटारसायकलसह पडून दुर्दैवीरित्या मृत्यू झाला होता. त्या घटनेची धूळ अजून खाली बसलेली नसतानाच चौल-वावे मार्गावर तसाच धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे उघड्या ठेवलेल्या आठ ते दहा फूट खोल खड्ड्यात मोटारसायकल कोसळून ३० वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याचा जीव धोक्यात आहे.

चौल चौकी ते वावे रस्त्याच्या कामात सुरू असलेल्या निष्काळजीपणामुळे हा अपघात घडला. रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत चौल (भोवाळे) बीबी गावाजवळ मोरीसाठी खोदलेल्या खोल खड्ड्यात सागवाडी येथील रामनाथ जगन्नाथ फसाळा (३०) हे त्यांच्या दुचाकीसह कोसळले. या अपघातात त्यांच्या शरीरात लोखंडी रॉड घुसल्याने हनुवटी, ओठ, कपाळ, नाक व तोंडावर गंभीर दुखापती झाल्या असून, त्यांच्यावर सध्या अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे, घटनास्थळी कोणतीही सुरक्षा व्यवस्था नव्हती. ना बॅरिकेट्स, ना सूचना फलक, ना प्रकाशयोजना. त्यामुळे रामनाथ यांना हा खड्डा दिसून आला नाही, असे सांगितले जाते. ठेकेदारांनी मूलभूत सुरक्षेचे नियमही पाळले नाहीत, यामुळेच हा जीवघेणा अपघात घडल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे.

याप्रकरणी फिर्यादी जयश्री जगन्नाथ फसाळा यांच्या तक्रारीवरून रेवदंडा पोलीस ठाण्यात आर.के. मदानी अँड कंपनी आणि एस. महेश्वरी अँड कंपनी (मुंबई) या ठेकेदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, हा एकच अपघात नसून, संपूर्ण मार्गावरील अर्धवट कामे, संथ गती, अपुरी सुरक्षा व्यवस्था आणि पान २ वर



## जिल्हा परिषदेची कुत्र्यांचे निर्बीजीकरण

# मोहीम बारगळली

## ■ निविदांचा गुंता, दोन वर्षांत कामच नाही

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**


मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या दहशतीला आळा घालण्यासाठी आणि रेबीजचा धोका कमी करण्यासाठी जिल्हा परिषदेनं दोन वर्षांपूर्वी मोठ्या गाजावाजात निर्बीजीकरण, शस्त्रक्रिया आणि श्वानदंश प्रतिबंधक लसीकरणाचा उपक्रम सुरू केला होता. मात्र, निविदांच्या गुंत्यात अडकलेल्या या योजनेला प्रशासनानेच बगल दिल्याने तो पूर्णपणे अपयशी ठरला आहे. आता पुन्हा अर्थसंकल्पात २५ लाखांची तरतूद करण्यात आली असली तरी यावेळी तरी हा उपक्रम मार्गी लागणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोकाट कुत्र्यांचे टोळके सर्वत्र दिसत असून, अनेकदा हे कुत्रे एकत्रित हल्ले करत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये जीवितहानीची भीती वाढली आहे. दुचाकीस्वारांनाही कुत्र्यांमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. गावागावांत, वाड्यावस्त्यांमध्ये कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढत असताना स्थानिक प्रशासन मात्र ठोस उपाययोजना करण्यात अपयशी ठरले आहे.

परिणामी, लहान मुलांसह नागरिकांना सतत भीतीच्या छायेत वावरावे लागत आहे.जानेवारी २०२२ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत तब्बल ७,२५५ जणांवर मोकाट कुत्र्यांनी हल्ले केले. यापैकी १,२०४ जणांना रुग्णालयात दाखल करावे लागले, तर २,९७२ जणांवर बाह्यरुग्ण विभागात उपचार करण्यात आले, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे.

या पार्श्वभूमीवर २०२४ मध्ये जिल्हा परिषदेने निर्बीजीकरण आणि लसीकरण मोहिमेचा निर्णय घेतला होता. पुणे येथील युनिव्हर्सल ॲनिमल वेलफेअर या संस्थेला हे काम देण्यात आले. सेस फंडातून २५ लाख रुपयांची तरतूद करून २५ फेब्रुवारी २०२४ पासून मोहिमेला सुरुवात झाली. पेण येथे केंद्र उभारून कुत्र्यांना पकडणे, त्यांचे निर्बीजीकरण, शस्त्रक्रिया आणि रेबीज प्रतिबंधक लसीकरण अशी प्रक्रिया राबविण्यात आली.

प्रारंभी अलिबाग तालुक्यातील चेंढरे, चौल, थळ आणि परहूर ग्रामपंचायतींमध्ये काम हाती घेण्यात आले. मात्र केवळ २६० कुत्र्यांपुरतेच निर्बीजीकरण व लसीकरण होऊ शकले. २५ लाखांपैकी फक्त ३.२९ लाख रुपये खर्च झाले आणि मार्चअखेर ठेका संपताच मोहिमेला ब्रेक लागला. उर्वरित निधी पडून राहिला, तर पुढील निविदा प्रक्रियेलाही अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. निवडणुकीच्या गडबडीत विषय मागे पडला आणि दोन वर्षे उलटूनही प्रशासनाने याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले.



### प्रतीक्षा कायमच

प्रशासकीय राजवट संपून राजकीय सत्ताकाळ सुरू झाला असला तरी कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाची प्रतीक्षा मात्र संपलेली नाही. नुकत्याच सादर झालेल्या १७५ कोटींच्या अर्थसंकल्पात पुन्हा २५ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, विषय समितीच्या मंजुरीनंतरच निविदा प्रक्रिया आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होणार असल्याने गावपातळीवरील मोहिमेला अजून काही महिने वाट पाहावी लागणार आहे. त्यामुळे हा उपक्रम केवळ कागदावरच राहणार का, अशी शंका अधिक गडद होत आहे.

# कार विहिरीत कोसळून नऊ जणांचा मृत्यू

## मध्यरात्री नाशिकमध्ये भीषण अपघात

**। नाशिक । प्रतिनिधी ।**

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी शहरात शुक्रवारी रात्री एक काळजाचा थरकाप उडवणारी घटना घडली. शिवाजीनगर परिसरातील राजू राजे यांच्या शेतातील विहिरीत एक कार (एमएच १५ जेएस १०५३) चालकाचे नियंत्रण सुटल्याने कोसळली. या दुर्दैवी अपघातात कारमधील नऊ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शुक्रवारी रात्री दहा वाजताच्या सुमारास ही कार दिंडोरीमार्गे जात असताना शिवाजीनगर भागात अचानक चालकाचे कारवरील नियंत्रण सुटलं. नियंत्रण सुटलेली कार थेट रस्त्याशेजारील राजू राजे यांच्या शेतातील विहिरीत जाऊन कोसळली. विहीर पान २ वर



### चिमुकलीवर अत्याचार

**पुणे :** नाशिकमधील भोंदू अशोक खरातने अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याच्या संतापजनक घटनेनं महाराष्ट्र हादरला असतानाच बाल लैंगिक अत्याचाराच्या घटनाही काही केल्या कमी होताना दिसून येत नाही. पिंपरी-चिंचवड शहरातील मोशी परिसरात माणुसकीला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. विनायकनगर येथील शिवशंभो कॉलनीमध्ये एका ४० वर्षीय नराधमाने सात वर्षांच्या निष्पाप चिमुरडीवर लैंगिक अत्याचार केल्याचा पान २ वर

### वरवठणेत शाळकरी मुलीची आत्महत्या

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील वरवठणे बौद्धवाडी येथे १४ वर्षे ११ महिने वयाच्या शाळकरी मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. ही घटना ४ एप्रिल रोजी मध्यरात्री सुमारे १२.४५ वाजण्याच्या सुमारास समोर आली असून, संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित मुलगी मराठी माध्यमिक शाळेत इयत्ता नववीत शिक्षण घेत होती. तिची मोबाईलद्वारे दोन अनोळखी मुलांशी ओळख झाली होती. घटनेच्या दिवशी ती त्या मुलांशी बोलत असल्याचे तिच्या आईच्या लक्षात आले. यावरून आई रागावेल किंवा मारेल, या भीतीतून मुलीने घरातील खोलीत साडीच्या साहाय्याने गळफास घेतल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनेनंतर कुटुंबियांनी तिला पान २ वर



# सेवानिवृत्त पोलीस आंदोलनाच्या पवित्र्यात

- वेतन निश्चिती कार्यवाहीसह अन्य मागण्या
- जिल्ह्यात दप्तर दिरंगाईविरोधात निषेधाचा इशारा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

इतर जिल्ह्यांत वेतन निश्चितीची कार्यवाही पूर्ण होत असताना रायगड पोलीस दलातील प्रशासन मात्र निष्क्रिय असल्याचा आरोप करत सेवानिवृत्त पोलिसांनी आंदोलनाचा पवित्रा उचलला आहे. पोलीस महासंचालकांच्या स्पष्ट आदेशानंतरही जिल्ह्यात कोणतीही हालचाल न झाल्याने नाराजी तीव्र झाली आहे. दप्तर दिरंगाईविरोधात निषेध नोंदवण्यासाठी येत्या १० एप्रिल रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर धरणे आंदोलन छेडण्यात येणार असल्याची माहिती निवृत्त पोलीस कल्याणकारी संस्था रायगडने दिली आहे.

संस्थेच्या निवेदनानुसार, रायगड जिल्ह्यात सुमारे ६५० सेवानिवृत्त पोलीस अंमलदार आहेत. पोलीस हवालदार पदोन्नतीवेळी एक वेतनवाढ देऊन वेतन निश्चिती करावी, तसेच पडताळणी पथकाकडून ती प्रमाणित करून घ्यावी, असे स्पष्ट आदेश १७ मार्च २०२२ रोजी गृह विभागाने दिले होते. यानंतर २८ मार्च २०२२ रोजी पोलीस महासंचालक कार्यालयाने सर्व घटक प्रमुखांना शासन आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना केल्या. तरीदेखील रायगड पोलीस दलाकडून आजतागायत कोणतीही कार्यवाही करण्यात पान २ वर

### अर्जाला केराची टोपली

रायगड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आयुष्य झिजवणाऱ्या पोलिसांनाच सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या हक्कासाठी दारोदार भटकंती करावी लागत असल्याचे चित्र समोर आले आहे. वेतनवाढीस पात्र असलेल्या ८८ सेवानिवृत्त पोलीस अंमलदारांनी डिसेंबर २०२५ पर्यंत पोलीस अधीक्षक कार्यालयात अर्ज दाखल केले आहेत. मात्र, त्यांच्या अर्जांची साधी दखलही घेतली गेली नसल्याचा आरोप निवृत्त पोलीस कल्याणकारी संस्थेकडून करण्यात आला आहे. अनेक वर्षे सेवा बजावून निवृत्त झालेल्या पोलिसांच्या मागण्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र असून, त्यांच्या अर्जांना अक्षरशः केराची टोपली दाखवण्यात आल्याची तीव्र भावना सेवानिवृत्त पोलिसांकडून व्यक्त होत आहे.

### नागावमध्ये बंगल्याजवळ आग

पर्यटकांना सुखरुप काढण्यास यश

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नागाव येथील एका बंगल्याजवळ असलेल्या जनरेटरला आग लागली. या आगीत जनरेटरसह खिडक्या, स्विमींग पूलचे फिल्टर आदी जळून नुकसान झाले. या बंगल्यामध्ये आलेल्या पर्यटकांना सुखरूप काढण्यास यश आले. स्थानिकांसह अलिबागच्या अग्नीशमन दलाच्या मदतीने ही आग आटोक्यात आणण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पनवेल येथील गायकवाड नामक व्यक्तीचा नागावमध्ये मोठा बंगला अर्थात व्हीला आहे. हा बंगला पर्यटकांना राहण्यासाठी दिला जातो. शनिवार पान २ वर

# सिडकोचा वसाहत अधिकारी अडचणीत

- एक कोटी ९४ लाखांच्या अपसंपदाप्रकरणी कारवाई
- नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे छापे

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सिडकोमधील लाचखोरीच्या प्रकरणांवर कारवाई सुरू असतानाच आता अपसंपदा प्रकरणामुळे वसाहत अधिकारी सागर तापडिया अडचणीत सापडले आहेत. त्यांनी उत्पन्नापेक्षा तब्बल १ कोटी ९४ लाख ४७ हजार ९०५ रुपयांची अपसंपदा जमा केल्याचे उघड झाले असून, ही रक्कम त्यांच्या कायदेशीर उत्पन्नाच्या १७३.३६ टक्के असल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे. नवी मुंबईच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ही कारवाई केली आहे.



सागर मदनलालजी तापडिया हे पनवेल येथील सिडको पान २ वर

Ayurvedic KHO-GO ®
TRUSTED SINCE 1961
६५ वर्षांचा विश्वास, खोकला जाणार हमखास.
खो-गो गोळ्या घ्या आणि खोकल्यावर त्वरित आराम मिळवा

कफयुक्त खोकला
कोरडा खोकला
घशातील खवखव
घसा दुखणे
इत्यादीवर गुणकारी
खोकल्याच्या त्रासातुन मुक्त होण्यासाठी आजच घ्या आयुर्वेदिक खो-गो
सर्व केमिस्ट मध्ये उपलब्ध
अहिल्या आयुर्वेदिक औषधालय, मुंबई-६३
7304285868
www.khogo.in
65 YEARS OF TRUST

# पीएनपीचे प्रा. मिलिंद घाडगे यांचा गौरव

## महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्रदान



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आंतरराष्ट्रीय मानवाधिकार राजदूत संघटना, पोलीस मित्र माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण सेना, युवा महाराष्ट्र फाउंडेशन या अधिकृत राष्ट्रीय संघटनेच्या माध्यमातून दिला जाणारा ‘महाराष्ट्र रत्न’ पुरस्कार प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. मिलिंद घाडगे यांना देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रा. मिलिंद घाडगे हे अलिबाग येथील पीएनपी वरिष्ठ महाविद्यालयात इतिहास विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत, तसेच एक उदयोन्मुख कवी आणि साहित्यिक म्हणून पान २ वर

## महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाची तक्रार | स्वतंत्र लेबल लावण्याची मागणी

# कर्नाटकी आंब्याचे हापूसवर अतिक्रमण

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

कोकणचा हापूस आंबा आपल्या खास चव, सुगंध आणि दर्जामुळे देश-विदेशात लोकप्रिय आहे. मात्र, हापूससारखा दिसणारा कर्नाटक तसेच दक्षिणेकडील आंबा बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात दाखल होत असल्याने हापूसवर अक्षरशः अतिक्रमण होत असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाने केला आहे. ग्राहकांची दिशाभूल रोखण्यासाठी प्रत्येक राज्यातील आंब्याला स्वतंत्र लेबल लावण्याची मागणी संघटनेचे राज्याध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीकडे निवेदनाद्वारे केली आहे.



### ग्राहकांची फसवणूक थांबवावी

हापूससारखा दिसणारा इतर राज्यांतील आंबा बाजारात येत असल्याने ग्राहकांना खरा-खोटा आंबा ओळखणे कठीण जात आहे. यामुळे ग्राहकांची फसवणूक तर होतच आहे, पण कोकणातील हापूस उत्पादकांनाही मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. त्यामुळे शासन आणि बाजार समित्यांनी तातडीने हस्तक्षेप करून लेबलिंग सक्तीचे करावे, अशी मागणी जोर धरत आहे.

रायगडसह संपूर्ण कोकण पट्ट्यात हापूस आंब्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. कोकणातील हापूस चवीला गोड, रसाळ आणि दर्जेदार असल्याने स्थानिकांसह राज्य, देश आणि परदेशातील ग्राहकांकडून त्याला मोठी मागणी असते. कोकणात हजारो एकरांवर पान २ वर

> “कोकणचा हापूस हा केवळ फळ नाही, तर तो येथील शेतकऱ्यांच्या अर्थकारणाचा कणा आहे. हापूससारखा दिसणारा इतर आंबा बाजारात येऊन त्याची प्रतिमा मलिन होत असेल, तर ते थांबवणे गरजेचे आहे. प्रत्येक आंब्याला स्पष्ट लेबल लावल्यास ग्राहकांचा विश्वास टिकेल आणि शेतकऱ्यांचे नुकसानही टळेल.”
> – चंद्रकांत मोकल

झेरॉक्स सेंटरमध्ये कामासाठी जागा भरणे आहे
उमेदवार - महिला
शिक्षण - १२ वी पास
आकर्षक पगार
संपर्क - सुखसागर भवन दुसरा माळा, BVM टॉकीजच्या मागे, अलिबाग, रायगड ४०२ २०१
महेश भोसले : 8483999229

# स्मार्ट मीटर बसविण्यासाठी दादागिरी


## ग्राहकांना नोटीसांची भीती

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

स्मार्ट मीटर बसविणे ग्राहकांवर सक्तीचे नसल्याचे केंद्र व राज्य शासनाकडून स्पष्ट करण्यात येत असतानाच ठेकाप्राप्त कंपन्यांकडून मात्र दबाव टाकून हे मीटर बसविण्याचे प्रकार सुरू असल्याचे समोर आले आहे. कर्जत तालुक्यातील ममदापूर ग्रामपंचायत हद्दीतील गोकुळधाम सोसायटीमध्ये नागरिकांच्या विरोधाला न जुमानता काही विंगमध्ये स्मार्ट मीटर सक्तीने बसविण्यात आल्याची घटना उघड झाली आहे.

कर्जत तालुक्यात स्मार्ट मीटरविरोधात कर्जत संघर्ष समितीच्या माध्यमातून आंदोलन, उपोषणे करण्यात आली असून महावितरण विभागाला वारंवार निवेदनेही देण्यात आली आहेत. संपूर्ण तालुक्यातून नागरिकांचा तीव्र विरोध असतानाही ठेकाप्राप्त कंपन्यांकडून दबाव टाकून मीटर बसविण्याचे प्रकार सुरूच असल्याचे दिसून येत आहे.

दि. ४ एप्रिल रोजी गोकुळधाम सोसायटीमध्ये स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरू करण्यात आले. हा प्रकार लक्षात येताच रहिवाशांनी संबंधित कर्मचाऱ्यांना जाब विचारला. त्यावेळी सोसायटी कमिटीला शासनाचा जीआर व नोटीस देण्यात आल्याचे कंपनीच्या प्रतिनिधींनी सांगितले. मात्र रहिवाशांनी अशी कोणतीही नोटीस किंवा माहिती कमिटीमार्फत देण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट केले. तसेच या विषयावर कोणतीही सर्वसाधारण सभा घेण्यात आलेली नसल्याचेही त्यांनी नमूद केले.



(छायाचित्र: संजय गायकवाड)

रहिवाशांनी जीआर दाखवण्याची मागणी केल्यावर कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी २ जून २०२३ च्या केंद्र शासनाच्या जीआरची प्रत दाखवत ''ही महावितरणची मालमत्ता असून, तुम्हाला विरोध करता येणार नाही,'' असा दम दिला. तसेच २४ तासांत नोटीसला उत्तर द्यावे लागेल, अन्यथा कारवाई होईल, अशी भीती दाखवत मीटर बसविण्याचे काम सुरूच ठेवले.

दरम्यान, रहिवाशांनी मुख्यमंत्री यांच्या अधिवेशनातील वक्तव्याचा दाखला देत स्मार्ट मीटर सक्तीने बसवू नयेत, असे स्पष्ट केले. कर्जत संघर्ष समितीचे वकील कैलास मोरे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून कंपनीच्या कर्मचाऱ्यांशी चर्चा करूनही परिस्थितीत बदल झाला नाही. महावितरणच्या पेण येथील अधिकाऱ्यांशी संपर्क साधूनही काम थांबवले गेले नाही.

शेवटी नेरळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधल्यानंतर कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी काम थांबवून रहिवाशांना नोटीस देण्याचे सांगितले व २४ तासांत उत्तर देण्याची सूचना देत तेथून माघार घेतली. दरम्यान, राज्य विधिमंडळात मुख्यमंत्री यांनी स्मार्ट मीटर ग्राहकांच्या संमतीशिवाय बसवता येणार नाहीत, असे स्पष्ट केले आहे. तसेच २ एप्रिल २०२६ रोजी लोकसभेत केंद्रीय उर्जामंत्री मनोहरलाल यांनीही स्मार्ट व प्रीपेड मीटर बसविणे अनिवार्य नसल्याचे सांगितले होते. तरीही ठेकाप्राप्त कंपन्यांकडून सक्तीने मीटर बसविण्याचे आदेश कोणाकडून दिले जात आहेत, असा संतप्त सवाल गोकुळधाम सोसायटीतील रहिवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

# साळाव पुलावरून अवजड वाहतूक सुरूच

## पुलाच्या सुरक्षिततेचा प्रश्‍न ऐरणीवर



**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

साळाव पुलावरून सुरू असलेल्या अवजड वाहतुकीमुळे पुलाच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रवासीवर्गातून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

गेल्या दोन-तीन महिन्यांपासून रेवदंडा परिसरातील कुंडलिका खाडीमध्ये रो-रो सेवेसाठी भराव टाकणे आणि जेट्टी उभारण्याचे काम सुरू आहे. या कामासाठी लागणाऱ्या साहित्याची वाहतूक प्रामुख्याने रात्रीपासून पहाटेपर्यंत साळाव पुलावरून मालवाहतूक ट्रकद्वारे केली जात आहे. मात्र, सुमारे ३५ ते ४० वर्षे जुना असलेला हा पूल एवढ्या मोठ्या प्रमाणातील अवजड वाहतूक सहन करू शकणार नाही, अशी भीती स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाने यापूर्वीच या पुलावरून अवजड वाहतुकीस बंदी घातल्याचे सांगितले जाते. तरीही २० ते २४ टन क्षमतेचे ट्रक आणि काही ठिकाणी ३५ ते ४० टन माल घेऊन दहा चाकी ट्रक पुलावरून वाहतूक करत असल्याचा आरोप प्रवासीवर्ग करत आहे.

अलीकडेच पुलाची दुरुस्ती व देखभाल करण्यात आली होती. त्या काळात अवजड वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली होती. काम पूर्ण झाल्यानंतर केवळ १२ टन क्षमतेपर्यंतच्या वाहनांनाच परवानगी देण्यात आली होती. मात्र, सध्या या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे. अलिबाग, मुरूड आणि रोहा या तीन तालुक्यांना जोडणारा साळाव पूल हा वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. या पुलामुळेच मुरूड तालुका पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित झाला आहे. त्यामुळे पुलाला धोका निर्माण झाल्यास पर्यटनावर तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. यामुळे साळाव पुलावरून सुरू असलेली अवजड वाहतूक तात्काळ बंद करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि प्रवासीवर्गाकडून जोर धरत आहे.

# रायगड गौरव संमेलनात राज्यातील विविध क्षेत्रातील नामवंतांचा सन्मान

## लागिरं झालं जी फेम संतोष पाटील, कामगार नेते राज पार्टेची प्रमुख अतिथी



(छायाचित्र: शैलेश पालकर)

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

राज्यातील विविध क्षेत्रातील तब्बल ४२ नामवंतांचा सन्मान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व आई फाऊंडेशन आयोजित स्वराज्य भूमी रायगड गौरव संमेलनात करण्यात आला.

याप्रसंगी लागिरं झालं जी फेम संतोष पाटील आणि मनसेचे कामगार नेते राज पार्टे यांच्यासह संमेलनाध्यक्ष विनोद मोरे व संमेलनाध्यक्ष कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, रायगड जिल्हा अध्यक्ष राकेश खराडे, स्वागताध्यक्ष डॉ. बी.एन. खरात, उद्योजक संचालक उदय वाघेरे आदी मान्यवरांच्या हस्ते रायगड जिल्ह्यातील तसेच कोकणासह राज्यातील विविध क्षेत्रातील नामवंतांचा सत्कार महाड नांगलवाडी फाट्याजवळील सावित्रीपुलालगतच्या हॉटेल फाऊंटेन इनमध्ये करण्यात आला. प्रारंभी स्वागताध्यक्ष डॉ.बी.एन. खरात यांनी, स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतीय संविधानकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रयतेसाठीच्या कार्याची भूमी असलेल्या महाड तालुक्यात राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर महिला व पुरूषांचा सन्मान होण्यासाठी योग्य स्थळ असल्याने या स्वराज्य भूमी रायगड गौरव संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याची पार्श्वभूमी स्पष्ट केली.

याप्रसंगी पोलादपूरचे ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांना द ग्रेट जर्नालिझम आयकॉन पुरस्कार, कामगार नेते राज पार्टे यांना छ.शिवराय कर्तृत्वभूषण पुरस्कार, ग्रामपंचायत अधिकारी अनिल पवार यांना आदर्श ग्रामपंचायत सेवा पुरस्कार, ज्येष्ठ समाजसेविका कांचन बुटाला यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार, डॉ. विनोद मोरे यांना भारत समाज गौरव पुरस्कार, कृषीनिष्ठ शेतकरी भगवान अहिरे, आदर्श सरपंच पुरस्कार प्रमोद चव्हाण यांना तसेच अन्य विविध क्षेत्रातील नामवंतांना देण्यात आला. यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांना द ग्रेट जर्नालिझम नॅशनल आयकॉन पुरस्कार समृध्दी प्रकाशनचे संस्थापक आणि स्वागताध्यक्ष डॉ.बी.एन. खरात यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी पुरस्कार विजेत्यांतर्फे कांचन बुटाला यांनी, पोलादपूर तालुक्यात प्राथमिक शिक्षणापूर्वीच्या अंगणवाड्या आणि बालवाड्यांच्या उपलब्धतेसाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली, तर राज पार्टे यांनी राज्यातील विविध क्षेत्रातील नामवंतांसमोर झालेला सत्कार महत्त्वपूर्ण वाटत असून, समाजातील या नामवंतांना अशा पुरस्कारामुळे अधिक उत्साह प्राप्त होत असल्याचे सांगितले.

# कळंबोली सर्कल येथे जलवाहिन्यांना गळती

**पनवेल :** मुंब्रा-पनवेल महामार्गावरील कळंबोली सर्कल परिसरात एमजेपीच्या जलवाहिन्यांना मोठ्या प्रमाणात गळती लागल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या गळतीमुळे दररोज हजारो लिटर पाणी रस्त्यावर वाहून जात असून पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे. विशेष म्हणजे, या वाहिन्यांमधून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा वापर परिसरातील ट्रक चालक अंघोळीसाठी करताना दिसत आहेत. तसेच, काही कँटिंग चालक व स्थानिक व्यावसायिक देखील हेच पाणी वापरत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे पाण्याचा गैरवापर उघडपणे सुरू असल्याचे स्पष्ट होते. अधिक चिंताजनक बाब म्हणजे काही टँकर मालक या गळतीच्या पाण्याचा थेट टँकरद्वारे साठा करून विक्री करत असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे.



(छायाचित्र: गणेश चोडणेकर)

# कलिंगडाचे दर गडगडले

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात यंदा चांगली थंडी पडल्याने कलिंगड पिकाला मोठा फायदा झाला असून, उत्पादनात वाढ झाली आहे. मात्र भरघोस उत्पादन असूनही बाजारात समाधानकारक दर मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा कलिंगडाची आवक अधिक प्रमाणात झाली आहे. परंतु वाढत्या पुरवठ्यामुळे दर घसरले असून शेतकऱ्यांना खर्चही निघणे कठीण झाले आहे. दोन पैसे जास्त मिळावेत या अपेक्षेने काही शेतकरी इतर तालुक्यांतील बाजारपेठांचा रुख करत आहेत. रोहा तालुक्यातील काढणे खुर्द येथील शेतकरी संतोष नाकटी आणि हर्षद बैकर यांनी गावठी, हिरव्या रंगाचे गोल आकाराचे कलिंगड टेम्पोमधून मुरूड बाजारात विक्रीसाठी आणले. चांगला दर मिळेल या अपेक्षेने त्यांनी माल दूरवर नेला; मात्र तेथेही अपेक्षित भाव मिळाला नाही. शेवटी हताश झालेल्या या शेतकऱ्यांनी मोठे, गोड कलिंगड अवघ्या १०० रुपयांना तीन नग या दराने विक्रीस ठेवले. कमी दरामुळे ग्राहकांनी गर्दी करत कलिंगड खरेदीसाठी झुंबड उडवली.

# विवाहित महिलेसह मुलगा बेपत्ता

**पनवेल :** पाले बुद्रुक येथील राहत्या घरातून एक विवाहित महिला आपल्या तीन वर्षीय मुलासह बेपत्ता झाल्याने ते दोघे हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रितीका अजय गायकर असे या विवाहितेचे नाव असून तिचे वय २७ वर्षे आहे.



ती अंगाने सडपातळ, रंग गोरा, डोळे काळे, उंची ४ फुट ३ इंच, नाक बसके, उजव्या गालावर काळ्या रंगाची मोठी जन्मखुण, अंगात नेसुन काळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस घातला आहे. सोबत मुलगा रूषभ (३) याला घेऊन गेली आहे. या दोघांबद्दल कोणाला अधिक माहिती असल्यास त्यानी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक प्रदीप पोपेटे यांच्याशी संपर्क साधावा.

पान १ वरून

## खड्ड्यांचा सापळा पुन्हा जीवघेणा!

नियोजनाचा अभाव यामुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. वाहतूक कोंडी वाढत असून, पोलिसांनाही दिवस-रात्र उन्हात-धुळीत उभे राहून वाहतूक नियंत्रण करावी लागत आहे, त्यामुळे त्यांच्यावरही ताण वाढत आहे.

योग्य नियोजन आणि सुरक्षेची काळजी घेतली असती, तर असे अपघात टाळता आले असते. आता मात्र ठेकेदारांच्या निष्काळजीपणाचा फटका नागरिक आणि पोलिसांना बसतो आहे, अशी प्रतिक्रिया स्थानिकांकडून उमटत आहेत. यापूर्वीही रस्त्यांवरील खड्डे, अर्धवट कामे आणि सुरक्षेच्या मुद्द्यावर आवाज उठवण्यात आला होता. तरीही परिस्थितीत सुधारणा न झाल्याने पुन्हा एकदा जीवघेणा प्रकार घडला आहे. या घटनेने ठेकेदारांचा निष्काळजीपणा समोर आला असून, शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून संबंधितांवर कडक कारवाई करावी आणि रस्ते सुरक्षित करावेत, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा, आणखी निरपराध जीव या खड्ड्यांच्या सापळ्यात सापडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## कार विहिरीत कोसळून नऊ जणांचा मृत्यू

उघडी असल्याने कार थेट खोल पाण्यात जाऊन कोसळली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत फार उशीर झाला होता.

रात्रीची वेळ, विहिरीतील खोल पाणी आणि चिखल यामुळे बचाव कार्यात मोठ्या अडचणी येत होत्या. दाट अंधारामुळे मृतदेह शोधणे आणि कार बाहेर काढण्याचं मोठं आव्हान पोलिसांसमोर होतं. अखेर, रात्री उशिरा क्रेन आणि हायड्रा मशीन पाचारण करण्यात आलं. या यंत्रांच्या मदतीने अथक प्रयत्नानंतर कार विहिरीतून बाहेर काढण्यात यश आलं. मध्यरात्री १ वाजेच्या सुमारास सर्व ९ ही मृतदेह बाहेर काढण्यात आले.

या भीषण अपघातात मृत्यू झालेले सर्व जण दिंडोरी तालुक्यातील इंदोरे गावचे रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये एकाच कुटुंबातील ५ सदस्यांचा समावेश असून सुनील दत्तू दरगोडे, राखी सुनील दरगोडे, उषा अनिल दरगोडे, श्रद्धा अनिल दरगोडे आणि श्रावणी अनिल दरगोडे अशी मृतांची नावं आहेत.

## वरवठणेत शाळकरी मुलीची आत्महत्या

तातडीने ग्रामीण रुग्णालय, म्हसळा येथे दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून तिला मृत घोषित केले. याप्रकरणी मयत मुलीच्या आईने म्हसळा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांनी पथकासह घटनास्थळी भेट देऊन पुढील तपास सुरू केला आहे. दरम्यान, या घटनेमुळे सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावाबाबत पुन्हा चिंता व्यक्त केली जात आहे. पालकांनी मुलांच्या मोबाईल वापरावर लक्ष ठेवणे, त्यांच्याशी सातत्याने संवाद साधणे आणि त्यांच्या भावनिक स्थितीकडे लक्ष देणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. अशा घटना टाळण्यासाठी गरज भासल्यास समुपदेशनाची मदत घेण्याचीही गरज अधोरेखित करण्यात येत आहे.

## चिमुकलीवर अत्याचार

धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी एम.आय.डी.सी. भोसरी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २ एप्रिल रोजी सायंकाळी आरोपीने पीडित मुलीला आपल्या खोलीत बोलावून तिच्यावर अत्याचार केला. तसेच, ही बाब कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली होती. दुसऱ्या दिवशी पुन्हा ३ एप्रिल रोजी सकाळी आरोपीने पुन्हा पीडितेवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पीडित मुलीच्या आईने आणि आत्याने खिडकीतून हा धक्कादायक प्रकार पाहिल्याने ही घटना उघडकीस आली. त्यानंतर, चिमुकलीच्या आईने तात्काळ एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस ठाण्यात धाव घेत या नराधमाविरुद्ध तक्रार नोंदवली. रामु कुंजल निसाद (४०) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

## सिडकोचा वसाहत अधिकारी अडचणीत

नोडल कार्यालयात प्रभारी सहाय्यक वसाहत अधिकारी म्हणून कार्यरत होते. दरम्यान, या प्रकरणानंतर त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक धर्मराज सोनके यांच्या मार्गदर्शनाखाली तापडिया व त्यांच्या कुटुंबियांच्या मालमत्तेची सखोल चौकशी करण्यात आली. उघड चौकशीत तापडिया यांना परीक्षण कालावधीत १ कोटी १२ लाख १७ हजार १४० रुपयांचे वैध उत्पन्न मिळाल्याचे समोर आले. मात्र, त्याच कालावधीत त्यांनी स्वतःच्या आणि पत्नी मनीषा तापडिया यांच्या नावे १ कोटी ४२ लाख १७ हजार १४० रुपयांची मालमत्ता संपादित केली. याशिवाय १ कोटी ६४ लाख ४८ हजार ५२० रुपयांचा खर्चही केल्याचे आढळून आले.

उत्पन्नाच्या तुलनेत मालमत्ता व खर्च यांचा ताळमेळ लावल्यावर तापडिया यांनी १ कोटी ९४ लाख ४७ हजार ९०५ रुपयांची अपसंपदा जमा केल्याचे स्पष्ट झाले. या अपसंपदेमधील काही मालमत्ता त्यांच्या पत्नी मनीषा तापडिया यांच्या नावे असल्याचेही तपासात उघड झाले आहे. तसेच मनीषा तापडिया यांनीही बेकायदेशीर संपत्ती मिळविण्यासाठी सहकार्य केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात सागर तापडिया आणि मनीषा तापडिया यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारित २०१८) मधील कलम १३(१)(ब), १३(२) आणि १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर पोलीस ठाण्यात या संदर्भात गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस निरीक्षक किरणकुमार वाघ यांनी फिर्याद दिली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उपअधीक्षक धर्मराज सोनके करत आहेत.

## कर्नाटकी आंब्याचे हापूसवर अतिक्रमण

मागील आठवड्यापासून कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये हापूसचे दर मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. याच काळात कर्नाटक आणि दक्षिणेकडील आंब्याची आवक वाढल्याने परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. विशेष म्हणजे, हापूससारखा दिसणारा हा आंबा किलोने विकला जात असताना कोकणी हापूस नगाने विकला जातो. त्यामुळे ग्राहकांची फसवणूक होत असून खऱ्या हापूसच्या विक्रीवर त्याचा थेट परिणाम होत आहे. या परिस्थितीत हापूस उत्पादकांना मोठा आर्थिक फटका बसत असून, त्यांच्या उत्पन्नावर गदा येत आहे. हापूसची ओळख आणि विश्वास टिकवण्यासाठी प्रत्येक राज्यातील आंब्याला वेगवेगळे लेबल लावणे अत्यावश्यक असल्याची ठाम भूमिका आंबा उत्पादक संघाने मांडली आहे. आंब्याची लागवड असून, सुमारे ६५ हजारांहून अधिक शेतकरी या व्यवसायावर अवलंबून आहेत. मात्र, यंदा बदलत्या हवामानाचा फटका आंबा उत्पादनाला बसला असून, अवघे १० टक्के उत्पादन अपेक्षित असल्याचे चित्र आहे. त्यातच आंतरराष्ट्रीय परिस्थितीचाही परिणाम जाणवत आहे. अमेरिका-इस्त्राईल-इराण युद्धामुळे मध्यपूर्वेतील संयुक्त अरब अमिरातीसह इतर देशांमध्ये आंब्याची निर्यात ठप्प झाली आहे. परिणामी, स्थानिक बाजारावर दबाव वाढला आहे.

## पीएनपीचे प्रा. मिलिंद घाडगे यांचा गौरव

त्यांची ओळख आहे. सातारा येथील दैवज्ञ सांस्कृतिक भवनमध्ये श्रीमंत वृषालीराजे भोसले व इत्तर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा सोहळा पार पडला.

शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरीबद्दल हा पुरस्कार प्रा. मिलिंद घाडगे यांना प्रदान करण्यात आला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांनी प्रा. मिलिंद घाडगे यांचे अभिनंदन आणि कौतुक केले. तसेच महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, महाविद्यालयाचे कार्यालयीन मार्गदर्शक गबाजी गिते तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी प्रा. मिलिंद घाडगे यांचे अभिनंदन केले.

## सेवानिवृत्त पोलीस आंदोलनाच्या पवित्र्यात

आलेली नाही. १ जानेवारी २००६ पूर्वी आणि त्यानंतर पदोन्नती मिळालेल्या अनेक पोलीस अंमलदारांचा या प्रक्रियेत समावेश होणे अपेक्षित होते. वेतनवाढीस पात्र असलेल्या सेवानिवृत्त अंमलदारांनी जून २००५ पासून अर्ज सादर करण्यास सुरुवात केली होती. डिसेंबर २०२५ पर्यंत एकूण ८८ अर्ज पोलीस अधीक्षक कार्यालयात जमा झाले आहेत. अर्ज सादर केल्यानंतरही वारंवार पाठपुरावा करूनही कार्यालयाकडून कोणताही ठोस प्रतिसाद मिळालेला नाही. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी संस्थेच्या २५ सदस्यांनी जिल्ह्यातील पोलीस उपअधीक्षकांची भेट घेऊन समस्या मांडली होती. त्यावेळी वेतन निश्चितीची प्रक्रिया लवकरच पूर्ण करून सेवापट पडताळणीसाठी पाठवण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र त्यानंतरही कोणतीही प्रगती न झाल्याने पुन्हा भेट घेण्यात आली. त्यावेळी कार्यालयातील लिपीकांनी आठवड्याला पाच ते दहा सेवापटांची वेतन निश्चिती करण्याचे आश्वासन दिले, परंतु प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही दिसून आलेली नाही. दरम्यान, राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये वेतन निश्चितीची प्रक्रिया पूर्ण झाल्याचे समोर आले आहे. मात्र रायगडमध्येच ही प्रक्रिया रखडल्याने सेवानिवृत्त पोलिसांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. लाखो रुपयांच्या आर्थिक लाभापासून वंचित राहिलेल्या या पोलिसांनी आता रस्त्यावर उतरून लढा देण्याचा निर्णय घेतला आहे. १० एप्रिल रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असून दीडशेहून अधिक सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी सहभागी होणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कासार यांनी दिली.

## नागावमध्ये बंगल्याजवळ आग

व रविवारी सुट्टी असल्याने नागावमध्ये पर्यटक दाखल झाले आहेत. या व्हील्यामध्येदेखील पर्यटक राहण्यास आले होते. शनिवारी (दि.४) दुपारनंतर विद्युत पुरवठा बंद झाल्याने त्याठिकाणी असलेले जनरेटर सुरु करण्यात आले. त्यानंतर पुन्हा विद्युत सेवा सुरु झाली. परंतु, जनरेटरमधून अचानक धूर येऊ लागला. बघता-बघता जनरेटरने पेट घेतला. या आगीमध्ये जनरेटरच्या बाजूला असलेल्या काचा तुटल्या, स्वीमींग पूलचे फिल्टरचे नुकसान झाले. दरम्यान, या व्हीलामध्ये असलेल्या पर्यटकांना तात्काळ बाहेर काढण्यास स्थानिकांना यश आले. स्थानिकांनी पाणी व अन्य साधनांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. तसेच अलिबाग नगरपरिषदेच्या अग्नीशमन दलाचे भगवान दाभाडे व राकेश महाले आदींनी वाहनासह घटनास्थळी जाऊन आग विझविण्याचा प्रयत्न केला. स्थानिक व अग्नीशमन दलाच्या मदतीने ही आग विझविण्यात आल्याने मोठी हानी टळली.



(छायाचित्र: शैलेश पालकर)

# बिरवाडी शाळेत गो अनेमिया गो रक्तक्षय जनजागृती

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय बालरोग संघटना महाराष्ट्र राज्य शाखा यांच्या गो अनेमिया गो या प्रकल्पांतर्गत रायगड जिल्हा बालरोगतज्ञ संघटनेच्या शाखेने रायगड जिल्हा परिषदेच्या बिरवाडीतील प्राथमिक शाळेफ्त शालेय विद्यार्थ्यांची रक्तक्षय तपासणी व उपचार शिबीर हा उपक्रम राबविला. या शिबिरात डॉ. चंद्रशेखर दाभाडकर, डॉ. सुनील शेठ, डॉ.अजित पुल्ले व डॉ. आनंद जोगदंड यांनी ११५ विद्यार्थ्यांची तपासणी केली. त्यातील ७६ मुला-मुलींची रक्त तपासणी करण्यात आली आणि गरजू विद्यार्थ्यांना जंताच्या गोळया, रक्त वाढण्याच्या गोळया व खाऊचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास डॉक्टर्स असोसिएशन महाडचे अध्यक्ष डॉ. नितीन देशमुख, वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल काकड, सरपंच श्री. बागडे उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरता अहमिदीया पॅथ लॅबचे मन्सूर लोखंडे, शिक्षण विस्तार अधिकारी सुधीर सकपाळ, तालुका व प्राथमिक आरोग्य वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक निलेश मोरे, मुख्याध्यापक रामचंद्र शिर्के, मुख्याध्यापिका उज्वला कनोजे, केंद्रप्रमुख शंकर गायकवाड, आशा व अंगणवाडी सेविका यांनी सहकार्य केले. या उपक्रमाबद्दल पालक व शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.

# शिवभोजन केंद्राचे आठ महिन्यांचे अनुदान रखडले

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलमधील शिवभोजन केंद्रा चालवणाऱ्या केंद्र चालकांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यांचे जवळपास आठ महिन्यांचे अनुदान रखडले आहे. पनवेल पुरवठा विभागाकडून बिल पाठवण्यास होत असलेल्या उशिरामुळे अनुदानाला विलंब झाला असल्याचे समोर आले आहे.

पनवेलच्या शहरी भागात १० आणि ग्रामीण भागात नऊ अशी शिवभोजनची १९ केंद्र आहेत. दररोज २ हजार ३५० मंजूर थाळी असून, रोज अंदाजे २ हजार २०० पेक्षा जास्त थाळीचे वाटप केले जाते. सद्यःस्थिती १० रुपयांमध्ये शिवभोजन थाळी मिळत असून, पनवेल परिसरातील हजारो गोरगरीब, नागरिक या थाळीचा लाभ घेत आहेत. या दहा रुपयांमध्ये चपाती, भाजी, भात, वरण मिळते. मात्र आठ महिन्यांपासून शासनाकडून अनुदान प्राप्त झाले नसल्याने पनवेल मधील केंद्र चालकांना हे केंद्र चालवताना तारेवरची कसरत करावी लागते.

# निवडक

## न्यूईराचे डॉक्टर ठरले देवदुत

**पनवेल :** पाम बीच रोडवर उशिरा रात्री झालेल्या भीषण दुचाकी-चारचाकी अपघातात दोन तरुण गंभीर जखमी झाले होते. या प्रकरणी न्युईरा हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे आणि वेळेत मिळालेल्या उपचारांमुळे अपघातग्रस्त रुग्णांचा प्राण वाचविण्यात यश आले.




नेरुळहून वाशीच्या दिशेने जात असताना न्यूईरा हॉस्पिटलच्या क्लिनिकल कोऑर्डिनेटर डॉ. स्नेहा थोरवे यांनी हा अपघात पाहिला. एका दुचाकी आणि चारचाकी वाहनाची जोरदार धडक होऊन मिलिंद मोरे (३१) आणि अतुल कुमार (२८) (रुग्णांची नावं बदललेली आहेत) हे दोघे रस्त्यावर जखमी अवस्थेत पडले होते. दोघांनाही गंभीर दुखापत झाली असून मोठ्या प्रमाणात रक्तस्रावही झाला होता आणि त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक होती. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून डॉ. स्नेहा थोरवे यांनी क्षणाचाही विलंब न करता दोघांना रिक्षामधून तातडीने न्यूईरा हॉस्पिटलमध्ये दाखल केले. रुग्णालयात पोहोचताच आपत्कालीन विभागाने तात्काळ उपचार सुरू केले. न्यूरोसर्जन डॉ. सुनील कुट्टी यांच्या देखरेखीखाली दोघांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरु करण्यात आले. डॉ. सुनील कुट्टी यांनी सांगितले की, मिलिंद मोरे यांना अनेक गंभीर दुखापती झाल्या होत्या, तर अतुल कुमार यांना डोक्याला गंभीर इजा झाली होती.

## बेपत्ता सूरज धोत्रे मृतावस्थेत सापडला

**महाड :** एमआयडीसी खरवली येथील रहिवासी सूरज अर्जुन धोत्रे (२९) हा दि.१ एप्रिलपासून बेपत्ता होता. याप्रकरणी त्याच्या पत्नीने दि.३ एप्रिल रोजी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल केली होती. दरम्यान, पोलिसांकडून शोधमोहीम सुरू असतानाच शनिवारी (दि.४) सकाळच्या सुमारास सुरज धोत्रे याचा मृतदेह वरंध गावाच्या हद्दीत आढळून आला.



भोरला जात असल्याचे सांगून तो घरातून मोटारसायकलवरून निघाला होता. मात्र, त्याचा मृतदेह रस्त्याच्या कडेला कुजलेल्या अवस्थेत सापडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. हा मृतदेह सुमारे तीन दिवसांपासून तिथेच असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे हा अपघात आहे की घातपात, याबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे..




## खालापूर तालुक्यात वन विभागाकडून आधुनिक सापळा हस्तांतरण

**पाताळगंगा-खोपोली :** खालापूर तालुक्यात वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी वन विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. तालुक्यात वाढता वन्यजीवांचा वावर, अपघातांची शक्यता आणि जखमी प्राण्यांच्या उपचारासाठी आवश्यक सुविधा लक्षात घेता, वन विभागाने हेल्प फाऊंडेशन आणि आहिल फेन्सिंग अँड गॅबियन कंपनीच्या सहकार्याने एक अत्याधुनिक सापळा (पिंजरा) तयार करून घेतला आहे. यावेळी वन अधिकारी राजेंद्र पवार यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, लोकसहभागातूनच वन, वनसंपदा आणि वन्यजीवांचे संरक्षण शक्य असल्याचा विश्वास व्यक्त केला. तर, वनपाल भगवान दळवी यांनी या उपक्रमात विशेष भूमिका बजावली. यावेळी वनरक्षक घुटे, चंदन नागरगोजे, गायकवाड, काटकर, सागर टोकरे कोळी, मयूर निकम, धनाजी, सावंत तसेच वनपाल नितीन कांबळे यांच्यासह खोपोलीचे माजी नगरसेवक किशोर पानसरे, हेल्प फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर, हनीफ कर्जीकर, अमोल कदम, अमोल ठकेकर, प्रवीण शेंद्रे, आकाश सताने, सरफराज पटेल, दिनेश पाटील यांच्यासह प्राणीमित्र उपस्थित होते.

## 'बॉडी कॅम'मुळे कारवाईत पारदर्शकता

**नवी मुंबई :** शहरातील वाहतूक व्यवस्थेत शिस्त राखण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तांनी वाहतूक शाखेतील पोलिसांना अत्याधुनिक बॉडी कॅम मशिन्स दिल्या आहेत. या मशिन्समुळे कारवाईदरम्यान होणारे सर्व संभाषण आणि घडामोडी रेकॉर्ड होणार आहेत. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करताना अनेकदा शाब्दिक वाद, गैरवर्तन किंवा तणावपूर्ण परिस्थिती निर्माण होत असल्याच्या घटना समोर येत होत्या. या पार्श्वभूमीवर पारदर्शकता वाढवणे आणि पोलिसांवर होणारे आरोप-प्रत्यारोप टाळण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.



या बॉडी कॅममध्ये उच्च दर्जाचे व्हिडिओ आणि ऑडिओ रेकॉर्डिंगची सुविधा असून, रेकॉर्ड केलेला डेटा सुरक्षित सर्व्हरवर साठवला जाणार आहे. त्यामुळे गरज भासल्यास तपासासाठी किंवा पुरावा म्हणूनही त्याचा उपयोग होऊ शकतो. तसेच, या मशिन्समुळे पोलिसांच्या कामात शिस्त, जबाबदारी आणि विश्वासार्हता वाढणार असून, नागरिकांनाही योग्य वर्तन करण्यास प्रवृत्त केले जाईल. नियमभंग करणाऱ्यांवर त्वरित आणि योग्य कारवाई करण्यात अधिक सोपे होणार आहे.




## पत्रकार मयूर तांबडे यांचा सन्मान

**पनवेल :** पत्रकार मयूर तांबडे यांना 'द ग्रेट पत्रकारिता आयकॉन' अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. आई फाऊंडेशन, समृद्धी फाऊंडेशन आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ यांच्यावतीने महाड येथे स्वराज्य भूमी, रायगड गौरव संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. पत्रकारिता क्षेत्रात प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि ध्येयाने व धाडसाने केलेल्या कार्याची दखल घेत मयूर तांबडे यााांना हा पुरस्कार देण्यात आला. पत्रकार मयूर तांबडे यांनी गेल्या तेरा वर्षांत अनेक वृत्तपत्रात काम केले असून पनवेल आणि ग्रामीण भागातील समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी पत्रकारिता सोबतच अनेक सामाजिक उपक्रम देखील राबवले आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना यापूर्वी देखील अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

# पास्को कंपनीची जीवघेणी वाहतूक

- **अवजड वाहतूक पुन्हा सुरू**
- **रोहेकरांचा जीव मुठीत घेऊन प्रवास**

**| धाटाव-रोहा | प्रतिनिधी |**

गेल्या वर्षभरापासून रोहा रेल्वे स्टेशन यार्डमधून विळे येथील पास्को कंपनीत मातेश्वरी ट्रान्सपोर्टच्या ट्रेलरमधून अवजड व धोकादायक लोखंडी कॉईल वाहतूक करण्यात येते. त्याचा प्रचंड धोका व त्रास रेल्वे स्टेशन लगतच्या रोहिदासनगर मधील रहिवासी वर्गासह रोहे अष्टमीकरांना सहन करावा लागत आहे. त्यांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे अवजड वाहतूक बंदी आणि संभाव्य धोक्याचा प्रश्न अधांतरीत ठेवल्याने यामध्ये नक्की गौडबंगाल तरी काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.



गेल्या वर्षभरापासून रोहा रेल्वे स्टेशन यार्ड येथून लोखंडी कॉईलची वाहतूक विले-भागाड येथील पास्को कंपनीत मातेश्वरी ट्रान्सपोर्ट या एजन्सीच्या ट्रेलरमधून केली जात आहे. या अवजड मालाची वाहतूक शहराच्या मुख्य मार्गावरून होत असून या करिता नगरपरिषदेकडून कोणत्याही प्रकारचा परवाना घेतलेला नाही. या अवजड आणि धोकादायक वाहतूकीमुळे कोणत्याही क्षणी दुर्दे वी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे रोहे शहरातून अवजड मेटल कोईल्सच्या वाहतूकीवर बंदी घालण्याची मागणी रोहा नगराध्यक्षा वनश्री शेडगे व मुख्याधिकारी अजय कुमार एडके यांनी पोलीस उप अधीक्षकांकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

सद्या अष्टमी येथील रोहिदास नगर व शहारातील बाह्यवळ मार्ग येथून जीवघेण्या मेटल कोईल्स वाहतूक सरार्सपणे होत आहे. या अवजड, धोकादायक व जीवघेण्या ट्रेलरमुळे वाहतूकीस अडथळा निर्माण करणाऱ्या समस्येची तक्रार रोहा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांच्याकडे रोहिदास नगरसह सर्वच रोहे अष्टमीकर नागरिकांनी करताच त्यांनी तातडीने या गंभीर समस्येकडे आपले लक्ष वेधले. आपल्या शहरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी त्यांनी व मुख्याधिकारी यांनी लेखी पत्र पोलीस उपविभागीय अधिकारी यांना देत यावर कारवाई करण्याची मागणी केली. विशेष म्हणजे या संदर्भात तक्रार करुन एक महिना लोटला तरी आजवर या अवजड वाहतुकीवर कोणतेही निर्बंध लागलेले नाहीत. उलटपक्षी अवजड ट्रेलरची दिवसेंदिवस वाहतूक वाढत आहे. दिवसढवल्या व रात्री अपरात्री होणारी ही वाहतूक सर्वच प्रकरच्या सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक ठरत आहे.

> **मातेश्वरी ट्रान्सपोर्टकडून जे.एस.डब्लू. कंपनीच्या रेल्वे यार्डातुन पास्को कंपनीमध्ये अवजड कॉईलची वाहतूक परिसरातील रहदारीच्या रस्त्यावरून होते. हे रस्ते आधीच अरुंद आहेत. त्यामध्ये हे प्रत्येकी २४ टन वजनाचे एक किंवा दोन कॉईल वाहतूक ट्रेलर जात असताना जीव मुठीत घेत स्थानिकांना मार्ग काढावा लागतो. तसेच, याठिकाणी रात्रीच्या वेळी होणारी वाहतूक ही सर्वच दृष्टीने धोकादायक आहे.**
> **- महेंद्र मोरे, सामाजिक कार्यकर्ते**

रोहा रेल्वे स्थानकालगत जे.एस.डब्लू. कंपनीचे स्वतंत्र रेल्वे यार्ड आहे. याठिकाणी सुरुवातीला लोखंडासाठी लागणारा कच्चा माल भुकटी व गोटी उतरून त्याची वाहतूक डोळवी-साळाव येथे करण्यात येत होती. या धोकादायक वाहतूकीस वेळोवेळी स्थानिकांनी विरोध करीत यावर योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली होती. यांसबधी समीर शेडगे यांनी तत्कालीन प्रांत, व पोलीस अधिकाऱ्यांच्या समोर हि समस्या मांडली होती. त्यानंतर ही वाहतूक पूर्णतः बंद झाली होती. आता याच यार्डातून २४ टन वजनाच्या लोखंडी कॉईलची वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरु झाली आहे. रेल्वे यार्डपासून अरुंद व कच्चे रस्ते आहेत, त्यामधूनच पिंगळसई पंचक्रोशी व रोहिदास नगर येथील नागरिकांची ये-जा सुरु असते. हि वाहतूक विळे भागाड येथील पास्को कंपनीपर्यंत करण्यात येते. दरम्यान, पिंगळसई पंचक्रोशीतील नागरिकांना रुंद व सुरक्षित रस्ते या कंपन्यानी द्यावे, त्यानंतरच हि अवजड व धोकादायक वाहतूक येथून करावी, अशी रीतसर मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

## पनवेल आगारात प्रवाशांची गैरसोय



**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल एसटी आगारातील मूलभूत सुविधांच्या अभावामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. येथील पाणपोई ही बिल्डरने उभारलेल्या पत्र्याच्या शेडमागे झाकली गेल्याने ती प्रवाशांना सहज दिसत नाही. परिणामी वाढत्या उष्णतेमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. तसेच, पनवेल आगारात सावलीचीही अपुरी व्यवस्था असल्याने प्रवासी झाडांच्या आडोशाला बसून वेळ काढताना दिसत आहेत. विशेषतः उरणकडे जाणाऱ्या प्रवाशांना उन्हाचा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, प्रवेशद्वारावर खासगी वाहनांना बंदी असतानाही काही वाहनांची सर्रास ये-जा सुरू असल्याचे चित्र आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

## गॅस एजन्सीचे शेतात विनापरवाना गोडाऊन

**| उरण | प्रतिनिधी |**

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम देशातही जाणवू लागला असून, सर्वच वस्तूंमध्ये महागाई वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर एलपीजी सिलिंडरचा तुटवडा तीव्र झाला असून, उरण तालुक्यात नागरिक आणि व्यावसायिक दोघेही मोठ्या अडचणीत सापडले आहेत. अशातच आता येथील शकुंतला गॅस एजन्सीने उरण-करंजा रस्त्यालगत शेतामध्ये विनापरवानगी गोडाऊन सुरू केल्याचे गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.



व्यावसायिक सिलिंडर उपलब्ध नसल्याने उरणमधील अनेकांनी आपले व्यवसाय तात्पुरते बंद केले आहेत; तर, काही जण चुलीवर व्यवसाय सुरू ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. घरगुती सिलेंडरही ३५ ते ४० दिवसांनी मिळत असल्याने महिलावर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत असून, अनेक घरांमध्ये पुन्हा चुलीचा वापर वाढला आहे. उरण तालुक्यात पुष्पक गॅस एजन्सी आणि शकुंतला गॅस एजन्सी मार्फत सिलेंडर पुरवठा केला जातो. मात्र, यापैकी शकुंतला गॅस एजन्सीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या एजन्सीचे गोडाऊन उरण-करंजा रस्त्यालगत भर शेतामध्ये सुरू असल्याचे समोर आले आहे. याबाबत कोणतीही परवानगी घेतलेली नसल्याची माहिती चाणजे ग्रामपंचायत प्रशासनाकडून मिळाली आहे.

ग्रामसेवक चव्हाण यांनी याबाबत कोणताही अर्ज सादर झालेला नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे संबंधित गोडाऊन बेकायदेशीररित्या सुरू असल्याचा संशय अधिक बळावला आहे. याबाबत त्यांनी या गॅस एजन्सीला लेखी पत्र देऊन त्यांचे म्हणणे ७ दिवसांत सादर करण्यास सांगितले आहे. स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित ठिकाणी शेतामध्ये चारही बाजूंनी जाळी घालून गॅस सिलिंडर साठवणूक व विक्री केली जात असून, हे सिलिंडर अव्वाच्या सव्वा दराने विकले जात असल्याची चर्चा आहे. या प्रकारामुळे गंभीर सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून, उद्या एखादी दुर्घटना घडल्यास त्यास जबाबदार कोण? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## अतिक्रमणाने नागरिकांचा श्वास कोंडला

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण शहरात सध्या ही नगरपरिषद आहे की 'मुक्त बाजार', असा संतप्त प्रश्न घुमत आहे. कारण परिषदेच्या मालकीच्या जागांवर व्यापारी, गॅरेजवाले आणि फेरीवाल्यांनी उघडपणे अतिक्रमण करून थेट ताबा मिळवला आहे. या बेकायदेशीर कारभारामुळे शहरातील नागरिक अक्षरशः गुदमरू लागले आहेत.



उरणमधील रस्ते आधीच अरुंद असताना त्यावर फेरीवाले, हातगाडीवाले यांचा सुळसुळाट वाढला आहे. त्यात भर म्हणजे व्यापाऱ्यांनी शटरच्या बाहेर दुकानांचा पसारा टाकून रस्तेच गिळंकृत केले आहेत. कोटनाका येथील मासळी मार्केट परिसरात व्यापाऱ्यांनी भररस्त्यात मिरचीसह विविध माल मांडून वाहतुकीचा पूर्ण खेळखंडोबा केला आहे. गॅरेजवाल्यांनी तर सर्व मर्यादा ओलांडून रस्त्यावरच मोटारसायकल दुरुस्ती सुरू ठेवली आहे. सार्वजनिक रस्ता हा खासगी वर्कशॉप असल्यासारखा वापरला जात आहे. या सर्व प्रकारांमुळे उरण शहरात वाहतूक कोंडी ही रोजचीच शिक्षा बनली आहे. रुग्णवाहिका, शालेय बस, कामावर जाणारे नागरिक सर्वच या कोंडीत अडकून त्रस्त झाले आहेत. वेळेचा अपव्यय, इंधनाची नासाडी आणि मानसिक त्रास याचा फटका सर्वसामान्यांना बसत आहे.

## रेल्वे स्टेशन जवळ मृतदेह

**पनवेल :** मानसरोवर रेल्वे स्टेशनच्या बाहेर पार्किंगच्या बाजुला एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध कामोठे पोलीस करीत आहेत. या व्यक्तीचे वय ५० वर्षे असून उंची ५ फुट ७ इंच, रंग सावळ आहे. त्याच्या डोक्यावर काळे-पांढरे वाढलेले केस तसेच दाढी व मिशी वाढलेली काळी पांढरी, उजव्या हाताच्या मनगटाखाली त्रिशुल व ओमचे चिन्ह गोंदविलेले आहे. अंगात काळ्या रंगाचे चैन असलेले जॅरकिंग व राखाडी रंगाची पॅन्ट परिधान केलेली आहे.




## टोरंट वीज प्रकल्प रद्द करण्याची मागणी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील ढाक आणि पोटल भागात उभारण्यात येणाऱ्या टोरंट जलविद्युत प्रकल्पाला शिवसेना ठाकरे गटाने विरोध केला आहे. स्थानिक पातळीवर शेतकऱ्यांनी या प्रकल्पाला विरोध केला असून आता राजकीय पक्ष देखील या प्रकल्पाच्या विरोधात उभे ठाकले आहेत. शिवसेना ठाकरे पक्षाच्यावतीने शासनाच्या विविध खात्यांना आपल्या विरोधाचे निवेदने देण्यात आली.

कर्जतमध्ये टोरंट जलविद्युत प्रकल्प विरोधात शिवसेना ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतली आहे. हा प्रकल्प पाली तर्फे कोतल खलाटी, साई डोंगर, भालिवडी, ढाक बहीरी परिसरात होणार आहे. प्रकल्पासाठी वनविभागाच्या सुमारे ६०० एकर जमिनीचा वापर होणार असून काही लाख झाडांची कत्तल होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक शेतकऱ्यामध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. प्रस्तावित असलेल्या टोरंट कंपनीच्या जलविद्युत प्रकल्पाविरोधात विरोधाची तीव्रता वाढत असून आता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षानेही आक्रमक पवित्रा घेतला आहे. गुरुवारी पक्षाचे पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी तहसीलदार, प्रांत अधिकारी, वनविभाग आणि पोलीस प्रशासनाला निवेदने देत प्रकल्प तात्काळ स्थगित करण्याची मागणी केली. कर्जत पंचायत समिती उपसभापती चित्रा ठाकरे यांनी शिवसेना ठाकरे पक्षाच्यावतीने निवेदन प्रांत अधिकारी आणि तहसीलदार यांना निवेदन दिले. यावेळी शिवसेना कर्जत तालुका प्रमुख बाजीराव दळवी, माजी उप सभापती पंढरीनाथ राऊत, युवासेनेचे संपत हडप, तसेच टोरंट प्रकल्प परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## चाकूच्या धाकेने ज्येष्ठ महिलेची लूट

**पनवेल :** नवीन पनवेल सेक्टर ११ येथील ज्येष्ठ महिलेला चाकूचा धाक दाखवून सोनसाखळी लुटल्याची घटना घडली. दरम्यान, या परिसरातील अशा घटनांमुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. या महिला घरी परतत असताना सोसायटीच्या आवारातच दोन अनोळखी तरुणांनी त्यांना अडवले. चोरांनी चाकूचा धाक दाखवत त्यांच्या गळ्यातील सोन्याची माळ हिसकावून घेतली आणि तात्काळ तेथून पसार झाले. या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## कशेळे सुगवे परिसरात बेसुमार जंगलतोड

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यामध्ये ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात वनसंपदा टिकून आहे. येथील काही वनजमिन ही वनविभागाची असुन काही मालकी हक्काची आहे. त्यामुळे कर्जत तालुका हा पर्यावरणाच्या दृष्टीने अनुकूल असा तालुका आहे. मात्र, या ठिकाणी मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागमध्ये वृक्षतोड केली जात आहे. त्यासाठी काही ठिकाणी जाणिवपूर्वक वणवे लावले जात आहेत. त्यामुळे येथील वनसंपदा धोक्यात आली असून वन विभाग याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहे का, असा प्रश्न स्थानिकांमध्ये निर्माण झालेला आहे.


●वन विभागाचे दुर्लक्ष

कर्जत तालुक्यातील जंगलांमध्ये असंख्य प्राणी व पक्षी यांचे वास्तव्य आहे. त्यातील काही पक्षी आताच्या कालावधीमध्ये घरटे बनवून त्यामध्ये अंडी घालतात. काही पिल्ले नुकतीच अंड्यातून बाहेर पडली आहेत. असे असतानाही तालुक्यात मालकी व वन विभागातील जंगलांत बेसुमार वृक्षतोड केली जात आहे. तसेच, वृक्षतोड केल्यानंतर त्यांच्याकडून मुद्दामुन वणवे देखील लावले जात आहेत. या वणव्यांमुळे वनसंपदा धोक्यात आली असून येथील प्राणी व पक्ष्यांचे वास्तव्य धोक्यात आले आहे. याकडे लक्ष कोण देणार, असा प्रश्न या ठिकाणी निर्माण झालेला आहे. वन विभाग या वणव्यांकडे दुर्लक्ष करीत असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे.

**शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित** | **अभिमान, प्रेरणा, नव्या वाटचालीची शपथ**

# सुभेदार मंगेश पाटील यांची सेवानिवृत्ती

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

**भारत मातेच्या रक्षणासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या शूर सैनिकाचा गौरव करण्याचा अभिमानास्पद क्षण रायगड जिल्ह्यातील शिहू मुंढाणी-झोतीरपाडा विभागाने अनुभवला. नुकताच सुभेदार मंगेश पाटील यांचा सेवा निवृत्त कार्यक्रम मुंढाणी फाटा येथे अत्यंत दिमाखात पार पडला. तसेच, त्यांना शिवछत्रपती पुरस्काराने देखील सन्मानित करण्यात आले.**


(छायाचित्र : धम्मशील सावंत)

सुभेदार मंगेश पाटील यांनी दीर्घकालीन सैन्य सेवेत अनेक आव्हानांना सामोरे जात देशाची सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या शौर्य, शिस्त आणि समर्पणामुळे केवळ त्यांचे कुटुंबच नव्हे, तर संपूर्ण रायगड जिल्हा त्यांच्या कार्याचा अभिमान बाळगतो. त्यांच्या सेवेमुळे अनेक तरुणांना देशसेवेची प्रेरणा मिळाली आहे.

या प्रसंगी सुभेदार मंगेश पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, भारत मातेची सेवा करण्याचे भाग्य लाभले, हे माझे सौभाग्य आहे. आता सेवा निवृत्तीनंतर माझ्या जन्मभूमीची सेवा करण्यासाठी मी स्वतःला वाहून घेणार आहे. तर, या विभागातील जास्तीत जास्त तरुण देशसेवेस कसे जातील यासाठी ही माझे प्रयत्न असतील, असे सुभेदार पाटील यांनी सांगितले. यावेळी त्यांनी सैन्य कार्यकाळातील अनेक संघर्षमय व कष्टप्रद किस्से व अनुभव नमूद केले. त्यांच्या या शब्दांनी उपस्थितांच्या मनात देशप्रेमाची नवी ज्योत प्रज्वलित झाली. तसेच, निवृत्तीनंतरही समाजकार्य, युवकांना मार्गदर्शन आणि राष्ट्रप्रेमाची भावना जागृत ठेवण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या अनुभवाचा लाभ समाजाला होणार असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक युवक घडतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी सुभेदार मंगेश पाटील यांची सेवा निवृत्ती व आंतरराष्ट्रीय जलतरण पट्टू कोमल पाटील यांना शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला शिवसेना ठाकरे गटाचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर, पंचायत समिती सदस्य संजय भोईर, उद्योजक जयवंत कुथे, सामाजिक कार्यकर्ते उद्धव कुथे, नामदेव पाटील, सुगंधा पाटील, नरेश पाटील, सुनील पाटील, मनोहर पाटील, हेमंत पाटील, रमेश किर्वे, मोहन पाटील, पत्रकार धम्मशील सावंत, यदीश कुथे, एकनाथ पाटील, गणपत पाटील, प्रेमनाथ पिंगळे, नारायण पाटील, प्रदीप पाटील, माजी सरपंच सोनम पाटील, अनिता पाटील, संगीता पाटील, वैजयंती कुथे, अरुणा म्हात्रे, सुरेखा ठाकूर आदिंसह इतर मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक



### मारुती मंदिरात ३४० वर्षांची परंपरा

**पाली–बेणसे :** पाली शहरातील मधली आळी, कसबे पेठ येथे वसलेले प्राचीन व ऐतिहासिक श्री मारुती देवस्थान हे केवळ मंदिर नसून पाली करांच्या श्रद्धा, परंपरा आणि भक्तीचे केंद्रस्थान म्हणून ओळखले जाते. तब्बल सुमारे ३४० वर्षांची अखंड परंपरा लाभलेल्या या मंदिरात यंदाचा श्री हनुमान जन्मोत्सव अत्यंत भक्तिभाव, उत्साह आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. या सोहळ्यात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रींच्या चरणी नतमस्तक होत भक्तीची अनुभूती घेतली. अध्यक्ष अभिजीत चांदोरकर व विश्वस्त मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव नियोजनबद्ध पद्धतीने पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात पुण्याहवाचनाने झाली. त्यानंतर धनंजयबुवा गद्रे (पाली) यांच्या कीर्तनातून श्रीरामभक्त हनुमंताची महती भाविकांसमोर उलगडली. स्वरसाधना भजनी मंडळ व सिद्धकला भजनी मंडळ यांच्या भजनांनी परिसर भक्तिरसाने भारावून गेला. श्री चैत्रागौरी हळदीकुंकू कार्यक्रमामुळे महिलांनीही मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.




### अधिकारी कामगारांचे स्नेहसंमेलन

**महाड :** सेंचुरी कंपनीच्या कोकण सिंथेटिक फायबर या महाड युनिटमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी व कामगारांचे अनोखे मिलन शुक्रवारी महाड येथे पहावयास मिळाले. ही कंपनी तांत्रिक अडचणीनंतर बंद करण्यात आली. मात्र, १९९० वर्षात उत्पादनाला मोठ्या प्रमाणात सुरुवात होत असताना या कंपनीमध्ये असलेले विविध विभागातील मॅनेजर स्तरावरील अनेक अधिकारी आजही कामगार वर्गाच्या सातत्याने संपर्कात असतात. सुमारे ३५ वर्षाच्या प्रदीर्घ प्रवासानंतर शुक्रवारी यापैकी १२ उच्चपदस्थ अधिकारी आपल्या कुटुंबीयांसमवेत काही काळासाठी महाड येथे थांबले होते. यावेळी महाडमधील सुमारे २५ ते ३० कामगार व १२ अधिकारी यांचे अनौपचारिक तातडीचे मिलन झाले. यावेळी उपस्थित सर्वांनीच प्रत्येकाच्या कुटुंबीयांची तसेच व्यवसायाची आपुलकीने चौकशी केली. ही केवळ औपचारिकतेचा भाग नसल्याचे प्रत्येकालाच जाणवले. या भेटीनंतर कामगार वर्गाला आपल्यावर झालेल्या केएसएफ कंपनीतील संस्काराचे धागे आजही तेवढ्याच ताकतीने मजबूत असल्याचे जाणून आले.




### अत्याधुनिक वाहनांमुळे स्वच्छतेला गती

**पनवेल :** महानगरपालिका तर्फे शहरातील स्वच्छता व नागरी सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने अत्याधुनिक वाहनांचा ताफा वाढविण्यात आला आहे. 'स्वच्छ पनवेल, सुंदर पनवेल' या ध्येयाने ४ लिटर पिकर मशीनची खरेदी करण्यात आली आहे. या मशीनद्वारे व्हॅक्यूम प्रणालीच्या सहाय्याने कचरा थेट कंटेनरमध्ये संकलित केला जात असून अरुंद व कठीण ठिकाणीही स्वच्छता करणे सुलभ झाले आहे. या आधुनिक यंत्रसामग्रीमुळे स्वच्छता कर्मचाऱ्यांना कोणतीही इजा होणार नाही, अशी सुरक्षित व्यवस्था देखील करण्यात आली आहे. स्वच्छता विभागातील स्वच्छता आरोग्य निरीक्षक अधिकारी व निरीक्षक कर्मचाऱ्यांनी स्वच्छ ता देवदूत घेऊन प्रत्यक्ष या नवीन मशीनद्वारे कचरा उचलण्यास सुरुवात केली. या उपक्रमासाठी महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांचे मार्गदर्शन लाभले असून या यंत्रसामग्रीमुळे शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक गतिमान व प्रभावी होणार आहे. तसेच, नागरिकांना स्वच्छ व निरोगी वातावरण मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

### लोकलमधून पडून प्रवासी जखमी

**पनवेल :** हार्बर रेल्वे मार्गावरील मानसरोवर रेल्वे स्थानकात शनिवारी एक अपघात घडला आहे. चालत्या लोकल ट्रेनमधून उतरण्याच्या प्रयत्नात एका प्रवाशाचा तोल गेल्याने तो प्लॅटफॉर्मवर कोसळला. या अपघातात प्रवाशाच्या डोक्याला दुखापत झाली आहे. यावेळी कर्तव्यावर असलेल्या रेल्वे पोलिसांनी जखमी प्रवाशाला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले आहे. दरम्यान, धावत्या गाडीतून प्रवाशांनी उतरू नये, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे

# माणगावला वाहतूक कोंडीचा शाप

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

गुड फ्रायडे, शनिवार आणि रविवार या सलग तीन दिवसांच्या सुट्टीच्या काळात मुंबई–गोवा महामार्गावरील माणगाव बाजारपेठेत वाहतूक कोंडीने भीषण रूप धारण केले. याठिकाणी शुक्रवारी (दि.३) पुणे, विदर्भ, मराठवाडा तसेच मुंबई, ठाणे येथून कोकणाकडे निघालेले पर्यटक, चाकरमानी आणि स्थानिकांच्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. या मार्गावरील अरुंद रस्ता, वाहनांची मोठी वर्दळ आणि चालू तसेच अपूर्णावस्थेत असलेली बाह्यवळन रस्त्याच्या कामांमुळेच वाहतुक कोंडीची गंभीर समस्या उद्भवत आहे. त्यामुळे माणगावाला वाहतूक कोंडीचा शाप असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.



मुंबई–गोवा महामार्गावरील माणगाव बाजारपेठेतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी माणगाव–इंदापूर येथे बाह्यवळण मार्ग उभारला जात आहे. हा ११ किलोमीटर लांबीच्या बाह्यवळ मार्ग असून या मार्गाचे काम पूर्ण करण्यासाठी १८ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला होता. परंतु, गेल्या अनेक वर्षांत या बाह्यवळणाचे ठेकेदार बदलले गेले आणि काम अपुर्ण राहिले. त्यामुळे हजारो प्रवाशांच्या प्रवास तणावाचा बनत आहे. दरम्यान, इंदापूर–माणगाव बाह्यवळण मार्ग १ जूनपर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचे आश्वासन रायगडच्या खासदारांनी दिले होते. परंतु, सद्यपरिस्थिती पाहता आणखी काही वर्ष लागण्याची शक्यता स्थानिकांमधून वर्तविली जात आहे. माणगाव वाह्यवळण मार्गासारख्या महत्त्वाच्या प्रकल्पात अनेक ठेकेदार बदलले गेल्याने ठेकेदारांच्या अपूर्ण वचन बद्धता, असमर्थ व्यवस्थापन आणि कामाच्या गुणवत्तेतील उणीव यामुळे प्रकल्पांचा वेळ वाया जातो. त्यामुळे

### बाह्यवळणाच्या अपूर्ण कामामुळे डोकेदुखी

शासनाने ठेकेदारांवर कठोर दंड, टाकाऊ कालावधींसाठी वारंवार ठेकेदार बदलण्याची धोरणे आणि प्रकल्पांची ऑन–लाइन पारदर्शी नियंत्रण व्यवस्था लागू करणे गरजेचे ठरते.

मुंबई–गोवा महामार्ग कोकणच्या आर्थिक विकासाचा मुख्य दुवा मानला जातो. परंतु, त्याच दुव्यावर अरुंद रस्ते, अपूर्ण अवस्थेत असलेला बाह्यवळण मार्ग आणि वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडी यामुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. तासन्तास अडकून पडलेल्या गाड्यांमध्ये लहान मुले, महिला आणि ज्येष्ठांना पाणी, अन्न आणि इंधनाचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारी केवळ वाहतूक ताण यापुरत्या मर्यादित न राहता आरोग्य आणि सुरक्षिततेच्या प्रश्नांपर्यंत वाढत असून अशा परिस्थितीत प्रशासनाने केवळ ट्रॅफिक ड्यूटीमधील कर्मचाऱ्यांच्या श्रमावर भर देऊन चालणार नाही. तर, प्रकल्प पूर्ण करण्याच्या वेळापत्रकात खरी गांभीर्याने बदल घडवून आणणे भाग पडणार आहे. शेवटी वचनबद्धता नव्हे, वास्तव बदलणे गरजेचे असते. त्यामुळे शासन आणि ठेकेदारांनी वेळखाऊ धोरणांच्या जाळ्यातून बाहेर पडून नागरिकांच्या वेळेची आणि वाहतुकीची खरी किंमत ओळखणे आणि त्यानुसार बाह्यवळण मार्गाचे काम तात्काळ, निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याची जबाबदारी घेणे भाग पडणार आहे.

### विकासाचा दुवा, कोंडीचा मार्ग

**सलग सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर माणगाव शहरात निर्माण झालेल्या भीषण वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांचा आनंदाचा प्रवास अक्षरशः त्रासदायक ठरत आहे. तासन्तास वाहनांच्या रांगा लागल्याने पर्यटक आणि कोकणवासीयांना मोठ्या मानसिक तणावाला सामोरे जावे लागले. या कोंडीत अडकलेली लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना पाणी, अन्न, प्रसाधनगृह यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागले. तर, आपत्कालीन सेवांनाही वाहतूक कोंडीमुळे अडथळे निर्माण झाले. या परिस्थितीमुळे प्रशासनाविषयी नागरिकांमध्ये नाराजी वाढत असून, अपूर्ण बाह्यवळण मार्गाची समस्या अधिकच तीव्र झाल्याची भावना बळावत आहे. परिणामी, मुंबई–गोवा महामार्ग हा विकासाचा दुवा नसून 'कोंडीचा मार्ग' ठरत असल्याची प्रवाशातून भावना व्यक्त होत आहे.**

## इ.व्ही. कार चार्जिंग सेंटरचे उद्घाटन

**। पेण । प्रतिनिधी ।**

चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया आणि लेविकॉन इंडिया सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने इ.व्ही. कार चार्जिंग सेंटरचे उद्घाटन पेण नगरपरिषदेचे गटनेते अनिरुद्ध पाटील यांच्या हस्ते करण्यात आले आहे. यावेळी त्यांच्या समवेत माजी नगरसेवक राजा म्हात्रे, माजी नगरसेवक दिलीप लाड, माजी नगरसेवक कुणाल नाईक आदी मान्यवर उपस्थित होते.



लेविकॉन इंडिया सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर केदार नाडगौंडी व चिल्ड्रन्स फ्युचर इंडियाचे डायरेक्टर तथा सीईओ डॉ. किशोर देशमुख यांच्या माध्यमातून पेण शहरात सीएफआय संस्थेजवळ प्रथमच इ.व्ही. कार चार्जिंग सेंटरची सुरुवात करण्यात आली. त्यामुळे कमी दरात आणि काही मिनिटातच कार, बाईक या चार्जिंग होणार आहेत. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या प्रवासी कारचालकांना हे चार्जिंग सेंटर अत्यंत महत्वाचे ठरणार आहे. याचा पर्यटकांना फायदा होऊन पर्यटनाला चालना मिळणार असून पर्यावरणातील प्रदूषणाची समस्या थांबण्यास मदत होणार आहे.



हनुमान जयंतीचे औचित्य साधून रेवदंडा येथील जि.प. शाळेच्यावतीने मिरवणूक काढण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषेत सहभागी होऊन लेझीम नृत्य सादर करीत उपस्थितांची मने जिंकली. (छायाचित्रः समीर मालोदे)

### गोरठण बुद्रुक येथे कीर्तन महोत्सव

**पाताळगंगा :** ग्रामस्थ मंडळें श्री हनुमान मंडळ व महिला मंडळ गोरठण बु.यांच्यावतीने या ठिकाणी हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. गेल्या अनेक वर्षांची परंपरा या ठिकाणी जोपासली जात असून, हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक कार्यक्रम, माहाप्रसाद, पालखी सोहळा तसेच भजन, कीर्तन, हरिपाठ, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण इत्यादी कार्यक्रम या उत्सवाच्या निमित्ताने संपन्न झाले. या निमित्ताने दीपोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, वारकरी आदी उपस्थित होते. गेली अनेक वर्ष या ठिकाणी हा उपक्रम साजरा होत असतानां वावोशी व छत्तीशी विभागातील ग्रामस्थ या कार्यक्रमाचा आनंद लुटत असतात. तसेच, दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात अनेक कार्यक्रम संपन्न झाले.

## माथेरानमध्ये हनुमान जन्मोत्सव उत्साहात



**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानमध्ये श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या आनंदाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात श्रीराम मंदिरामध्ये साजरा करण्यात आला. संस्कृती व परंपरागत जपणारे गाव ही माथेरानची ओळख आहे. या परंपरेला साजेसे या सोहळ्याचे आयोजन ग्रामस्थ उत्सव मंडळाच्यावतीने करण्यात आले होते. या निमित्ताने श्री हनुमान मंदिरात धार्मिक कार्यक्रम होताना पहाटे काकडआरती करून उत्सवास प्रारंभ केला. संध्याकाळी परंपरागत पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये भजन, टाळ व मृदुंगाच्या तालावर पालखी सोहळा संपन्न झाला. हरिपाठ भजन मंडळ, बाल राधिका भजन मंडळाच्या सुश्राव्य भजनाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी पालखी खांद्यावर घेऊन आपला सहभाग नोंदवला. ग्रामस्थ उत्सव मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सुतार, उपाध्यक्ष सुहासिनी शिंदे, चंद्रकांत जाधव, विकास पार्टे, तोरणे, सनगरे बुवा, साबळे, सौरव घावरे, मंगेश परदेशी यासंह महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

## पोशीर गावात पालखी मिरवणुकीचा जल्लोष

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात पोशीर गावांमध्ये गुरूवारी (दि.२)हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी अनेक धार्मिक कार्यक्रम, जत्रा तसेच सुमारे १२ तास पालखी मिरवणूक पार पडली. त्यात तरुणांनी मोठ्या प्रमाणात जल्लोष साजरा केला. ग्रामस्थ आणि तरुण वर्गाच्या अथक प्रयत्नांनी हा पालखी सोहळा मोठ्या उत्सहात पार पडला.



पोशीर गावात हनुमान जन्मोत्सव निमित्त पोशीर गावची मानाची पालखीचा आनंद घेण्यासाठी तालुक्यातील अनेक गावांमधून भाविक येत असतात. यावर्षी क्रांती ज्योती विद्यालय चित्रपट, हरिपाठ, भजन अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण पोशीर गावात रांगोळी, फुलांनी मंदिर सजावट, पताका गावात देखणे स्वरूप प्राप्त झाले होते. पोशीर गावचे ग्रामदैवत आणि नवसाला पावणार हनुमंत अशी ख्याती असल्यामुळे सकाळ पासून भक्तांनी दर्शनासाठी मंदिरात रांगा लावल्या होत्या. मंदिराच्या गाभाऱ्यात तरुणांकडून हनुमंत रायाची फोटोची रांगोळीने तर सर्वांचे लक्ष वेधले होते.

## माथेरानमध्ये सेमी इंग्रजी सुरू होणार

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरान नगरपरिषदेच्या वीर हुतात्मा भाई कोतवाल शाळेत गुरुवारी (दि.३) शिक्षक, पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्याध्यापक दिलीप अहिरे यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला. शिक्षक सचिन भोईर यांनी पालकांनी मुलांना मोबाईलपासून दूर ठेवण्याचे आवाहन केले. शिक्षक लक्ष्मण ढेबे, साक्षी कदम, अमोल अंधारे, मनीषा चौधरी यांनी विद्यार्थ्यांच्या वक्तशीरपणाबाबत पालकांनी जागरूक राहणे गरजेचे असल्याचे आवर्जून सांगितले. शिक्षक समिती सदस्य प्रतिभा घावरे यांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची पालकांनी वेळोवेळी माहिती घेतली पाहिजे व आपल्या मुलांमध्ये गुणवत्ता भरपूर आहे, त्यांना प्रत्येक क्षेत्रात आपल्या कलागुणांना वाव मिळवून देण्यासाठी संधी दिली पाहिजे, असे सांगितले. त्यानंतर शिक्षण समितीचे सभापती सुनिल शिंदे यांनी, पालकांमध्ये इंग्रजी माध्यमाचे प्रचंड आकर्षण असल्यामुळे मराठी



माध्यमाच्या शाळांना विद्यार्थी संख्येचा प्रश्न नेहमीच भेडसावीत आहे. यावर सेमी इंग्रजी हाच एकमेव उत्तम पर्याय ठरू शकतो, जेणेकरून सर्वसामान्य पालक वर्ग आपसूकच आपल्या मुलांना मराठी शाळेत प्रवेश देऊ शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, इंग्रजी शिकवण्यासाठी माथेरान नगरपरिषद शाळेत प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक करणार असून पहिलीच्या वर्गापासून सेमी इंग्रजीला सुरवात होणार असल्याचेही सुनिल शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले.

## शेतकऱ्यांना शेळी पालनाचे प्रशिक्षण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मुंबई येथील युनायटेड वे कडून अंभेरपाडा येथील ग्रामपंचायत मध्ये शेतकऱ्यांना शेळी पालन प्रशिक्षण देण्यात आले. तीन गावातील १४ शेतकऱ्यांनी प्रशिक्षण घेतले आणि त्यांना ७० शेळ्या तसेच १४ बोकड पालनासाठी देण्यात आले.



कर्जत तालुक्यातील अतिशय दुर्गम असलेल्या अंभेरपाडा ग्रामपंचायतीतील आदिवासीबहुल भागात जलसंजीवनी उपक्रम राबविला जातो. काठेवाडी, बेलाचीवाडी आणि अंभेरपाडा गावातील शेतकऱ्यांना युनायटेड वे मुंबई संस्थेद्वारा कार्यान्वयित आणि मेटलर टोलेडो अर्थसहाय्यित जल संजीवनी, कर्जत प्रकल्प अंतर्गत शेळी पालन प्रशिक्षण आणि वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. प्रगतीशील शेतकरी आणि शेळीतज्ज्ञ संतोष धुमाळ यांनी शेतकऱ्यांनी केवळ पिकावर आणि उत्पन्नासाठी अवलंबून न राहता, शेळीपालनासारखे कमी खर्चिक परंतु प्रभावी शेतीपूरक जोड धंद्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. या प्रशिक्षण शिबिरात अंभेरपाडा ६, बेलाचीवाडी येथील ५ आणि काठेवाडी गावातील ३ असे एकूण १४ शेतकरी सहभागी झाले होते. या सर्व लाभार्थ्यांना प्रत्येकी ५ शेळी आणि एक बोकड असे शेळी पालन उपक्रमांतर्गत वाटप करण्यात आले. यावेळी ७० शेळ्या आणि १४ बोकड वितरीत करण्यात आले.

### विधवा महिलांसह तृतीयपंथीयांचा सत्कार | विविध खेळ, लकी ड्रॉच्या माध्यमातून आनंद

# सवाष्ण तिळगुळ सोहळा उत्साहात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरातील महिला ग्रुपच्यावतीने नुकताच हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. या सवाष्ण सोहळ्यात विधवा महिलांसह तृतीयपंथीय यांना हळदीकुंकू आणि वाण देण्यात आले.

माथेरानमधील महिलांकडून एकत्रीतपणे सवाष्ण तीळगूळ सोहळ्याचे आयोजन केले जाते. वर्षा शिंदे व स्नेहल लोटणकर यांच्या माध्यमातून हा सवाष्ण हळदीकुंकू सण साजरा करण्यात आला. हा सण माथेरानमध्ये गेली १२ वर्ष सर्व जाती–धर्मातील विधवा स्त्रियांसाठी साजरा केला



जात आहे. यावेळी या कार्यक्रमात विविध खेळ आणि लकी ड्रॉ याच्या माध्यमातून या स्त्रियांना आनंद देण्याचा प्रयत्न केला गेला. तसेच, माथेरानमधील किन्नर समाज अस्मिता फांऊडेशनच्या नीताजी केने यांच्या वाढदिवसानिमित्त सिमरन सिंह, आरती विश्वकर्मा, रज्जो केने यांनी माथेरान येथील विधवा महिलांना साड्यांचे वाटप केले. तृतीयपंथीय यांचा सुद्धा यावेळी आदरसत्कार करताना सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी महिलांकरता विविध खेळांचे आयोजन केले होते. तसेच, लकी ड्रॉ मधून ५ विजेते काढण्यात आले. प्रत्येक विजेत्याला प्रेशर कुकर वाटप करण्यात आले असून या कार्यक्रमांमध्ये गौरी कवठाणकर यांनी आपल्या सुरेल आवाजात कार्यक्रमास येणाऱ्या महिलांचे मनोरंजन केले. यावेळी वर्षा शिंदे, स्नेहल लोटणकर, रेखा चौधरी, अर्चना बिरामणे, सोनम दाभेकर, प्राची कदम, वनिता दिघे, तन्वी दाभेकर, मनीषा शिंदे, गीता खाडे, रचना सावंत, हेमा सावंत, सुहासिनी दाभेकर, सुषमा जाधव, ज्योती सोनावणे, सातपुते, मंदा तुपे, विदुला खेडकर, कामिनी शिंदे, अर्चना कदम या महिला उपस्थित होत्या. तर, या कार्यक्रमाला वनिता दिघे, सुरेखा जाधव आणि ठक्कर यांनी सहकार्य दिले. या स्तुत्य कार्याचे समारंभाचे कार्यक्रमाचे समालोचन मंगेश मोरे यांनी केले. माथेरान पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सरिता मुसळे यांनी उपस्थिती लावून महिलांना महिलांचे अधिकार आणि पोलिसांचे कामे याबद्दल माहिती दिली.

### अल्काईल अमाइन्स तर्फे आरोग्य सुविधा

**। आपटा । प्रतिनिधी ।**

अल्काईल अमाइन्स केमिकल्स लि. पाताळगंगा यांच्या सौजन्याने सीएसआर निधीमार्फत चौक ग्रामीण रुग्णालयात विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यात २०० बेडशीट, दाताच्या सर्जरीसाठी उपयोगी इन्स्ट्रुमेंट कॅबिनेट, अन्न गरम राहण्यासाठी वॉर्मर ट्रॉली, फ्रिज, ३ बकेट सुविधा, रुग्ण परीक्षण टेबल, ३० गाद्या आणि वॉटर प्युरिफायर व कूलर अशा उपयोगी वस्तू नुकत्याच सुपूर्द करण्यात आल्या. या अगोदर अल्काईल अमाइन्सने नूतनीकरण केलेल्या सुसज्ज शस्त्रक्रिया विभागामुळे आणि इतर आरोग्य सुविधांमुळे गरजू रुग्णांना दिलासा मिळाला आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

५ एप्रिल
१)श्री.सुरेश महादेव म्हात्रे
मु.पो. मु.आवास, अलिबाग,
५-४-१९४९

**कृषीवलच्या वाचकांना आवाहन**




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हारुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**हरिश्चन्द्र गेणू गायकवाड**
**पुण्यानुमोदन**

# तलावातील पाण्यावर बहरली फुलशेती

## • स्थानिक स्तरावर प्रयोगाची चर्चा • शेतकऱ्यांना मिळाली नवी दिशा

`म

पेण तालुक्यातील खारेपाट विभागातील ठाकूरबेडी येथील प्रगतशील कष्टाळू शेतकरी गंगाधर ठाकूर व नागेश ठाकूर यांनी तलावातील पाण्यावर फूलशेती व फळशेती तयार केली असून ती चांगलीच बहरली आहे. त्यांचा आदर्श इतर शेतकऱ्यांनी घ्यावा असे त्यांच्याबद्दल इतर शेतकऱ्यांसह व्यापारी बोलत आहेत. विशेषतः खारेपाट विभागातील पाण्याच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर एक आशेचा किरण ठरलेली प्रेरणादायी कहाणी समोर आली आहे.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत येथील जिद्दी शेतकरी, नागेश ठाकूर, व गंगाधर ठाकूर या ठाकूर बंधूंनी आपल्या कष्टाच्या बळावर फळशेती, फुलशेती, हळद, याचा यशस्वी प्रयोग उभा केला आहे. तलावातील मर्यादित पाण्याचा योग्य आणि शाश्वत वापर करत त्यांनी शेतीत विविध फुलांची, विविध फळांची लागवड केली आहे. जिथे अनेक शेतकरी पाण्याअभावी हतबल झाले आहेत, तिथे या ठाकूर बंधूंनी योग्य नियोजन, मेहनत आणि नव कल्पना याच्या जोरावर नवसंजीवनी दिली आहे. त्यांच्या शेतात फुललेली रंगीबेरंगी फुले, बहरलेली फळझाडे ही केवळ त्यांच्याच नव्हे तर खारेपाट विभागातील प्रेरणेचे जिवंत उदाहरण आहे.

स्थानिक स्तरावर त्यांच्या या प्रयोगाची मोठी चर्चा सुरू असून, याचा इतर शेतकरी त्यांचे अनुकरण करून प्रयोग करतील अशी आशा वाटते.

गतवर्षी सुद्धा नागेश ठाकूर यांनी मोठ्या प्रमाणावर अशीच शेती केली होती. विशेष म्हणजे अत्यल्प साधन सामुग्री, कमी पाणी, पाण्याचे व्यवस्थापन व योग्य नियोजन या महत्त्वाच्या गोष्टींचा वापर करून त्यांनी ही फळाफुलांची शेती फुलविली आहे. या प्रात्यक्षिकाच्या कृतीतून ठाकूर बंधूंनी हे दाखवून दिले आहे. या शेतीमुळे आर्थिक स्थैर्य तर मिळेलच, परंतु शेतकऱ्यांना नवी दिशा मिळेल. खारेपाटच्या कोरड्या जमिनीत आशेची फुले फुलविण्याचा नागेश ठाकूर, गंगाधर ठाकूर यांचे काम कौतुकास्पद आहे. प्रशासनाने या प्रयोगशील शेतकऱ्यांचा खरोखर सन्मान केला पाहिजे असे मत सामाजिक कार्यकर्ते सी. आर. म्हात्रे यांनी व्यक्त केले आहे.



# पुनर्वसित गावांतील शाळा उभारणीचा प्रश्न

**| पनवेल | प्रतिनिधी |**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसित गावांमध्ये शाळा उभारणीचा प्रश्न गंभीर बनला असून, याबाबत २७ गाव प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेच्या वतीने राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी संस्थेच्या वतीने अध्यक्ष नंदराज मुंगाजी, सचिव प्रेम पाटील, रुपेश धुमाळ, रवींद्र पाटील, मनखुश नाईक, अनिल केणी, रोशन घरत, अमित मढवी व इतर सदस्य उपस्थित होते. चिंचपाडा, कोपर, कोल्ही, वाघिवली वाडा, वरचे ओवळे, उलवे, कोंबडभुजे, तरघर, गणेशपुरी आदी गावांतील शाळा संपादित होऊन दहा वर्षांचा कालावधी लोटला असतानाही पुनर्वसन क्षेत्रात नवीन शाळांची उभारणी झालेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला असून, संविधानाने दिलेल्या शिक्षणाच्या मूलभूत हक्कावर गदा येत असल्याचे संस्थेने निवेदनात नमूद केले आहे.

पुनर्वसित क्षेत्रातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता प्रत्येक गावात इयत्ता १ ते ८ पर्यंत शिक्षणाची सोय असलेली सुसज्ज शाळा उभारणे आवश्यक आहे. मात्र, सिडकोकडून केवळ ४ वर्गखोल्यांचे नियोजन करण्यात आले असून ते अपुरे असल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रत्येक शाळेत किमान १८ खोल्या, स्वतंत्र मुख्याध्यापक कक्ष, ग्रंथालय, संगणक कक्ष, तसेच मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे व इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

# कलिंगड विक्री वाढली


सोगावः मार्च संपला असून उन्हाच्या झळा वाढल्या आहेत, यामुळे बहुतांश ग्राहकांची नैसर्गिकरीत्या थंड असणाऱ्या फळांची मागणी व विक्री मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या थंड फळांमध्ये मुख्यतः कलिंगड, फळाचा समावेश आहे. यामध्ये कलिंगडचा ज्यूस व खापची मागणी केली जात आहे. चोंढी नाक्यावर कलिंगडाची मागणी वाढली आहे.

# गोमाशी लेणीवर स्वच्छता मोहीम

**| पाली | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यात विशेष महत्व प्राप्त असलेल्या बुध्दकालीन लेण्या अस्तित्वात आहेत. लेण्या पाहण्यासाठी महाराष्ट्रातून पर्यटक तसेच लेणी संवर्धक येत असतात. त्या लेण्यांचे संवर्धन व जतन करणे, लेण्यांवरील बुद्धांचे विद्रुपीकरण थांबवणे तसेच बुद्धांचे अस्तित्व टिकविण्याचे काम लेणी संवर्धक व बौद्ध अनुयायंकडून केले जात आहे. याच संकल्पनेतून सुधागड तालुका बौद्धजन पंचायत रजि.नं.ए २७५६ (मुंबई) या संस्थेच्या अस्मिता कांबळे यांच्या नेतृत्वाखाली (दि.३१) मार्च रोजी लेणी स्वच्छता व संवर्धन मोहिम सुधागड तालुक्यातील मौजे गोमाशी येथे राबविण्यात आली.

उपस्थितांनी लेणीची साफसफाई करुन लेणीच्या आजूबाजूचे सुकलेले गवत, व कचरा साफ केला. यावेळी राजेश



गायकवाड, निता कांबळे, प्रियंका ठवरे, किरण कांबळे, अविनाश कांबळे, साक्षी कांबळे मुग्धा कांबळे, तेजस मोते, गुड्डी कांबळे, सुजल सचिन गायकवाड, आर्यन गायकवाड, दक्ष राहुल कांबळे, रचना कांबळे, अथर्व गायकवाड, सम्यक भीम महाडीक, हर्ष क्षिरसागर, प्रांजल क्षिरसागर आदी पदाधिकाऱ्यांनी तसेच विद्यार्थी विद्यार्थ्यांनी या लेणी स्वच्छता मोहिमेत उपस्थित राहून सहभाग घेतला होता.

# मनोहर पासलकर यांचे निधन

**धाटाव** : रोहा तालुक्यातील धाटावचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मनोहर पासलकर यांचे वृद्धापकाळाने नुकतेच पिंपरी चिंचवड येथे निधन झाले. निधना समयी त्यांचे वय ८४ वर्षे होते. त्यांच्या निधनामुळे सर्वत्र शोककळा पसरली. त्यांच्या अंत्ययात्रेत प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या पार्थिव देहावर धाटाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशकिया विधी बुधवार (दि.८) एप्रिल रोजी कुंडलिका घाट (एम.आयडीसीसमोर) तर उत्तरकार्य विधी शनिवार (दि.११) एप्रिल रोजी मोरे वसाहत येथील राहत्या निवासस्थानी करण्यात येणार आहेत.

# डीएड कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



**| खरोशी | प्रतिनिधी |**

शासकीय अध्यापक विद्यालय सासवणे डीएड कॉलेजचा १९९८-२००० बॅचचा स्नेहमेळावा व गुरुजन सत्कार सोहळा म्हात्रोळी येथील स्वामी रिसॉर्ट या ठिकाणी झाला. तब्बल २८ वर्षानंतर ३५ मित्र-मैत्रिणी एकत्रित आल्यामुळे स्नेहमेळावा प्राध्यापकांच्या सत्काराने अधिक उंचीवर पोहोचला होता.

गुरुजन सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी निवृत्त प्रा. लता भोसले होत्या तर प्रा. बाबुलाल पाखरे, प्रा. सुनीता खरात, प्रा. राजन पिंगळे यांच्या उपस्थितीत झाला. सचिन जोशी यांनी सुस्वर ईशस्तवन सादर केले. प्रास्ताविकात राजेंद्र अंबिके याने गेल्या चार वर्षाच्या स्नेहमेळाव्याचा आढावा घेतला व डीएडच्या काही आठवणी जागृत केल्या.

यावेळी सर्व प्राध्यापकांचा यथोचित सत्कार करण्यात आला. सन्मान पत्राचे वाचन स्वाती पाटील हिने केले.

प्राध्यापकांच्या हस्ते राज्यस्तरीय आयडॉल शिक्षक सुनील बैकर व राजेंद्र अंबिके, गणेश चोरघे, विजयी स्मिता जगताप, विजयी विनोद म्हात्रे, शिवा चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. गेट-टुगेदर यशस्वी करण्यासाठी शिरीष पाटील, पराग पाटील, प्रणिता घरत, वंदना गोयजी, दर्शना पाटील यांनी विशेष मेहनत घेतली.

# कशेळे येथे अखंड हरिनाम सप्ताह

**कर्जत** : कशेळे येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तसेच दिपोत्सव आयोजित करण्यात आले. मारुती राणे यांच्या आशीर्वादाने गुरुवर्य नथुराम हरपुडे यांचे मार्गदर्शनाखाली संपूर्ण परिसरातील अबाल-वृद्धांच्या सहकार्याने कशेळे येथील मंदिरामध्ये हनुमान जयंतीच्यानिमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह व सामुदायीक ज्ञानेश्वरी पारायण तसेच दिपोत्सव आयोजित करण्यात आले होते. या अखंड हरिनाम सप्ताहला यंदा ३८ वर्ष पूर्ण होत आहेत. सात दिवस हा सोहळा सुरु होता. अखंड हरिनाम सोहळ्यामध्ये जय हनुमान हरिपाठ महिला मंडळ कशेळे, कशेळे ग्रामस्थांचा हरिपाठ झाला तर कशेळे पंचक्रोशीतील भजनी मंडळांचा भजन, कीर्तन, प्रवचन, यासारखे कार्यक्रम करण्यात आले.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ०५ ते ११ एप्रिल २०२६

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## आर्थिक लाभाची शक्यता

**मेष :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता व्यावसायिक आघाडीवर आपली सुरुवात चांगली होईल. कामाच्या फलश्रुतीच्या रूपात आर्थिक लाभ होऊ शकेल. आठवड्याच्या मध्यास आपण लेखी किंवा मौखिक बाबतीत सतर्क न राहिल्यास वरिष्ठांचा आपल्या बद्दल गैरसमज होण्याची शक्यता सुद्धा आहे. हा आठवडा कारकिर्दीच्या बाबतीत अनुकूल असल्याचे दिसत आहे. आठवड्याच्या मध्यास नवीन कामाची सुरुवात न करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. या व्यतिरिक्त आठवड्याच्या मध्यास खर्च करण्याची तयारी सुद्धा ठेवावी. आठवड्याच्या उत्तरार्धात भविष्याचा कल तसेच तार्किक नमुना समजून घ्या. आपल्या क्षमतेमुळे कामाच्या ठिकाणी अतिशय अवघड जवाबदारी सुद्धा आपण समर्थपणे पेलू शकाल. उच्च शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आठवड्याचे सुरुवातीचे व अखेरचे दिवस अनुकूल आहेत. मधल्या दिवसात सामान्य अभ्यास सोडून पराविज्ञान शिकण्याकडे आपला अधिक कल होईल. **महिलांना** : आपण विशेषतः स्त्री सहकाऱ्यांशी विनाकारण वाद घालणे किंवा चर्चा करणे टाळावे. आपल्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पडेल. **शुभ दिनांक** : ०७,०८.

## विचारपूर्वक निर्णय घ्या

**वृषभ :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता विवाह इच्छुकांचे विवाह ठरू शकतील. समाजातील उच्च वर्गातील लोकांचा सहवास लाभू शकेल. आपल्या संबंधांना आपण चांगल्या पद्धतीने ओळखू शकाल. आठवड्याच्या मध्यास सांधेदुखी, ज्ञानतंतू, रक्तदाब व पोटाशी संबंधित समस्या असणाऱ्यांचे दुखणे वाढण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या सुरुवातीस व्यावसायिक आघाडीवर आपली वृत्ती आशावादी असल्याने आपल्या समस्या व सभोवतालच्या गैरसोयींप्रती आपण कमी चिंतीत असाल. आपले अंतर्मन आपणास व्यूहात्मक पाऊल उचलण्यास योग्य मार्गदर्शन करेल. उत्तरार्धात आपणास विचारपूर्वक निर्णय घ्यावे लागतील. विद्यार्थ्यांना आठवड्याची सुरुवात चांगली होऊन सुद्धा अभ्यासात चढ-उतार येत असल्याचे जाणवेल. उच्च शिक्षणात विघ्ने येऊ शकतात. **महिलांना** : कुटुंबीय व प्रिय व्यक्तीशी संबंध सुधारतील. विवाहितांना आठवड्याच्या मध्यास एकमेकांचा उत्तम सहवास लाभेल, मात्र संबंधात आपले वर्चस्व गाजविण्याची वृत्ती सोडावी लागेल. **शुभ दिनांक** : ०५,०६

## हिशोबी राहणे आवश्यक

**मिथुन :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आठवड्याच्या सुरुवातीस आपल्या जीवनात सकारात्मकता व आशावादाचा संचार असेल. गोचरीच्या गुरूचा प्रभाव आपल्या वैवाहिक जीवनावर किंवा प्रियव्यक्तीशी असलेल्या संबंधांवर सकारात्मकच होईल. भागीदारी कार्ये किंवा संयुक्त करार, नोकरीत सहकाऱ्यांशी असलेल्या संबंधात सुद्धा यामुळे फायदा होईल. सुरुवातीस आपणास कामे करण्याची चांगली संधी मिळू शकेल. परंतु, अखेरच्या दोन दिवसात खर्च करण्याची सुद्धा तयारी ठेवावी लागेल. आता विद्यार्थ्यांचे अभ्यासावर लक्ष केंद्रित होऊ शकेल. तसेच आवडत्या विषयांचा खोलात शिरून अभ्यास करण्यास प्राधान्य असेल. सध्या आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी आपण काहीतरी नवीन शिकू शकाल. प्रणयी जीवन, भेटीगाठी, रात्री भोजन इत्यादींसाठी आठवड्याचा अखेरचा दिवस जास्त अनुकूल आहे. आठवड्याच्या उत्तरार्धात आरामदायी जीवनशैलीचा आनंद उपभोगू शकाल. **महिलांना** : आठवड्याच्या मध्यास आपणास आधी पासूनच काळजी घ्यावी लागेल. **शुभ दिनांक** : ०६, ०८

## कामात सर्जनात्मकता वाढेल

**कर्क :** आठवड्याच्या सुरुवातीस आपण जर भावनांवर आवर घातला नाहीत तर व्यक्तीगत जीवनावर त्याचा परिणाम होऊ शकतो. आठवड्याच्या उत्तरार्धात आपल्या मनातील वैचारिक गोंधळामुळे आपले कशातही मन रमणार नाही. अशा परिस्थितीत आपण एकांतात राहण्यास प्राधान्य द्या. त्यामुळे व्यक्तीगत संबंध किंवा व्यवसायाकडे आपण लक्ष देऊ शकणार नाही. जीवन व संबंधांवर त्याचा गंभीर परिणाम होईल. प्रेम करण्याची व मिळविण्याची इच्छा उत्कट व तीव्र होईल. पैतृक व्यवसायात असणाऱ्यांसाठी आठवड्याची सुरुवात चांगलीच आहे. नोकरी करणाऱ्यांची कामगिरी उत्तरार्धात चांगली होऊ शकेल. कोणत्याही प्रकारच्या जुगारी प्रवृत्तींपासून दूर राहणे हितावह होईल. आर्थिक बाबतीत विशेष त्रास होत असल्याचे दिसत नसले तरी व्यापारात अपेक्षेहून कमी नफा होण्याची शक्यता आहे. **महिलांना** : आपल्या मनातील भावना वैवाहिक जोडीदारा समक्ष स्पष्टपणे व्यक्त करू शकाल. सध्या आपणास संबंधात कोठे ना कोठे अनिश्चितता असल्याचे जाणवेल. कामात आपली सर्जनात्मकता वाढेल व कामगिरी सुद्धा चांगली होईल. **शुभ दिनांक** : ०९, ११

## शुभ प्रसंग घडण्याची शक्यता

**सिंह :** विद्यार्थ्यांना अभ्यासात अधिक लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. आठवड्याच्या पहिल्या दिवशी कफ, खोकला, छातीत दुखणे इत्यादींचा त्रास होऊ शकतो. या आठवड्यात नोकरीत किंवा किरकोळ कामात आपली कामातील प्राप्ती चालूच राहील. परंतु ती पूर्ण करण्यास अधिक परिश्रम करावे लागतील. व्यापारात काही त्रास संभवत नसला तरी स्पर्धात्मक वातावरणात आपला निभाव लागण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. कार्यालयीन प्रतिस्पर्ध्यांपासून सावध राहावे. कुटुंबात शुभ प्रसंग घडण्याची किंवा अशा प्रसंगात सहभागी होण्याची शक्यता आहे. सध्या कौटुंबिक व व्यावसायिक अशा दोन्ही आघाडींचा समतोल साधू शकाल. विद्यार्थ्यांना हा आठवडा अनुकूल आहे. **महिलांना** : सुरुवातीच्या दिवसात प्रवासाची शक्यता आहे. दांपत्य जीवनातील गोडवा टिकून राहील. अचानक धनलाभ होण्याची शक्यता सुद्धा नाकारता येत नाही. संततीची त्यांच्या कार्यक्षेत्रात प्रगती होईल. चांगली बातमी मिळेल, पूर्वी केलेली जुनी बचत आता उपयोगी पडू शकेल. **शुभ दिनांक** : ०६,१०

## कुटुंबियांच्या सहवासात वेळ घालवा

**कन्या :** आठवड्याच्या सुरुवातीस आपल्या वाक्चातुर्याने कोणत्याही व्यक्तीस प्रभावित करू शकाल. आपल्या शब्दातून सर्जनात्मकतेचा ठसा उमटेल. इतरांना आपले म्हणणे सहजपणे सांगू शकाल. प्रेम व्यक्त करण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी सुद्धा हा आठवडा अनुकूल आहे. जेथे वाणीचे प्रभुत्व असेल अशी व्यावसायिक कार्ये सुद्धा आपण सहजपणे पूर्ण करू शकाल. आठवड्याच्या मध्यास आपल्या सभोवताली मित्रांचा गराडा असेल. त्यांच्याकडून काही भेटवस्तू मिळतील. आपण सुद्धा त्यांच्यासाठी पैसा खर्च कराल. पूर्वी केलेल्या गुंतवणुकीत आपण सध्या काही बदल करण्याची शक्यता आहे. आत्ता आपण जर कारकिर्दीवर लक्ष ठेवून कष्ट केलेत तर चांगल्या फळाची आशा बाळगू शकता. शेअर्स-सट्टा किंवा दलालीच्या कार्यात हिशोबीपणा ठेवून धाडस केल्यास लाभ होऊ शकेल. **महिलांना** : भविष्यात उपयोगी पडतील अशा नवीन लोकांशी मैत्री जुळेल. अविवाहितांना योग्य जोडीदार मिळण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात कुटुंबियांच्या सहवासात वेळ घालवू शकाल. तसेच त्यांच्यासाठी काहीतरी करण्याची इच्छा जागृत होईल. **शुभ दिनांक** : ०५, ०७

## लोकांच्या संपर्कात राहा

**तुळ :** आठवड्याच्या सुरुवातीस नोकरीत बक्षीस, पदोन्नती किंवा पगारवाढ होण्याची शक्यता आहे. मागील काही दिवसांपासून आपणास व्यवसायात कायदेशीर अडचणी किंवा शासकीय समस्यांमुळे अडथळे जाणवत असतील किंवा नोकरीत वरिष्ठांशी तणाव किंवा त्यांचे सहकार्य मिळत नसल्याचे जाणवत असेल. आता ही परिस्थिती संपुष्टात येऊन या सर्व बाबतीत आपले फासे सरळ पडतील. रोमँटिक मनःस्थितीमुळे वैवाहिक जोडीदार किंवा प्रियव्यक्तीस खुश करण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब कराल. विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला तरी इतर प्रवृत्तीत अधिक रुची दाखवू नये. आरोग्याच्या बाबतीत या आठवड्यात काळजी करण्यासारखे काही नाही. **महिलांना** : पैतृक संपत्तीशी संबंधित कार्यात सकारात्मकता येऊन जुने वाद असल्यास आपल्या बाजूने निकाल लागू शकेल. व्यावसायिक आघाडीवर आपण अनेक लोकांच्या संपर्कात याल. या आठवड्यात बहुतांशी संबंधांचे सौख्य उपभोगू शकाल, ज्यात सुरुवात चांगली झाल्याने आपण आनंदीत व्हाल. **शुभ दिनांक** : ०७,०८

## आचरण चांगले ठेवा

**वृश्चिक :** आठवड्याच्या सुरुवातीस आपणास काही प्रमाणात सतर्क व सावध राहून वाटचाल करावी लागेल. सर्व प्रथम पूर्वीच्या थकव्यामुळे आपणास आळस जाणवेल व त्यामुळे कामात मन रमणार नाही तसेच विचारात घुटमळत राहिल्याने निर्णय घेण्यास असमर्थ व्हाल. त्याच बरोबर संबंधात रुची राहणार नाही. आरोग्यास सुद्धा नाजूकपणा येईल. आरोग्य मध्यम राहील. उत्तरार्धात सर्दी, कफ, ताप यांचा त्रास संभवतो. आंधळेपणाने कोणतेही साहस करू नये. नवीन कार्याची सुरुवात व प्रवास न करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. आपली प्रतिमा मलीन होईल अशा कोणत्याही कार्यापासून दूर राहावे. आठवड्याच्या मध्यास नोकरीत फायदा झाला तरी वरिष्ठां कडून खूप मोठी आशा बाळगू नये, तसेच त्यांच्याशी नम्रतेने वागावे. कार्यालयात आपल्या विरुद्ध कट-कारस्थान करणाऱ्यांवर मात करू शकाल. **महिलांना** : वैवाहिक जोडीदार किंवा स्वतःसाठी नवीन कपडे, दागिने किंवा वाहन खरेदी करू शकाल. उत्तरार्धात प्राप्तीत वाढ करण्यावर लक्ष केंद्रित कराल. वसुली किंवा संपत्तीचे सौदे झाल्याने आपल्या हाती पैसा येईल. **शुभ दिनांक** : ०९, १० .

## वरिष्ठांचे सहकार्य मिळेल

**धनु :** आठवड्याच्या पूर्वार्धात आपल्या मनातील योजना साकार होतील. सामाजिक कार्यात सहभागी व्हाल किंवा त्यासाठी प्रवास कराल. घरात मंगल किंवा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी आठवडा अनुकूल आहे. विदेशाशी संबंधित कामास गती येण्याची किंवा त्यासाठी प्रवास करावा लागण्याची शक्यता आहे. एखाद्या लांब पल्ल्याच्या प्रवासाचा विचार करत असल्यास त्यास सकारात्मक गती येईल. व्यापाऱ्यांची वसुली होऊ शकेल. नोकरी-व्यवसायात लाभदायी परिणाम मिळेल. नोकरी करणाऱ्यांना कार्यालयात सहकाऱ्यांचे व वरिष्ठांचे सहकार्य मिळू शकेल. व्यापाऱ्यांना प्रतिस्पर्ध्यांवर मात करता येईल. नवीन कार्याचा प्रारंभ करण्यासाठी हा आठवडा अनुकूल आहे. मात्र, आठवड्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी आपले कामात लक्ष न लागल्याने प्रतिकूलता जाणवेल. ह्या दोन्ही दिवशी आरोग्य विषयक त्रास सुद्धा होऊ शकतो. **महिलांना** : पहिल्या दिवशी संबंधात आपण उत्तम प्रकारे वाटचाल करू शकाल. दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी प्रियव्यक्तीशी वाद होऊ शकतो. त्या नंतरच्या दिवसात वैवाहिक जीवनात किंवा प्रणयी जीवनात जवळीक वाढेल. **शुभ दिनांक** : ०५, ११

## धार्मिक कार्यात सहभागी व्हा

**मकर :** आठवड्याच्या पहिल्या दिवशी कारकीर्दीस आपण केंद्रस्थानी ठेवाल व आपले बहुतांशी कामे व्यावसायिक कार्यातच केंद्रित राहतील. व्यवसायात आपल्या वाक्चातुर्याने इतरांची मने जिंकू शकाल. नियोजित कामात यश प्राप्ती झाल्याने आत्मविश्वास वृद्धिंगत होईल. व्यवसायाशी संबंधित कोणताही निर्णय आत्मविश्वासाने घेऊ शकाल. व्यापारात लाभ होईल. प्राप्तीचे नवीन मार्ग सापडतील. आठवड्याच्या मध्यास मानसिक व्याकुळता जाणवेल. अशा स्थितीत कोणतेही नवीन काम न करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. या आठवड्यात धार्मिक किंवा मंगल कार्यात सहभागी व्हावे लागेल किंवा तीर्थयात्रा घडेल. अखेरच्या दोन दिवसात आपल्यात पुन्हा उत्साह संचारेल. आठवड्याच्या मध्यास विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळे येऊ शकतात. आठवड्याच्या मध्यास बेचैनी जाणवेल. **महिलांना** : सुरुवातीस स्नेही व स्त्री मित्रांकडून लाभ होईल. एखाद्या रम्य ठिकाणी सहलीस जाऊ शकाल. मित्रांचे सहकार्य सुद्धा मिळेल. प्रियजनांशी रोमांचित करणारी भेट होण्याचा प्रसंग उदभवेल व ह्या भेटीमुळे आपण आनंदून जाल. **शुभ दिनांक** : ०६, ०७

## धनलाभ होण्याची शक्यता

**कुंभ :** आठवड्याच्या सुरुवातीस कुटुंबातील एखाद्या व्यक्तीच्या प्रकृती विषयक काळजीमुळे सुद्धा आपल्या प्रकृतीस त्रास होऊ शकतो. सुरुवातीस विद्यार्थ्यांचे अभ्यासात मन कमीच लागेल. नंतर विद्यार्थ्यांना एखाद्याशी महत्वाच्या चर्चेत सहभागी होण्याची संधी मिळेल. त्यामुळे आपली ज्ञानवृद्धी होईल. व्यावसायिक कारणांसाठी काही खर्च होण्याची शक्यता आहे. मात्र, कालांतराने त्यातून लाभ होण्याची अपेक्षा आपण बाळगू शकता. व्यापारात विकासाची संधी आल्यास जास्त विचार न करता संधीचा लाभ घ्या. नोकरीत लाभ होईल. स्थान परिवर्तन किंवा जवाबदारीत बदल होण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात एखाद्या धार्मिक किंवा मंगल कार्यात आपण सहभागी होण्याची शक्यता आहे. आपणास धनलाभ होण्याची सुद्धा शक्यता आहे. **महिलांना** : आपल्या कठोर वाणी व वागणुकीमुळे प्रगतीस खीळ बसण्याच्या शक्यतेमुळे आपणास वाणी व वागणूक नियंत्रित ठेवावी लागेल. स्नेहीजनांशी हट्टीपणा सोडून समाधानी वृत्ती जर आपण बाळगलीत तर संभाव्य समस्या निर्माण होण्या पूर्वीच त्या संपुष्टात येतील. **शुभ दिनांक** : ०८,०९

## स्नेहीजनांच्या सहवासात वेळ घालवा

**मीन :** आठवड्याच्या सुरवातीच्या दिवशी आपण व्यावसायिक बाबतीत संपूर्णपणे लक्ष केंद्रित करू शकणार नसल्याने महत्वाचे निर्णय घेणे टाळावे. पहिल्या दिवशी आपण स्वतःच्या स्थितीचे आकलन व आत्मचिंतन करू शकाल. सध्या शासकीय किंवा न्यायालयाशी संबंधित कामात सावधपणे पाऊल टाकावे. आपण धार्मिक मार्गावर वाटचाल करून एखाद्या तीर्थयात्रेस जाण्याचे आयोजन कराल. प्रथम दिवस वगळता प्रियव्यक्ती किंवा स्नेहीजनांच्या सहवासात आनंदात वेळ घालवू शकाल. भागीदारी व्यवसायात लाभ होईल. अखेरच्या दिवशी संबंधांना नवीन उंचीवर घेऊन जाण्यात आपण यशस्वी व्हाल. विद्यार्थ्यांसाठी आठवडा अनुकूल आहे. दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अध्ययन चांगले होऊ शकेल. ह्या आठवड्यात प्राप्तीच्या साधनात वाढ झाल्याने आपला कल वैभवी जीवनशैलीकडे होण्याची शक्यता आहे. **महिलांना** : आपणास आर्थिक लाभ व सामाजिक प्रतिष्ठेसह कौटुंबिक जीवनात सुख समाधान असल्याचे जाणवेल. मनोरंजन, प्रवास, मित्रांची भेट, रुचकर भोजन, सुंदर वस्त्र परिधान, भिन्नलिंगी व्यक्तींची जवळीक आपणास आनंदित करेल. **शुभ दिनांक** : १०,११

# रस्त्यावरील खड्डे अपघातास निमंत्रण

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

खालापूर नगरपंचायत हद्दीतील महड गावातील शाळेकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर पडलेला खड्डा अपघाताला निमंत्रण देत आहे.त्याच बरोबर या ठिकाणी रस्त्याला तडा गेल्याचे पहावयास मिळत आहे. याच मार्गावरून शाळकरी मुले, ग्रामस्थ प्रवास करीत असताना अपघाताला निमंत्रण मिळत असून ग्रामस्थ नाराजी व्यक्त करीत आहे. यामुळे संबंधित प्रशासनाने याचे गांभीर्य ओळखून रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहेत.



खालापुर नगरपंचायत हद्दीत अनेक प्रलंबित विकास कामे मार्गी लागली असली तरी सुद्धा, या रस्त्याच्या संदर्भात ग्रामस्थ नाराजी व्यक्त केली जात आहे. तालुक्यातील रस्त्याला लागलेले ग्रहण सुटत नाही हिच स्थिती गावातील जोडणाऱ्या रस्त्याची झाली आहे. शिवाय रस्त्याचे काम दर्जेदार होत नसून, केवळ नागरिकांची समजूत काढावी म्हणून केले जात असल्याची भावना या मार्गावरून प्रवास करणारे नागरिक व्यक्त करीत आहे. तालुक्यातील गावांना जोडणारे रस्ते लवकर होतच नाही. शिवाय ते उत्तम नसल्यामुळे केवल नैसर्गिक आपत्तीने दुरावस्था झाल्याचे कारण पुढे केले जाते. यामुळे रस्ते चांगले केव्हा होणार असा प्रश्न सर्व सामान्य नागरिकांना पडत आहे.

> “महड गावातील शाळेकडे जाणाऱ्या रस्ता खराब झाल्याने याचा नाहक त्रास आम्हा ग्रामस्थांना करावा लागत असून या रस्त्यावर जागोजागी तडा गेले आहे. त्याचबरोबर रस्त्यावर खड्डा पडल्याने हा रस्ता अपघाताला आमंत्रण देत असतानाही याकडे संबंधित प्रशासन दुर्लक्ष करत आहे. सदर या रस्ता उत्तम दर्जाचा करण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहे.
> –जयेश पाटील ग्रामस्थ महड”

## जोहे येथे हनुमान मंदिर जीर्णोध्दार

**खरोशी :** पेण तालुक्यातील जोहे येथे श्रीहनुमान मंदिराचा जिर्णोध्दार व प्राणप्रतिष्ठापणा सोहळा ३१ मार्च ते ०२ एप्रिल गावकऱ्यांनी मोठ्या भक्तीभावाने साजरा केला. मंदिर उभे करण्यासाठी सेवकांनी गावोगाव फिरून मंदिरासाठी देणगी उभी केली आणि या देणगीतून भव्य असे हनुमंताचे मंदिर बांधले. यासाठी गणेश मोकल, बालाजी मोकल, भगवान मोकल, अनंता मोकल, नरेश मोकल सर जगन्नाथ गुरुजी, रामभाऊ मोकल, गोपीनाथ मोकल या सर्वांना अधिक श्रेय जात आहे. मुर्तींची मिरवणुकीने सुरुवात करुन पहाटे पासूनच विधीवत पूजा, होम हवन, प्राणप्रतिष्ठा व कलश रोहण सोहळा रविशंकर शिवाचार्य आयपाटण यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच नवीन शेड उद्‌घाटन करण्यात आले. रात्री नितीन रावे यांचे कीर्तन तर हनुमान जयंतीच्या दिवशी सत्यजित भाताण पनवेल यांचे कीर्तन व पुष्पवृष्टी करण्यात आली. सदरचा कार्यक्रम जोहे पेण येथे मोठ्या भक्तीभावाने संपन्न झाला.

# कशेळेत उभारले आयुष उद्यान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कशेळे येथील ग्रामीण रुग्णालय कशेळे मध्ये आयुष उद्यान उभारण्यात आले आहे. या रुग्णालयाच्या परिसरामध्ये औषधी वनस्पती यांच्या विविध जातींचे रोपण करण्यात आले. त्यामध्ये काही जीवन देणारी वृक्ष लावण्यात आली तर काही फळझाडे, फुलझाडे लावण्यात आली. या वृक्ष लागवडीसाठी डॉ. झेंडे यांनी दोन महिन्यापूर्वी सुरुवात केली.




### आयुष उद्यानातील झाडे

हळद, शतावरी, हातजोड, ब्राम्ही, अडुळसा, काळीमिरी, पाणफुटी, पपई, कोरफड, शेवगा, गवती चहा, करंजा, आवळा, तुळस, कडीपत्ता, पळस, कडुनिंब, गुळवेल आदी वृक्षांची लागवड केली आहे.

वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय कशेळे येथील बाबासाहेब कालेल यांच्या संकल्पनेतून ग्रामीण रुग्णालय कशेळे येथे. आयुष उद्यान उभारण्यात आले आहे. या आयुष्य उद्यानाचे उद्दिष्ट म्हणजे आपल्या आयुर्वेदातील अनेक गुणकारी आयुर्वेदिक औषधी वनस्पती आपल्या आजूबाजूला असतात. परंतु त्यांची आपल्याला त्यांची ओळख नाही. या सर्व वनस्पतींची माहिती व त्यांचे आपल्या जी-वनात होणारे फायदे व ते कशा पद्धतीने केले जातात याची सखोल माहिती मिळावी यासाठी आयुष उद्यान उभारण्यात आले आहे. या उद्यानासाठी हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांचा विशेषता सहभाग लाभला व हे आयुष उद्यान उभे करण्यात आले. अशाप्रकारे सविस्तर माहिती देऊन आयुष उद्यान ग्रामीण रुग्णालय कशेळे येथे जनजागृती केली जात आहे. या उपक्रमामुळे कशेळे ग्रामीण रुग्णालयात आलेल्या रुग्णांकडून माहिती घेतली जात आहे. या औषधी वनस्पती हिरव्या रंगाच्या कापडी पिशव्यांचा वापर करण्यात आला आहे. रुग्णालयातील कर्मचारी यांच्याकडून केला जातो. रुग्णालयात बनवण्यात आलेल्या आयुष उद्यानमध्ये ठेवण्यात आलेल्या प्रत्येक वनस्पतीची सखोल माहिती देण्यात आली आहे.

# समाज भूषण सन्मान सोहळा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

अखिल पोलीस मित्र सुरक्षा परिषदेचे कर्जत येथील कार्यालयात २०२६ चे समाजभूषण सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यात तालुक्यातील सामाजिक, संगीत आणि आध्यात्मिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी भजन, किर्तन, गायन, संगीत, विशारद, पवाडा, समाजसेवक, भावगीत भक्तीगीत, ढोलकी वादक, कलगीतुरा, हरिपाठ प्रवचन, समाज प्रबोधन, बाजा सनई, पत्रकार या क्षेत्रातील विविध मान्यवरांचा सत्कार पोलीस सुरक्षा परिषद ऑफ इंडिया नवी दिल्ली या संघटनेच्या वतीने यावर्षी २०२६ समाज भूषण पुरस्कार याने सन्मानित करण्यात आले.

यावेळी नरेश पाटील, तानाजी शंकर मसणे, भास्कर मसणे, अमोल पाटील, आकाश काटे, कमलाकर हातचागे, उद्देश तळेकर, गणेश भोपी, अनिल गावडे, जैतू कराळे जयेश जाधव यांचा सन्मान करण्यात आला.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

| गाव व मालक | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे पुलाचीवाडी तालुका कर्जत जि रायगड मोहन मगनलाल पंजाबी | २४/२/अ/८ | ०-४०-०० | ०-२० |
| मौजे पुलाचीवाडी तालुका कर्जत जि रायगड अरजन मगनलाल पंजाबी | २४/२/अ/९ | ०-४०-०० | ०-२० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०५/०४/२०२६

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा.८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस
समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस
समोर अमराई रोड, कर्जत ता. कर्जत,
जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेला दुकान गाळा व त्या दुकान गाळ्याचे विद्यमान मालक/कब्जेदार जमीर जहुर टाके यांचेकडून आमचे अशिल यांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे व सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या दुकान गाळा मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे - चेंढरे ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ११३ अ, हिस्सा नं. १ब या मिळकतीवरील भास्कर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित चेंढरे अलिबाग मधील दुकान गाळा नं. ०३, क्षेत्र २२५ चौ.फुट बिल्टअप् (२०.९१ चौ.मी.) ज्याचा ग्रामपंचायत चेंढरे मालमत्ता /मिळकत क्र. ११२१/३ ही दुकान गाळा मिळकत या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

वर नमुद केलेल्या सदर दुकान गाळ्यावर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, करार-मदार, दावा, खरेदीखत, साठेकरार, अखत्यारपत्र अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तिने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरचा दुकान गाळा हा पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.
कळावे.

अलिबाग,
तारीख : ०५/०४/२०२६

**ॲड. सागर विजय पाटील**
पत्ता मु. घर नं. १६०६, लालबाग,
ब्राम्हण आळी, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९९२२५६७८९१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे महाळुंगे बुद्रुक, ता. मुरुड, जि.रायगड येथील खालील वर्णनाची बागायत जमीन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| महाळुंगे बुद्रुक, ता.मुरूड, | ३०/२ | जिरायत ०-१७-७० पो.ख. ०-०१-०० एकुण ०-१८-७० | ३.३१ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्री अद्वैत रमेश जोशी, श्रीम. अपर्णा रमेश जोशी, सौ. स्नेहा शैलेश पुजारे, श्री. गणेश शंकर सावंत, सौ. साक्षी प्रफुल्ल सावंत यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेस त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक - ०४/०४/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस - लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर
समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे की महागाव, ता.सुधागड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. योगेश सरदारमल राठोड व श्री. राजेश सरदारमल राठोड यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./ गट न./ हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| महागाव | ७४ | ०.५०.०० पो.ख. ०.३१.०० एकूण क्षेत्र ०.८१.०० | ०.१४ |

वरील संपुर्ण क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
टिप : सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही/-
ठिकाण : पेण
दि. ०५/०४/२०२६

**ॲड हेमा ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो. नं.९८२२०३०३८९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बागदांडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक श्री. गुरुमीतसिंह मनोहरसिंह धोदी व श्री. सिराज केशु जगतीयानी यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १) बागदांडा | ८ | ०-०७-६० | ०.७५ |
| २) बागदांडा | ४० | ०-३६-२० | ३.६३ |
| ३) बागदांडा | ४९ | ०-२६-८० | २.७५ |
| ४) बागदांडा | ५० | ०-३१-९० | ३.०६ |

तसेच त्यामध्ये असलेल्या ग्रुप ग्रामपंचायत मिळकतखार मालमत्ता क्र. ४३९, ४४० आणि ४४१ या इमारती.

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ४/४/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,

**महाराष्ट्र शासन**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था पनवेल यांचे कार्यालय
कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, ए-विंग, पहिला मजला, सहकार नगर,
मार्केट यार्ड पनवेल, दूरध्वनी क्र.:- ०२२२७४५२९८३
email : arcspanvel@rediffmail.com

जा.क्र.सनिप/वि-२/१०१/वसुल/५४९/सन २०२५-२६ दि.०५/०३/२०२६
प्रति,
रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग — अर्जदार बँक
शाखा पनवेल, जि. रायगड
विरुद्ध
१. श्री. मनोज यशवंत साळवी
मु. सिद्धेश्वर होम्स को ऑफ. हौ. सो.
प्लॉट. १४२, से. १ई, रूम नं. ३०४,
कलंबोली, ता. पनवेल, जि. रायगड.
२. श्री. अशोक रामभाऊ रेपाळे — जाब देणार
मु. सिद्धेश्वर होम्स को. ऑफ. हौ. सो.
प्लॉट. १४२, से. १ई, रूम नं. १०२,
कलंबोली, ता. पनवेल, जि. रायगड.
३. श्रीमती. दीपाली पोपट नरवडे
मु. एल. आय. जी. सेकंड, से. २ई,
रूम नं. एच/४० कलंबोली, ता. पनवेल, जि. रायगड
४. श्रीमती. तुळसाबाई चाहू पाटील (तारणदार)
मु.पो. नावडे, दत्त मंदिर जवळ, ता. पनवेल, जि. रायगड.

वसूल पात्र रक्कम रु. २९३०८४/-

तुम्हांस नोटीस देण्यात येते की,
१) ज्या अर्थी दि. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग जि. रायगड यांनी दिनांक ०६/०१/२०२६ रोजी तुमचे विरूद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १०१ प्रमाणे वसुलीचा दाखला मिळणे रितसर अर्ज या कार्यालयाकडे दाखल केलेला आहे. आणि

**श्रीम.भारती काटूळे**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, पनवेल.**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,
आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुशिल बाळकृष्ण गुरव यांचेकडुन खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे झिराड ता.अलिबाग, जि. रायगड येथील**

| गट क्रमांक | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| ४२१ | ०-१६-९० | ३.६० |

सदर मिळकतींपैकी श्री. सुशिल बाळकृष्ण गुरव यांचा अविभक्त हिस्सा.

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक ०६/०४/२०२६

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
''अन्नपूर्णा'', मु. पो. धोकवडे,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते कि, खालील वर्णनाची जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. चेतन प्रभाकर वावेकर वगैरे-२ यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी चालू आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| काचळी | ३१२ | ०-३५-४० ०-०१-३० एकूण क्षेत्र ०-३६-७० | ५.३१ |

यापैकी क्षेत्र ०-१८-३५ हे.आर. इतके क्षेत्र या जाहीर नोटीशिचा विषय आहे.

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी दिलेला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकारार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, व हितसंबंध वा दुरान्वये संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार याजकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.०५/०४/२०२६

**ॲड. वैभव गिरीधर पाटील**
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मु.सांबरी, पो. कुर्डुस, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ८८०५५१८०६८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे - गुढवण, ता-कर्जत, जि-रायगड येथील मिळकत त्या मिळकतींचे मालक १. श्री. सौरभ सुमंत पटवा, २. श्री. कल्याण सौरभ पटवा व ३. श्री. ज्योमेश महासुखलाल शहा यांच्याकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :

| सर्व्हे. नं. | हिस्सा. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| २७ | १० | खाते.नं.२२७ चे संपुर्ण क्षेत्र १.३०.०० | ०.५९ |
| २७ | १६ | खाते नं.२२७ चे संपुर्ण क्षेत्र ०.५९.०० | ०.२५ |
| २७ | १४/अ | खाते नं. १७२ चे संपुर्ण क्षेत्र ०.९७.०० | ०.५८ |

सदर मिळकतीच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि: ०५/०४/२०२६

वकील
**ॲड. सचिन संजय सुर्वे**
पत्ता: नाथ सदन, आमराई रोड,
हॉटेल आर्शिवाद शेजारी, ता. कर्जत,
जि. रायगड, ४१०२०१
मो. नं ९०२८५४६७५१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली विद्यमान मालक यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे अशिल यांच्याबरोबर चालु आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं./ गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| तलवडे, ता.अलिबाग | २७२/१ | जिरायत ०-२०-१० वरकस ०-५४-०० पो.ख.०-०५-९० एकूण क्षेत्र ०-८०-०० | ४.४९ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. अमर अशोक घरत**
मोबा.नं. ७७९८९३०७०८
८८०५०३७४७४

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **जाहिरात : 'विहीर' आपल्या शेती, वाडी, बंगला सोसायटीत पाण्याच्या** सोयीसाठी RCC रिंगाची विहीर बनवून घेण्यासाठी संपर्क करा. रणजित पाटील. फोन : ९८३४३०३९४१, ९८८१६३७०४७ अलिबाग
- **सर्व प्रकारचे आजार लठ्ठपणा**/मधुमेह/संतानप्राप्ती/घरबसल्या लाखो कमविण्यासाठी (वेळ ठरवूनच) डॉ. नथुराम शिहू (नागोठणे-पोयनाड) रायगड ४०२१०६/७५०७१६६०१५
- **झिराड आणि मांडवा येथील** दुकानात पीकअप आशयर व ४०७ वर ड्रायवर हवे आहेत. संपर्क - ८००७८९३२३२
- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **रेडस्टोन हॉलिडे होम अँड स्पा या** रिसॉर्टसाठी वेटर आणि हाऊसकिपींग या कामासाठी पुरूष कामगार हवे आहेत. राहण्याची व जेवण्याची व्यवस्था केली जाईल. पगार -१३००० रूपये **संपर्क** : ७७९८२४१०४०
- ***JOB VACANCY*** अलिबागमध्ये दवाखान्यात कामाला नर्स/रिसेपशनिस्ट व ड्रायव्हर पाहिजे. अधिक माहितीसाठी संपर्क करा. ८८०६१८४३०२
- **अलिबागमध्ये आर्किटेक्चर** ऑफिसमध्ये कॉम्प्युटर्सचा अनुभव असलेली मुलगी पाहिजे. संपर्क : ९२७०८२७८२९/९४२२०९४१५१
- **अलिबाग तालुक्यातील कुर्डूस** हद्दीमध्ये पोयनाड नागोठणे रस्त्यालगत आंबा, नारळ, चिकूची, झाडे असलेली १ एकर जागा विकणे आहे. लाईट, पाणी, रस्ता उपलब्ध मो.९२८४५०६०४१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

- **मेष** : मन अस्थिर राहील. कामाचा बोजा वाढेल. शारीरिक श्रम जास्त होतील.
- **वृषभ** : शासकीय कामे मार्गी लागतील. प्रतिष्ठित व्यक्तीच्या ओळखीचा फायदा होईल.
- **मिथुन** : मनाविरुद्ध वागावे लागेल. काही काळ चिडचिड वाढेल. संततीचे सुख मिळेल.
- **कर्क** : जुन्या आठवणीत रमून जाल. गुंतवणुकीत वाढ कराल. प्रकृतीकडे लक्ष द्यावे लागेल.
- **सिंह** : कामात दगदग होईल. मन भावनिक होईल. संततीबद्दल शुभवार्ता समजतील.
- **कन्या** : लिखाणाद्वारे प्रसिद्धी मिळेल. तुमच्या शब्दास मान मिळेल. आप्तेष्टांच्या भेटी होतील.
- **तूळ** : आपली मते इतरांवर लादू नका. व्यवहारात फसण्याची शक्यता. नकारात्मक विचार सोडा.
- **वृश्चिक** : काहींना परदेशगमनाचे योग. फायदेशीर व्यवहार होतील. दक्ष राहून सही करा.
- **धनु** : घरात कुरबुरी वाढतील. मानसिक थकवा निर्माण होईल. संतती सुख देईल.
- **मकर** : संवादामुळे लोकांची मने जिंकाल. लोकप्रियतेत वाढ होईल. संततीशी, ज्येष्ठांशी मतभेद होतील.
- **कुंभ** : जबाबदारीच्या कामाने डोकेदुखी वाढेल. उत्साहाचा अभाव जाणवेल. मन शांत ठेवा.
- **मीन** : घरगुती कार्यक्रमाचे व्यवस्थापन उत्तम कराल. अपेक्षा पूर्ण होतील. अहंकार जागृत होईल.

ब्युटी टॉक

## नखांच्या सौंदर्यासाठी...

* पिवळ्या पडलेल्या नखांवर लिंबाचा रस लावता येईल. लिंबातल्या क जीवनसत्त्वामुळे नखांचा पिवळेपणा दूर होतोच शिवाय ती छान वाढतात. चमचाभर लिंबाचा रस घ्या. त्यात तीन चमचे ऑलिव्ह आईल घाला. हे मिश्रण थोडं गरम करून घ्या. नियमित नखांवर लावा. * सतत नेल पॉलिश लावल्यामुळे किंवा इतर काही कारणांनी पिवळ्या पडलेल्या नखांवर टूथपेस्ट लावा. थोडी टूथपेस्ट नियमित नखांवर लावा. १५ ते २० मिनिटांनी हात धुवून टाका. यामुळे नखांचा पिवळेपणा निघून जाईल. * नखं वरचेवर तुटत असतील तर दररोज रात्री झोपण्याआधी बोटं सरसोच्या तेलात बुडवून ठेवा. ही कृती नियमित केल्याने नखांना बळकटी मिळेल. * मुख्य नखाच्या आत दुसरं नखं वाढतं. अनेकांना ही समस्या भेडसावते. यामुळे थोडं ओशाळल्यासारखं वाटतं. ही समस्या सोडवण्यासाठी गरम पाण्यात अर्धा कप ॲपल सिडर व्हिनेगार घालून त्यात हात, पाय बुडवून ठेवा. २० मिनिटांनी हात, पाय साध्या पाण्याने धुवून टाका. आठवड्याभरात तुमची ही समस्या दूर होईल.

## ५ एप्रिल

दिनविशेष

- २०१३ : राही सरनोबत विश्वकरंडक नेमबाजी स्पर्धेत सुवर्णपदक विजेती.
- २०१५ : 'लार्ज हॅड्रॉन कोलायडर' पुन्हा सुरू.
- २०१६ : पठाणकोटवरील हल्ला भारतानेच घडवल्याचा पाकिस्तानचा कांगावा.
- २०१७ : उत्तर कोरियाची मध्यम पल्ल्याच्या बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांची चाचणी.
- २०१८ : बांग्लादेशातील 'अन्सारउल बांगला टीम' या दहशतवादी संघटनेत सक्रिय असणाऱ्या पाच बांगलादेशी नागरिकांच्या पोलीस कोठडीत वाढ.

टेक फन

## रोबोंच्या अजब दुनियेत

* जपानमधल्या प्राचीन बौद्ध मंदिरात रोबो बौद्ध धर्माचं शिक्षण देतो आहे. या रोबो माँककडून धर्मशिक्षण घेणाऱ्या बौद्ध भिक्षूंची संख्या मोठी आहे. हा रोबो बनवण्यासाठी तब्बल ५.६ कोटी रुपये खर्च आला. या रोबोचं तोंड माणसासारखं असून तरुणांना आकर्षित करण्यासाठी तो तयार करण्यात आला आहे.

* जगात अनेक ठिकाणच्या रेस्टॉरंटमध्ये रोबो वेटरचं काम करत आहेत. भारतातही अशी रेस्टॉरंट्स आहेत. हैदराबादमधल्या एका रेस्टॉरंटमध्ये वेटर म्हणून माणसं नाहीत तर रोबो काम करत आहेत. त्यांना ब्युटी सर्व्हिंग रोबो हे नाव देण्यात आलं आहे.

* रोबो पोलीस म्हणून काम करणार आहे. केरळच्या पोलीस दलात सब-इंस्पेक्टर म्हणून रोबोची नियुक्ती करण्यात आली असून हा भारतातला पहिला पोलीस रोबो आहे. केपी-बॉट हे त्याचं नाव असून तो पोलिसात दाखल झालेला जगातला चौथा रोबो आहे.

### पंचांग

**रविवार, ५ एप्रिल २०२६**
विश्वावसूनासंवत्सर, शके १९४७,
चैत्र कृ. ३ (सं. चतुर्थी, इस्टर सनडे),
चंद्रराशी : तूळ,
नक्षत्र : उत्तरा, योग : ध्रुव,
सूर्योदय ६.३२, सूर्यास्त ६.५१

### फॉरवर्ड्स

**हज़ारों अच्छाइयों क़ी क़ोई रसीद नहीं होतीं...**

**पर एक़ ग़लती क़ा पूरा हिसाब ऱखा जाता हैं...!**

आरोग्यमंत्र

## वापरा ऑर्गेनिक कपडे

आरोग्याप्रती सजगता असण्याच्या या काळात गडद रंग आणि रसायनयुक्त प्रक्रिया केलेलं कापड नाकारणारा एक मोठा वर्ग तयार होत आहे. त्याऐवजी हँडमेड कॉटन, बांबूच्या सालापासून तयार केलेलं कापड अशा प्रकारच्या इको फ्रेंडली कपड्यांचा ट्रेंड वाढत आहे. या ट्रेंडविषयी...

* ऑर्गेनिक फॅशन प्रदूषणावर नियंत्रण राखण्याच्या कामी येते. टेक्स्टाईल डाईंग प्रक्रियेमुळे ग्लोबल वॉर्मिंगचा धोका वाढू शकतो. म्हणूनच



वनस्पतीजन्य रंगांचा वापर करुन रंगवलेले ऑर्गेनिक कपडे फॅशनप्रेमींच्या पसंतीस उतरत आहेत.

* या हर्बल फॅशनमध्ये कार्बनिक कॉटन, बांबू फॅब्रिक अथवा हाताने कातलेल्या खादीचा वापर होतो. रंगही नैसर्गिक असतात. म्हणूनच त्वचेसाठी हे कापड सर्वात योग्य समजलं जातं. त्यापासून कोणतीही ॲलर्जी उद्भवत नाही. उन्हाळ्याच्या दिवसात ऑर्गेनिक कपडे आरामदायी ठरतात.

* ऑर्गेनिक प्रोसेस ही एक दीर्घ प्रक्रिया आहे. निर्मिती अवस्थेतून ग्राहकांच्या हाती पडेपर्यंत कापडाची किंमत वाढते. मात्र आराम आणि आरोग्याचा विचार करता बरेच लोक या कापडाला प्राधान्य देत आहेत.

* साधेपणा आणि सौंदर्य यांचा उत्तम मिलाफ दिसत असल्यामुळे संस्कृतीचं जतन करण्याच्या हेतूनेही ऑर्गेनिक फॅब्रिककडे ओढा वाढत आहे. तेव्हा या उन्हाळ्यात तुम्हीही अशा प्रकारचे कपडे वापरा आणि ट्रेंडी लूकबरोबरच आरोग्याचीही काळजी घ्या.

### भटकंती

फिरायला जायचं ठरल्यावर पाचगणी आणि महाबळेश्वरला अनेकांची पसंती असते. काही निवांत क्षण अनुभवायचे असतील तर तुम्ही महाबळेश्वरपासून जवळ असलेल्या तापोळ्याला जाऊ शकता. या ठिकाणाला पश्चिम घाटाचं मिनी काश्मिर म्हटलं जातं. यावरूनच इथल्या सौंदर्याची कल्पना येईल. पुण्यापासून अवघ्या १५० किलोमीटर अंतरावर हे ठिकाण असल्याने बाईक किंवा गाडीने प्रवास करता येईल. मित्रमंडळींसोबत बाईकने जाताना खूप मजा येईल. वाटेतलं निसर्गसौंदर्य न्याहाळत, टपरीवरचा चहा पित मस्त भटकंती करता येईल. **(क्रमशः)**

करिअरवाटा

## सजावटीतील तज्ज्ञ व्हा

सध्या इंटेरियर डेकोरेटर्सना नानाविध संधी उपलब्ध झाल्या आहेत. शिवाय याविषयीचे अभ्यासक्रमही सहज उपलब्ध आहेत. त्यामुळेच बारावी सायन्स झाल्यानंतर एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम, तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आणि पदवीनंतरची दोन वर्षे पदव्युत्तर अभ्यासक्रम



यापैकी सुयोग्य पर्यायाची निवड करुन या क्षेत्रात प्रवेश करणं शक्य आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या तरुणांना आर्किटेक्टच्या कार्यालयामध्ये नोकरी मिळू शकते. स्वतःचा व्यवसाय सुरू करणंही सहजशक्य आहे. त्यासाठी फारशा भांडवलाचीही गरज भासत नाही आणि मोठा नोकरवर्गही सांभाळत बसावं लागत नाही. हा अभ्यासक्रम पूर्ण करणारे तरुण केवळ घरांचीच नव्हे तर औद्योगिक संस्था, व्यावसायिक कार्यालयं, शाळा, रुग्णालयं, हॉटेल आदींचीही रचना व सजावट करु शकतात. उपलब्ध जागेचा चांगला, कार्यक्षम आणि सुंदर वापर करण्याचा प्रश्न येतो त्या त्या प्रत्येक ठिकाणी इंटेरियर डेकोरेटर आपली भूमिका बजावू शकतो. कमर्शियल डिझायनिंग हाही याच व्यवसायाचा एक भाग आहे. बहुतेक विद्यापीठांमध्ये इंटेरियर डेकोरेटरचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

खेचाखेची

## डोळे आणि दात

**पती** : देवाने दोन डोळे दिले आहेत ना, तरी तुला तांदळातले खडे काढता येत नाहीत?

.

.

.

**पत्नी** : मला दोन डोळे दिले आहेत तसे तुम्हाला पण ३२ दात दिले आहेत. मग तुम्हाला २/४ खडे चावता येत नाहीत?

### वेगळं काही

नायजेरियाचे माजी कृषीमंत्री ओदू ओगबेह यांच्या दाव्यानुसार नायजेरियातले श्रीमंत लोक चक्क लंडनमधून पिझ्झा मागवतात. स्टेटस म्हणून ते एवढ्या लांबून पिझ्झा ऑर्डर करत असल्याचं त्यांचं म्हणणं आहे. ब्रिटन नायजेरियापासून ६४४० किलोमीटर लांब आहे. मग इथून पिझ्झा येतो तरी कसा? इथले लोक रात्री पिझ्झाची ऑर्डर देतात. सकाळी ब्रिटिश एअरवेजच्या विमानाने पिझ्झा पोहोचता केला जातो. अर्थात ही कृती योग्य नसल्याचं ओगबेह यांचं म्हणणं आहे. नायजेरियात बऱ्याच गोष्टी आयात होतात. काही लोक तांदूळ आणि इतर पदार्थही आयात करून खातात. मात्र श्रीमंतांनी हा प्रकार थांबवायला हवा असं त्यांचं म्हणणं आहे.

ॲक्सेसरीज

## सनग्लासेस निवडताना...

उन्हाचा तडाखा वाढत असताना सनग्लासेसच्या वापराला पर्याय नसतो. पण गॉगल चेहऱ्याला साजेसा असावा. याविषयी...

* स्टायलिश आणि बोल्ड लूक हवा असेल तर हार्ट शेप सनग्लासेस हा सर्वोत्तम पर्याय आहे. समर पिकनिकसाठी कूल लूक हवा असल्यास या प्रकारचा गॉगल निवडा. * चेहऱ्याला उठावदार लूक द्यायचा असेल तर कॅट आय सनग्लासेस वापरा. या सनग्लासेसमुळे व्यक्तिमत्त्व उजळतं. * ग्लॅमरस लूक मिळवायचा असेल तर ओव्हरसाईज्ड सनग्लासेस वापरा. पण फ्रेमची निवड करताना चेहऱ्याचा आकार लक्षात घ्या. * नवीन गोष्टी स्वीकारताना जुन्या मागे टाकून कसं चालेल? तुम्हीही याच मताच्या



असाल तर व्हिंटेज राऊंड सनग्लासेस आवर्जून वापरा. * समर पार्टीचा प्लॅन असेल तर ग्लिटर सनग्लासेसमुळे तुमच्या लूकला आगळं ग्लॅमर येईल याची खात्री बाळगा. तुम्ही पार्टीत सगळ्यांची वाहवा मिळवाल. * स्त्री आणि पुरूष दोघांसाठीही ब्रो लाईन सनग्लासेस हा प्रकार परफेक्ट आहे. यामुळेही आकर्षक लूक मिळण्यास मदत होते.

## सुडोकू ८८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३ | ८ | | | ७ | | | ५ |
| २ | | ७ | | | | ८ | | ३ |
| ५ | | | १ | | | २ | | |
| | | ४ | २ | ९ | ८ | | | |
| | ८ | ५ | | | | ३ | २ | |
| | | | ७ | ३ | ५ | ६ | | |
| | | २ | | | ६ | | | ८ |
| ४ | | ६ | | | | ५ | | २ |
| ८ | | | ४ | | | ७ | ६ | |

टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ८७चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ८ | ५ | ४ | १ | ७ | ६ | ९ | २ |
| २ | ९ | ७ | ८ | ३ | ६ | ५ | ४ | १ |
| ६ | १ | ४ | ५ | ९ | २ | ८ | ३ | ७ |
| १ | ६ | ९ | ३ | २ | ४ | ७ | ५ | ८ |
| ५ | ३ | २ | ६ | ७ | ८ | ४ | १ | ९ |
| ७ | ४ | ८ | ९ | ५ | १ | २ | ६ | ३ |
| ४ | ५ | ३ | २ | ८ | ९ | १ | ७ | ६ |
| ९ | २ | १ | ७ | ६ | ५ | ३ | ८ | ४ |
| ८ | ७ | ६ | १ | ४ | ३ | ९ | २ | ५ |

## शब्दकोडे क्रमांक ८८

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | | ६ | | ७ | ■ | ८ | | ९ | १० |
| ■ | ११ | | १२ | | | ■ | | ■ | १३ | | | ■ | १४ | |
| १५ | | ■ | | ■ | १६ | १७ | | १८ | | ■ | १९ | २० | | ■ |
| २१ | | २२ | ■ | २३ | ■ | | ■ | २४ | | २५ | | | ■ | २६ |
| | ■ | | ■ | २७ | २८ | | २९ | | ■ | | ■ | ३० | ३१ | |
| ■ | ३२ | | ३३ | ■ | | ■ | | ■ | ३४ | ■ | ३५ | | | ■ |
| ३६ | | ■ | ३७ | ३८ | | ३९ | | ■ | ४० | ४१ | | ■ | ४२ | ४३ |
| ४४ | | ४५ | ■ | | ■ | | ■ | ४६ | | | ■ | ४७ | ■ | |
| | ■ | ४८ | ४९ | | | | ५० | | ■ | ५१ | ५२ | | ५३ | |
| ५४ | | ■ | ५५ | | ■ | ५६ | | ■ | ५७ | | | ■ | ५८ | |
| | ■ | ५९ | | ■ | ६० | ■ | ६१ | | | ■ | ६२ | ६३ | | ■ |
| ■ | ६४ | | ■ | ६५ | | | | ■ | ६६ | | ■ | | ■ | ६७ |
| ६८ | ■ | ६९ | | | | ■ | ७० | | | ■ | ७१ | | ७२ | |
| ७३ | ७४ | ■ | ■ | ७५ | | ७६ | | ■ | ■ | ७७ | | ■ | ७८ | |
| ७९ | | | | | ■ | | ■ | ८० | | | | | | ■ |

**आडवे शब्द :-**
१) देवालय
४) हालचाल
८) समुद्राकडून जमिनीकडे वाहणारे वारे
१०) विलासमंदिर
१३) ओकारी
१४) चामखीळ
१५) नातेवाईक
१६) तृषित
१९) वस्तू, माल
२१) मुलांच्या गळ्यात घालण्याचा एक अलंकार
२४) पुरापुरा अंदाज
२७) खर्चात कपात
३०) खिळे टोकण्याचे हत्यार
३२) वाळवी
३५) हुक्की, लहर
३६) बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
३७) अकारण
४०) गीत
४२) मच्छर
४४) भाजलेल्या कोवळ्या धान्याच्या कणसातील दाणे
४६) पवित्र
४८) मागून येणाऱ्या माणसाला महत्व मिळणे या अर्थाच्या म्हणीचा पूर्वार्ध
***** ** अन तिखट झाली
५१) अत्यंत तिखट मसालेभात
५४) चक्र
५५) अनेक दिवस चालणारा यज्ञ
५६) बशीचा जोडीदार
५७) शोभणारा
५८) मनाचा ओढा
५९) चुलता
६१) सैन्याचा तळ, होडी
६२) उपस्थिती
६४) गावाची सरहद्द
६५) फुरसत
६६) फणसाचा एक प्रकार
६९) अंतःपूर
७०) सूर्याचे एक नाव
७१) उत्सवाचे दिवस
७३) आईचा भाऊ
७५) मनात कपट ठेऊन बाहेरून गोड बोलणारा
७७) न वापरलेला
७८) नेहमी
७९) संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
८०) किरकोळ सामान

**उभे शब्द :-**
२) विलंब, उशीर
३) अंगातील मस्ती, जोम
४) आसाममधील पेय पीक
५) संगीतातील एक राग
६) वागणूक
७) आश्चर्याची गोष्ट
८) स्वयंपाकी
९) बुटका, विष्णूचा एक अवतार
१०) शर्यत (इं.)
१२) प्रचंड, अवाढव्य
१५) एक तारवाद्य
१७) सोने
१८) क्ष किरण(इं.)
२०) मारझोड
२२) शोध, माग
२३) फुकट, व्यर्थ
२५) अमृत
२६) छोटी वस्ती
२८) पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
२९) चंदन उगाळण्याचा दगड
३१) आखूड, कमी
३२) खबदाडी
३३) सूर्यनमस्कारातील सूर्याचे एक नाव
३४) नाला, ओढ्यावरील पूल
३५) वर्ष, साल
३६) अतिथीचे स्वागत
३८) अगदी कमी, नावाला
३९) दात
४१) सिंह
४३) सपाट
४५) दरोडा
४६) एक प्राचीन भाषा
४७) कर्ज
४९) नासलेला
५०) आपला परका अशी भावना
५२) डुक्कर
५३) ज्वारी/बाजरीचा एक पदार्थ
५७) कर्ज देणारा
५९) बैलाच्या गळ्यात बांधण्याचा दोर
६०) हिंमत, धैर्य
६३) भोजन
६५) दुर्लक्ष, अपमान
६७) सरस्वती
६८) पुष्कळ
७१) सोन्या-चांदीचा व्यापारी
७२) दिवस
७४) मत्स्य, मीन
७६) शपथ
७७) चंद्राची कड

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वा | य | स | | ग | ळे | का | पू | | ज | व | स | | का | ल |
| य | | म | नो | ज | | स | | ध | न | | ट | पा | ल | |
| ल | ह | र | | रा | म | रा | म | | न | वा | र | | वा | र्ता |
| | ज | | जा | ज | म | | न | र | म | | फ | टा | का | |
| ग | र | मा | ई | | ता | ड | न | | र | पे | ट | | ल | ता |
| ग | | स्त | | स | | र | | र | ण | | र | मा | व | र |
| न | ग | र | से | व | क | | फा | या | | हो | | न | | ण |
| भे | ळ | | व | त | न | दा | र | | रा | म | दा | स | | हा |
| दी | | भा | क | | क | र | क | री | त | | द | | क | र |
| | प | ट | | ना | ना | | त | | सा | ख | र | झो | प | |
| आ | ळ | | न | व | रा | त्र | | व | र | | | पा | ट | व |
| | वा | स | व | | य | | क | क्ष | | सा | व | ळा | | ल |
| सा | ट | | रा | ख | ण | दा | र | | रा | ज | स | | पा | य |
| व | | पो | | न | | स | व | ल | त | | व | र्त | न | |
| ज | न | क | ज | न | नी | | त | | वा | र | स | | क | र्ण |

# युध्दाचे जागतिक परिणाम दिसू लागले...

**पश्चिम आशियामधील अस्थिरतेमुळे निर्माण झालेले ऊर्जासंकट जागतिक स्वरूप धारण करत असून सर्वच देशांना त्याचे दूरगामी परिणाम भोगावे लागत आहेत. इंधन दरवाढ, पुरवठ्यातील अनिश्चितता, वाढती महागाई ही सामान्यजनांच्या दैनंदिन जीवनातील वेदना बनली आहे. उद्योगधंदे मंदावले आहेत, उत्पादन खर्च वाढला आहे आणि जागतिक व्यापाराच्या चक्राला अचानक ब्रेक लागल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे.**



**नंदकुमार काळे**

पश्चिम आशियामध्ये उफाळलेल्या संघर्षाने केवळ त्या प्रदेशापुरते मर्यादित परिणाम घडवलेले नाहीत, तर संपूर्ण जगाच्या आर्थिक, राजनैतिक आणि ऊर्जा व्यवस्थेच्या मुळावरच घाव घातला आहे. पश्चिम आशियामधील अस्थिरतेमुळे निर्माण झालेले ऊर्जा संकट आता जागतिक स्वरूप धारण करत असून सर्वच देशांना त्याचे दूरगामी परिणाम भोगावे लागत आहेत. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ, पुरवठ्यातील अनिश्चितता आणि त्यातून निर्माण झालेली महागाई ही केवळ आकडेवारी नाही, तर सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील वेदना बनली आहे. उद्योगधंदे मंदावले आहेत, उत्पादन खर्च वाढला आहे आणि जागतिक व्यापाराच्या चक्राला अचानक ब्रेक लागल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे. ही परिस्थिती दीर्घकाळ टिकल्यास उद्योगधंदे ठप्प होणे, बेरोजगारीमध्ये वाढ आणि सामाजिक असंतोष या सर्वांचा एकत्रित परिणाम अधिक गंभीर स्वरूपात पुढे येईल, यात शंका नाही. या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भूमिका आणि कृतीमध्ये सातत्याचा अभाव स्पष्टपणे जाणवतो. एका बाजूला ते इराणविरोधात कठोर भूमिका घेत धमक्या देतात, तर दुसऱ्या बाजूला युद्धविरामाचे प्रस्ताव मांडतात. अशा परस्परविरोधी धोरणामुळे त्यांच्या नेतृत्वापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये विश्वास हेच सर्वात मोठे भांडवल असते आणि तेच भांडवल ट्रम्प यांच्या बाबतीत कमी पडताना दिसते.

ट्रंप यांनी इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवरील हल्ले काही काळासाठी स्थगित करण्याची घोषणा केली. त्यानंतर ती मुदत वाढवली. नंतर थेट इराणमध्ये पन्नास हजार सैनिक उतरवल्याचे म्हटले. या घोषणांमागे दीर्घकालीन धोरणात्मक स्पष्टता दिसली नाही. अमेरिकेने युद्ध थांबवण्याच्या आवाहनावर इराणने १५ कलमी युद्धविराम प्रस्ताव मांडत पाच अटीही पुढे केल्या, परंतु या प्रस्तावांमुळे संवादाची दारे उघडण्याऐवजी अधिक गुंतागुंत निर्माण झाली, कारण दोन्ही बाजूंमध्ये विश्वासाचा अभाव हा सर्वात मोठा अडसर ठरतो आहे. इराणने होर्मुजची सामुद्रधुनी या अत्यंत महत्त्वाच्या सामुद्रधुनीवर आपले वर्चस्व प्रस्थापित करून अमेरिकेवर आणि जागतिक समुदायावर दबाव टाकण्याचा मार्ग स्वीकारला आहे. ही सामुद्रधुनी जगातील मोठ्या प्रमाणातील तेलवाहतुकीचा कणा मानली जाते. ती बंद झाल्यास ऊर्जासंकटाचे रूपांतर आर्थिक आपत्तीत होण्यास वेळ लागणार नाही. या संकटावर तोडगा काढण्यासाठी अमेरिका विविध देशांच्या माध्यमातून मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करत आहे. इजिप्त, तुर्की आणि पाकिस्तान यांचा त्यात समावेश आहे. विशेषतः पाकिस्तानचा सहभाग हा भौगोलिक आणि धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचा मानला जात असला, तरी त्याची आंतरराष्ट्रीय विश्वासार्हता मोठ्या प्रमाणात संशयाच्या भोवऱ्यात आहे. त्यामुळेच पाकिस्तानमध्ये झालेल्या तीन देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांच्या कथित बैठकीतून हाती काही लागले नाही.

या संपूर्ण घडामोडींमध्ये भारताची भूमिका अत्यंत सूक्ष्म आणि महत्त्वपूर्ण आहे. ऊर्जा आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या भारतासाठी होर्मुज सामुद्रधुनी खुली राहणे ही अत्यावश्यक बाब आहे. भारताने एकीकडे अमेरिकेशी धोरणात्मक संबंध राखले आहेत, तर दुसरीकडे इराणसोबतही संतुलित संबंध ठेवले आहेत. त्यामुळे तो संभाव्य मध्यस्थ म्हणून पुढे येऊ शकतो; परंतु सध्या त्याचे प्राधान्य हे आपल्या ऊर्जासुरक्षेला आणि व्यापारमार्गांना सुरक्षित ठेवण्यावर केंद्रित असल्याचे दिसते. आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढती प्रतिष्ठा लक्षात घेता भारत या संकटात अधिक सक्रिय भूमिका बजावू शकतो, अशी अपेक्षा आहे. या युद्धात सर्वाधिक निराशाजनक बाब म्हणजे संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची निष्क्रियता. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, रशिया आणि चीन या पाच स्थायी सदस्यांनी बनलेली ही संस्था जागतिक शांतता राखण्यासाठी स्थापन करण्यात आली होती; परंतु प्रत्यक्षात या सदस्यांपैकीच एखादा देश संघर्षात गुंततो, तेव्हा ही संस्था पूर्णपणे निष्प्रभ ठरते. युक्रेनमधील संघर्षातही हीच परिस्थिती पहायला मिळाली होती आणि आता इराण-इस्रायल युद्धातही तीच पुनरावृत्ती होत आहे. या अपयशामुळे सुरक्षा परिषदेच्या अस्तित्वापुढेच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ही संस्था जागतिक संकटांवर प्रभावी तोडगा काढण्यात अपयशी ठरत राहिली, तर तिचे महत्त्व हळूहळू कमी होत जाईल आणि आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये एक मोठी पोकळी निर्माण होईल.

सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यांकडून सुधारणा करण्याची भाषा केली जाते; परंतु प्रत्यक्ष कृतीचा प्रकर्षाने अभाव जाणवतो. या पार्श्वभूमीवर भारतासाठी एक ऐतिहासिक संधी निर्माण झाली आहे. भारताने केवळ सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यत्वाची मागणी करण्यापुरते मर्यादित न राहता, त्या संस्थेच्या कार्यपद्धतीमध्ये मूलभूत बदल घडवून आणण्यासाठी पुढाकार घ्यावा. विशेषतः युद्धात सहभागी असलेल्या स्थायी सदस्यांना नकाराधिकार वापरण्यापासून रोखण्यासाठी ठोस यंत्रणा निर्माण करणे ही काळाची गरज आहे. भारताने आपल्या वाढत्या आर्थिक, लष्करी आणि राजनैतिक शक्तीच्या जोरावर या सुधारणांसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर जनमत तयार केले पाहिजे. रशिया, चीन, ब्रिटन आणि फ्रान्स यांनी एकत्र येऊन भारताच्या स्थायी सदस्यत्वाला पाठिंबा देणे भारतासाठीच नव्हे, तर जागतिक स्थैर्यासाठीही महत्त्वपूर्ण ठरेल. एकूणच, पश्चिम आशियातील संघर्ष हे केवळ प्रादेशिक युद्ध नसून जागतिक व्यवस्थेच्या मर्यादा उघड करणारा एक मोठा संकेत आहे. ऊर्जा संकट, आर्थिक अस्थिरता, राजनैतिक अपयश आणि आंतरराष्ट्रीय संस्थांची निष्क्रियता या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम जगभरातील सामान्य लोकांच्या जीवनावर होत आहे. त्यामुळे हे युद्ध तातडीने थांबवणे ही केवळ राजकीय नाही, तर मानवतेची गरज आहे. अन्यथा, या संकटाचे परिणाम अधिकच भीषण स्वरूप धारण करतील आणि जग एका नव्या अस्थिरतेच्या युगात प्रवेश करेल.

युद्ध बहुतेकदा सुरक्षा, सन्मान आणि राष्ट्रीय स्वाभिमानाच्या आवरणात सादर केले जाते; परंतु त्याच्या परिणामांमागे दडलेले वास्तव अत्यंत अस्वस्थ करते. रशिया आणि युक्रेन यांच्यात आधीपासून सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर आता जग इराण आणि इस्रायलदरम्यान वाढत चाललेल्या संघर्षाकडे पाहत आहे. त्यात अमेरिकेचीही सक्रिय सहभागिता आहे. वार आणि प्रतिवार यांच्या भीषणतेतून हे स्पष्ट होते की आधुनिक युद्ध सीमांपुरते मर्यादित राहत नाही, तर त्याची ज्वाला थेट निवासी भागांपर्यंत पोहोचते. शक्तीप्रदर्शनासाठी डागल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्रांचा मारा फक्त सामरिक ठिकाणांनाच लक्ष्य करत नाही, तर निष्पाप मनांनाही हादरवून सोडतो. हीच स्थिती रशिया आणि युक्रेनदरम्यान सुरू असलेल्या युद्धातूनही निर्माण झाली आहे. तिथे असंख्य कुटुंबांचे जीवन उद्‌ध्वस्त झाले आहे. ज्या शहरांमध्ये आणि गावांमध्ये कधी काळी जीवनाची चैतन्यपूर्ण धावपळ होती, तिथे आता विद्‌ध्वंसाचे भयाण शांततेचे सावट पसरले आहे. शेतांची हिरवाई बारूदी धुराच्या काळोखाने झाकली गेली आहे. सीमा बदलल्या जाऊ शकतात; पण ज्या मातांनी आपल्या लेकरांना युद्धात गमावले, त्यांच्या वेदना कमी होऊ शकतात का? एखादे राजकीय यश त्या निरागस बालपणाची भरपाई करू शकते का, जे स्फोटांच्या आवाजात हरवून गेले? युद्धाची राख केवळ इमारतींनाच झाकत नाही, तर विश्वास, स्थैर्य आणि उज्ज्वल भविष्याच्या शक्यतांनाही काळवंडून टाकते.

दक्षिण आशियातही परिस्थिती कमी चिंताजनक नाही. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्या सीमावर्ती भागात अधूनमधून उसळणारा तणाव त्या लोकांचे जीवन अस्थिर करतो, जे आधीपासूनच अनेक दशकांच्या असुरक्षिततेचा भार वाहत आहेत. निर्णय सत्ताकेंद्रांमध्ये घेतले जात असले, तरी त्यांचे परिणाम त्या खेड्यांमध्ये जाणवतात, जिथे लोक फक्त शांतता, रोजगार आणि सन्मानपूर्वक जीवन जगण्याची आकांक्षा बाळगतात. युद्धाची चाहूल लागताच शाळांचे दरवाजे बंद होतात, बाजारपेठांची गजबज ओसरते आणि सामान्य जीवनाची गतीच थांबल्यासारखी होते. ●●

# ‘वाडवाळ’ कृतज्ञतेचा, एकोप्याचा आणि संस्कृतीचा अमूल्य वारसा..

**धनंजय शेटये**

कोकणची भूमी म्हणजे निसर्गाचे एक मुक्त आणि मनमोहक वरदान. इथल्या लाल मातीचा सुगंध अंगभर दरवळत असतो, तर अथांग समुद्र आणि हिरव्यागार डोंगररांगांच्या कुशीत विसावलेली गावे मनाला एक वेगळीच भुरळ घालतात. आजच्या एकविसाव्या शतकात, जेव्हा जग आधुनिकतेच्या झगमगाटात स्वतःला हरवून बसले आहे, तेव्हाही ही कोकणची गावे आपल्या पूर्वजांच्या परंपरांच्या मुळाशी अत्यंत घट्ट रोवलेली दिसतात. याच मातीत पिढ्यानपिढ्या अतिशय श्रद्धेने जपली गेलेली एक सुंदर, अर्थपूर्ण आणि जिवंत परंपरा म्हणजे ‘वाडवाळ’.

स्थानिक बोलीत अत्यंत जिव्हाळ्याने ‘पॉस’ किंवा ‘राखण’ म्हणून ओळखली जाणारी ही परंपरा केवळ एका सामुदायिक भोजनाचा कार्यक्रम नाही; तर ती निसर्ग, ग्रामदेवता आणि गावकरी यांच्यातील हजारो वर्षांच्या अतूट नात्याची एक भावस्पर्शी अभिव्यक्ती आहे.

**निसर्गाप्रती आणि ‘राखणदारा’प्रती कृतज्ञतेचा हुंकार**

कोकणच्या या नयनरम्य, पण तितक्याच गूढ परिसराचा एक ‘राखणदार’ (स्थलदेवता) असतो, जो गावकऱ्यांचे अस्मानी आणि सुलतानी संकटांपासून रात्रंदिवस रक्षण करीत असतो, अशी इथल्या माणसांची अढळ श्रद्धा आहे. या अदृश्य पाठीराख्याच्या उपकारांची कृतज्ञता व्यक्त करणे, हे प्रत्येक कोकणवासीय आपले आद्य कर्तव्य समजतो. सासरी गेलेली माहेरवाशीण जेव्हा सुट्टीत गावी येते, तेव्हा तीदेखील आपल्या मुलाबाळांचा सांभाळ करणाऱ्या या राखणदाराची ‘राखण’ प्रतिवर्षी सालाबादप्रमाणे अत्यंत भक्तिभावाने देत असते. हा निसर्गापुढे आणि देवतेपुढे नतमस्तक होण्याचा एक सामूहिक नमस्कारच असतो.

**राईतली रांगडी मेजवानी आणि चुलीवरचा सुगंध**

निसर्गाच्या सान्निध्यात, एखाद्या निबीड जंगलात किंवा घनदाट वृक्षांच्या राईत रंगणाऱ्या या रांगड्या मेजवानीचे सर्वांत मोठे आकर्षण म्हणजे त्यातील साधेपणात दडलेला अस्सलपणा! चांदण्यांच्या मंद प्रकाशात शिजणाऱ्या चुलीचा धूर आकाशाकडे झेपावतो आणि त्यातून दरवळणारा मटणाचा किंवा गावठी कोंबडीच्या तर्रीदार रस्स्याचा सुगंध आसमंत मोहून टाकतो. या भोजनाची संपूर्ण जबाबदारी गावातील पुरुष मंडळी अत्यंत उत्साहाने आणि आनंदाने आपल्या खांद्यावर घेतात.

या जेवणात शहरी पार्ट्यांसारखी पदार्थांची रेलचेल नसतेपानावर असतो तो फक्त गरमागरम वाफाळता भात आणि झणझणीत रस्सा! पण या साध्या जेवणाची चव एखाद्या राजेशाही पंचपक्वान्नांनाही लाजवेल अशी अद्भुत असते. वाढणाऱ्यांच्या आग्रहात ओतप्रोत भरलेले प्रेम आणि खाणाऱ्यांच्या चेहऱ्यावरील समाधानाची ऊब, या अनुभवाला कायमचे अविस्मरणीय बनवते.

**परंपरेचा सात्विक साज आणि चाकरमान्यांची ओढ**

मे महिन्याच्या कडक उन्हाळ्यात जेव्हा शहरात नोकरी-धंद्यानिमित्त गेलेले ‘चाकरमानी’ गावाकडच्या ओढीने परततात, तेव्हा या सोहळ्याची रंगत अधिकच खुलते. प्रत्येक वाडीत एक चैतन्याचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होते, आणि संपूर्ण गाव एकाच भावनिक धाग्यात गुंफले जाते.

काही विशिष्ट ठिकाणी, जसे की नयनरम्य घाटी परिसरात होणारे वाडवाळ, हे त्यांच्या शिस्त, विधी आणि भव्यतेसाठी विशेष ओळखले जातात. येथे परंपरेला एक सात्विकतेची किनार असते. प्रथम स्थलदेवतेचे विधीवत आणि मंत्रोच्चारात पूजन केले जाते. त्यानंतर ब्राह्मणांच्या उपस्थितीत अत्यंत सात्विक असे ‘ब्राह्मणभोजन’ घातले जाते. देवतेला निमंत्रण देण्यापासून ते गाऱ्हाणे मांडण्यापर्यंतचे सर्व विधी परंपरेनुसार आणि अत्यंत आपुलकीने पार पडतात. या साऱ्या प्रक्रियेत गावातील लहानांपासून थोरांपर्यंत प्रत्येकाचा सहभाग असतोहीच या परंपरेची आणि गावच्या एकोप्याची खरी ताकद आहे.

**निखळ आनंदाची उधळण आणि एक महत्त्वाची जाणीव**

या भक्ती आणि परंपरेच्या सोहळ्यात आनंदाची एक अत्यंत खुमासदार आणि मिश्किल बाजूही दडलेली असते. धार्मिक विधी संपल्यानंतर काही मंडळी हळूच क्षणभर ‘अदृश्य’ होतात. पण जेव्हा पंगती बसण्याची वेळ येते, तेव्हा हीच मंडळी एका नव्या जोमाने आणि विलक्षण आत्म विश्वासाने पुन्हा प्रगट होतात! त्यांच्या अंगात संचारलेला उत्साह, तत्त्वज्ञानाने भरलेले पण थोडे अडखळणारे शब्द, चालताना लटपटणारे पाय आणि वरातीत किंवा कार्यक्रमात कधीमधी रंगात येऊन सादर होणारा प्रसिद्ध ‘नागीण डान्स’या सगळ्यांतून हास्याची आणि मनोरंजनाची एकच बरसात होते.हा क्षणिक विरंगुळा आणि स्वच्छंदीपणा जरी चेहऱ्यावर हसू आणणारा असला, तरी त्यातून एक अत्यंत महत्त्वाची जाणीवही उभी राहते. आनंद साजरा करताना स्वतःच्या आणि कुटुंबाच्या भविष्यासाठी मर्यादा जपणे तेवढेच महत्त्वाचे आहे. क्षणिक नशेच्या आहारी जाऊन आपले अमूल्य जीवन संकटात टाकण्यापेक्षा, शुद्ध आणि निर्मळ आनंद अनुभवण्यातच या परंपरेचे आणि जीवनाचे खरे सौंदर्य दडलेले आहे.

**आधुनिकतेच्या अंधारात संस्कृतीचा दीपस्तंभ**

आजच्या ‘पेज-३’ संस्कृतीच्या आणि रेव्ह पार्ट्यांच्या कृत्रिम झगमगाटात, जिथे अमानुषतेचा अतिरेक आणि मूल्यांची घसरण पाहायला मिळते, तिथे ‘वाडवाळ’सारखी अस्सल गावरान परंपरा म्हणजे जणू संस्कृतीचा एक प्रखर दीपस्तंभच आहे. ही केवळ पोटाची भूक शमवणारी मेजवानी नाही; तर माणसांना एकत्र आणणारा, जुने हेवेदावे आणि मनातील कटुता वितळवणारा आणि नात्यांची वीण अधिक घट्ट करणारा तो एक जिवंत झरा आहे.अशा मूल्यांची जोपासना करणाऱ्या परंपरांचे जतन आणि संवर्धन करणे, ही आजच्या काळाची सर्वांत मोठी गरज आहे. कारण, याच मातीच्या परंपरांतून आपल्या कोकणी संस्कृतीचे खरे सौंदर्य आणि माणुसकीचे खरे मूल्य पिढ्यानपिढ्या जिवंत राहणार आहे. ●●



# क्षमाशक्ती : सुंदर नात्यांचे आणि शांत मनाचे गुपित



**सुनील गवळी**

क्षमाशक्ती ही मानवी जीवनातील एक अत्यंत मौल्यवान आणि प्रभावी अशी गुणवैशिष्ट्य आहे. अनेक संत-महात्म्यांनी तिचे महत्त्व अधोरेखित केले आहे. राग हा जळत्या निखाऱ्यासारखा असतोतो इतरांना जाळण्याआधी आपल्यालाच होरपळतो; तर क्षमा ही मनाला शांतता देणारी, नात्यांना जपणारी आणि व्यक्तिमत्त्वाला उंचावणारी शक्ती आहे. मानवी जीवनात नाती हीच खरी संपत्ती असते. पैसा, पद, प्रतिष्ठा आणि यश या सर्व गोष्टी क्षणभंगुर असतात; पण सुख-दुःखात साथ देणारी माणसं कायमची असतात. ही नाती टिकवायची असतील, तर माफ करण्याची वृत्ती आपल्या स्वभावाचा भाग बनली पाहिजे. कारण चूक ही माणसाकडूनच होतेपूर्णत्व केवळ परमेश्वरात असते.

क्षमाशक्ती म्हणजे विसरणे नव्हे, तर समजून घेणे होय. ती कमजोरी नसून अंतर्मनातील ताकदीचे प्रतीक आहे. क्षमा म्हणजे दुसऱ्याच्या चुकीला मान्यता देणे नाही, तर त्या चुकांपलीकडे जाऊन नातं जपण्याची तयारी ठेवणे होय. आपल्याला दुखावणाऱ्याला प्रत्युत्तर देणं सोपं असतं; पण शांत राहून त्याला समजून घेणं ही खरी कसोटी असते. म्हणूनच क्षमा ही केवळ भावना नसून एक साधना आहे. ज्या व्यक्तीमध्ये क्षमाशक्ती असते, तिचा अहंकार कमी होतो आणि समजूतदारपणा, संयम व सहनशीलता वाढते.

आपण अनेकदा इतरांना सहज माफ करतो; पण स्वतःच्या चुकांबाबत मात्र आपण स्वतःलाच कठोर शिक्षा देत राहतो. ‘‘मी असं का केलं?’’ किंवा ‘‘माझ्याकडूनच का चूक झाली?’’ असे प्रश्न मनात सतत घोळत राहतात आणि अपराधीपणा वाढतो. स्वतःला माफ करणं म्हणजे चूक योग्य ठरवणं नव्हे; तर त्या चुकीतून शिकून स्वतःला नव्याने उभं करण्याची संधी देणं होय. स्वतःशी दयाळू असणं हे मानसिक शांततेसाठी अत्यंत आवश्यक आहे.

राग, दुःख, सूड आणि पश्चात्ताप या भावना मनात सतत फिरत राहिल्या की ओव्हरथिंकिंग सुरू होतं आणि मन अस्थिर होतं. अशा वेळी क्षमाशक्ती हा त्या विचारांना दिलेला ब्रेक ठरतो. ज्या क्षणी आपण मनापासून म्हणतो, ‘‘जाऊ दे मी तुला माफ केलं,’’ त्या क्षणी आपण दुसऱ्याला नव्हे, तर स्वतःलाच त्या ओझ्यातून मुक्त करत असतो. जसं आपण रोज शरीर स्वच्छ ठेवतो, तसंच मनाची स्वच्छताही आवश्यक असते. मनात साचलेला राग, मत्सर आणि द्वेष हे आपल्यालाच आतून पोखरतात. राग धरून ठेवणं म्हणजे विष पिऊन दुसऱ्याच्या मृत्यूची अपेक्षा करणं होय; तर क्षमा म्हणजे त्या विषाचा त्याग करून मनाला निरामय बनवणं होय.

नात्यांच्या बाबतीतही क्षमाशक्ती अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. ज्या नात्यांमध्ये सतत ‘‘मी बरोबर तू चूक’’ असा हिशोब ठेवला जातो, ती नाती टिकत नाहीत; पण ज्या नात्यांमध्ये ‘‘चल, पुन्हा नव्याने सुरुवात करूया’’ असं म्हणण्याची तयारी असते, ती नाती अधिक घट्ट आणि सुंदर बनतात. क्षमेमुळे नात्यांमध्ये विश्वास वाढतो, संवाद सुधारतो आणि एकमेकांबद्दलचा आदर अधिक दृढ होतो. क्षमाशक्ती ही केवळ सामाजिक नात्यांसाठीच नव्हे, तर आत्मिक उन्नतीसाठीही अत्यंत आवश्यक आहे. क्षमेमुळे मन हलकं होतं, विचार सकारात्मक बनतात आणि व्यक्तिमत्त्वात एक वेगळंच सौंदर्य निर्माण होतं. अशा व्यक्तीभोवती आपोआप प्रेम, विश्वास आणि आदराचं वातावरण तयार होतं. क्षमा करणारा माणूस इतरांना नव्हे, तर स्वतःलाही मुक्त करतोहीच खरी आत्मिक प्रगती आहे.

म्हणूनच क्षमाशक्ती हा माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात सुंदर अलंकार आहे. ती नाती जपते, मन शांत करते आणि जीवनाला खरा अर्थ देते. म्हणून चुकांना धरून ठेवू नका, माणसांना धरून ठेवा. कारण शेवटी रागाने नाती तुटतात आणि क्षमेमुळे माणसं जोडली जातात.

**गटशिक्षणाधिकारी तथा समुपदेशक (विद्यार्थी, पालक, शिक्षक)** ●●

# एक ना धड भाराभर चिंध्या

**निलेश साठे**

एक ना धड भाराभर चिंध्या अशी आपल्याकडे एक म्हण आहे. सध्या अशीच अवस्था माझी झाली आहे. आणि मला माहित आहे अशी अवस्था माझ्याप्रमाणे इतरही बऱ्याच जणांची झाली असेल. एके ठिकाणी खाजगी क्षेत्रात नोकरी करायची. पगार पुरत नाही म्हणून पार्ट टाइम म्हणून दुसरं काहीतरी करायचं. तेही करत करत तिसरं आणखीन काय भेटतंय का याच्या शोधात राहायचं. मुंबईसारख्या शहरात नऊ तासाच्या नोकरीसाठी चार तासाचा प्रवास. झोपेचं खोबरं करून दुसरा कुठलातरी पार्ट टाइम जॉब करायचा.मिळेल त्या वेळेत मिळेल ते काम करून पैसा मिळवण्याचा हव्यास मग त्यात शरीराची पुरती काशी झाली तरी चालेल. एवढं करूनही मन मारून जगावं लागतं ते वेगळंच. मानसिक आत्मिक समाधान नाही. सुखाचा एखादा शिरकावा नाहीच पण जर कधी झालास तर फार थोड्या वेळासाठी. मग एवढी तळमळ तडफड का आणि कशासाठी. केवळ आणि केवळ जिवंत राहण्यासाठी जगण्यासाठी. आता माझंच बघा एका ठिकाणी जॉब करतो. मला पत्रकार म्हणून काम करायचं आहे. गीतकार म्हणून नाव रूपाला यायचं आहे. कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करायचं आहे. लेखक म्हणूनही नाव कमवायचे आहे. कधीतरी हिरोंचे आवाज काढण्याची उचकी येते. एवढं सगळं करायचं आहे.

वेळ तरी आहे का. शक्य आहे का. एक व्यक्ती एकाच वेळी इतकं सर्व नाही करू शकत. नियोजन पद्धतीने केलं तर ते शक्य आहे. काहींनी करून दाखवलेय. म्हणून कधीतरी मोटिवेशन वाटतं. पण ते अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आहेत. आणि ते सर्वांनाच जमेल असे नाही. खरे तर इतकी ओढाताण करण्याची गरज नाही. तुका म्हणे उगी रहावे जे जे होईल तेथे पाहावे. पण तेही शक्य नाही तुटपुंजा पगारामध्ये घरसंसार कसा चालवायचा आहे?त्यामुळे माणसाची इच्छा असो वा नसो नोकरी करत करत इतर क्षेत्रांमध्ये हात टाकावा लागत आहे.

परंतु जर पुढे जायचं असेल तर एकाच क्षेत्राला धरून वाटचाल करावी लागेल. कुठल्यातरी एका क्षेत्रात मास्टर बनाव लागेल. अभ्यास करावा लागेल वेळ द्यावा लागेल संयम बाळगावा लागेल. हे थोडं ते थोडं असं करून नाही चालणार. कळतंय पण वळत नाही. जग पुढे चालले आहे. जीवघेणी स्पर्धा त्यात आपण कुठेही मागे पडू नये अशी जवळजवळ प्रत्येकाची इच्छा असते.जशी माझी आहे.निव्वळ पगारावर घरसंसार चालवणे आणि पुढे जाणे हे एक दिवस स्वप्न आहे. हे प्रत्येक जण जाणून आहे. म्हणून माझ्यासह जवळपास सर्वांचा आटापिटा सुरू आहे. आणि त्यात आपल्याला कोणीही वाली नाही. मार्गदर्शक नाही. व्यवसायाचा आपला दुरान्वये संबंध नसतो. त्यामुळे आपला प्रश्न आपणच सोडवायचा आहे. म्हणूनच एके ठिकाणी नोकरी करत करत पैसे कमावण्याचा दुसरा काही पर्याय मिळतो का ते माझ्यासारखे अनेक तरुण शोधत असतात.

एखाद्या क्षेत्रात अपयश आलं तर दुसरं क्षेत्र निवडायचं. त्यात अपयश आलं तर तिसरं क्षेत्र निवडायचं. हे सारासार चुकीचं आहे. एकाच क्षेत्रात प्राण झोकून काम केलं तर यश लांब नाही . हे नाहीतर ते, ते नाहीतर ते असं करत राहिलो तर वरील म्हणी प्रमाणे आपली अवस्था होईल जशी आता माझी झाली आहे. एक ना धड भाराभर चिंध्या. पण तरीही मी प्रयत्न करत राहणार मग अवस्था कशीही झाली तरी चालेल. ●●

# भारत : माओवादी विस्मरण

६ मार्च २०२६ रोजी, ओडिशातील कटक जिल्ह्यातील मुंडाली येथे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ) च्या ५७ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी घोषणा केली की मार्च महिन्याच्या अखेरीस देश कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया-माओइस्ट (सीपीआय-माओइस्ट) पासून मुक्त होईल. त्यांनी म्हटले-

''आज मी देशाला आश्वासन देतो की, ३१ मार्चपर्यंत देश माओवादमुक्त होईल. तिरुपती ते पशुपतीपर्यंत लाल गलियारा निर्माण करण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना आमच्या सुरक्षा दल पराभूत करतील. आमच्या सुरक्षा दलांनी अपेक्षांची पूर्तता केली आहे आणि देश आता लाल बंडखोरांना संपवण्याच्या उंबरठ्यावर आहे.''

३ मार्च २०२६ रोजी, छत्तीसगढातील बस्तर विभागातील दंतेवाडा जिल्ह्यात, दंतेवाडा-बीजापूर सीमेवरील गीडम पोलीस स्टेशन क्षेत्रातील गुमलानार, गिरसापारा आणि नेलगोडा गावांमधील घनदाट जंगल आणि डोंगराळ भागात सुरक्षा दलांनी माओवाद्यांशी झालेल्या चकमकीत एक सशस्त्र सीपीआय-माओइस्ट कार्यकर्त्याला ठार मारले. मृत माओवादी भैरमगढ क्षेत्र समितीचा 'क्षेत्र समिती सदस्य (एसीएम)' राजेश पुनेम ओळखला गेला. त्याच्या डोक्यावर सरकारने ५ लाख रुपयांचे बक्षीस ठेवले होते. चकमकीनंतरच्या शोधमोहिमेत एक एसएलआर, एक इन्सास ॲसॉल्ट रायफल, एक पिस्तूल (मॅगझिनसह) आणि एक वॉकी-टॉकी यांसह महत्त्वपूर्ण शस्त्रास्त्रे आणि साहित्य जप्त करण्यात आले.

२६ फेब्रुवारी २०२६ रोजी, छत्तीसगढातील बीजापूर जिल्ह्यातील जंगल क्षेत्रातील इंद्रावती नदी किनाऱ्यावर सुरक्षा दलांच्या अँटी-नक्षल ऑपरेशनमध्ये भैरमगढ क्षेत्र समितीशी संबंधित दोन 'क्षेत्र समिती सदस्य' हिचामी मद्दा आणि म पोदियाम यांना ठार मारण्यात आले. प्रत्येकाच्या डोक्यावर ५ लाख रुपयांचे बक्षीस होते. सुरक्षा दलांनी एक एसएलआर, एक इन्सास रायफल, एक १२-बोर बंदूक, स्फोटके आणि इतर माओवादी साहित्य जप्त केले. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी, ओडिशातील कंधमाल जिल्ह्यातील दारिंगबाडी पोलीस क्षेत्रातील तराबडीच्या जंगलात सीपीआय-माओइस्टच्या केकेबीएन (कलाहांडी-कंधमाल-बौध-नयागड) डिव्हिजनचा 'डिव्हिजनल समिती सदस्य (डीव्हीसीएम)' अन्वेश याचा सडलेला मृतदेह आढळला. कंधमालचे पोलीस अधीक्षक हरिश बी.सी. यांनी सांगितले की, अन्वेशला त्याच्या सहकारी 'स्टेट समिती सदस्य' शुक्रूने शरणागती रोखण्यासाठी ठार मारले असावे. गुप्तचर माहितीनुसार, २२ लाख रुपयांचे बक्षीस असलेला अन्वेश सरकारच्या पुनर्वसन धोरणांतर्गत शरण येण्याच्या तयारीत होता. तपासकर्त्यांचा विश्वास आहे की ही हत्या इतर कार्यकर्त्यांना शस्त्रे खाली ठेवू नये यासाठी इशारा होती. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी, ओडिशातील कंधमाल जिल्ह्यातील गंजाम-कंधमाल सीमेवरील कराडा जंगलात सुरक्षा दलांच्या चकमकीत दोन सीपीआय-माओइस्ट कार्यकर्ते जागेश (एसीएम) आणि रश्मी (पार्टी सदस्य) ठार झाले. दोघांच्या डोक्यावर एकूण २७.५ लाख रुपयांचे बक्षीस होते. ते केकेबीएन डिव्हिजनशी संबंधित होते. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी, तेलंगणातील मुलुगू जिल्ह्यातील वेंकटापुरम मंडलातील कर्रे गुट्टालू जंगलात 'ऑपरेशन कागर-२' अंतर्गत सुरक्षा दलांच्या संयुक्त शोधमोहिमेत पाच सीपीआय-माओइस्ट कार्यकर्ते ठार झाले. सीआरपीएफ, कोब्रा, ग्रेहाऊंड्स आणि डीआरजीच्या सुमारे ५,००० जवानांनी भाग घेतला. मृतांची ओळख अद्याप अधिकृतपणे झालेली नाही, परंतु ते क्षेत्र समिती सदस्य असावेत असे संकेत आहेत.

दीपक कुमार नायक

**साउथ एशिया टेररिझम पोर्टल (एसएटीपी) च्या आकडेवारीनुसार**

- २०२६ मध्ये (२२ मार्चपर्यंत) सुरक्षा दलांनी कमान ६२ नक्षलवाद्यांना ठार मारले (२०२५ च्या याच कालावधीत १३३).
- २०२५ संपूर्ण वर्षात ३९० नक्षलवादी ठार, २०२४ मध्ये २९६, २०२३ मध्ये ५६.
- २०२५ मध्ये ४९१ नक्षलवाद्यांना अटक (२०२४ मध्ये ४३९). २०२६ मध्ये (२२ मार्चपर्यंत) १५ अटक.
- २००० मार्चपासून आतापर्यंत १७,२१७ नक्षलवाद्यांना अटक.
- शरणागती : २०२५ मध्ये २,१२८, २०२४ मध्ये ४७५, २०२६ मध्ये (२२ मार्चपर्यंत) ७१८. एकूण २०,०७३ शरणागती.
- शस्त्रे जप्ती: २०२५ मध्ये २४० घटना, २०२४ मध्ये २०५, २०२६ मध्ये (२२ मार्चपर्यंत) ६२ घटना.

२०२५ मध्ये एकूण ४७७ लोक ठार झाले (५४ नागरिक, ३३ सुरक्षा जवान, ३९० नक्षलवादी). २०२४ मध्ये ३९७, २०२३ मध्ये १४८. २०२६ मध्ये (२२ मार्चपर्यंत) ६५ ठार (२ नागरिक, १ सुरक्षा जवान, ६२ नक्षलवादी). नागरिक हत्येची संख्या २०२५ मध्ये ५४ होती, जी २००० नंतरची दुसरी सर्वात कमी संख्या आहे. सुरक्षा जवानांच्या हत्येत २०२५ मध्ये ३३ झाले, जी चौथी सर्वात कमी संख्या आहे.

२०२५ मध्ये सुरक्षा दल : माओवादी ठार प्रमाण १:११.८१ होते (२०२४ मध्ये १:१४.०९ सर्वोत्तम). २०२६ मध्ये आतापर्यंत १:६२.

२०२५ मध्ये माओवाद्यांनी ५ मोठ्या घटना (३ किंवा अधिक ठार) घडवल्या (२०२४ मध्ये २). ५३ आयईडी स्फोट घडवले (२०२४ मध्ये ४२). २०२६ मध्ये आतापर्यंत ९ स्फोट.

माओवादी कारवाया २०२५ मध्ये ८ राज्यांमध्ये मर्यादित राहिल्या (२०२४ मध्ये १० राज्ये). प्रभावित जिल्हे २७५ पैकी फक्त १ 'अत्यंत प्रभावित', ११ 'मध्यम प्रभावित' आणि १५ 'किंचित प्रभावित'.

४ फेब्रुवारी २०२६ रोजी केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी राज्यसभेत सांगितले की, २०१८ मधील १२६ प्रभावित जिल्ह्यांवरून २०२५ डिसेंबरपर्यंत फक्त ८ जिल्हे शिल्लक राहिले आहेत (छत्तीसगढ: बीजापूर, सुकमा, नारायणपूर; झारखंड: वेस्ट सिंहभूम; महाराष्ट्र: गडचिरोली; ओडिशा: कंधमाल, कलाहांडी, मलकानगिरी). यात फक्त ३ जिल्हे 'सर्वाधिक प्रभावित' आहेत. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सीपीआय-माओइस्टचे वरिष्ठ नेते थिप्परी तिरुपती उर्फ देवुजी (६०) आणि मल्ला राजी रेड्डी उर्फ संग्राम (७६) यांनी २१ इतर कार्यकर्त्यांसह तेलंगणातील कोमराम-भीम आसिफाबाद जिल्ह्यात शरण घेतले. हे माओवादी संघटनेच्या 'शेवटच्या खिळ्याचे' प्रतीक मानले जाते.

**इतर महत्त्वाच्या शरणागती :**

- १७ ऑक्टोबर २०२५ : छत्तीसगढातील जगदलपूर येथे २०९ कार्यकर्ते (११० महिला) शरण.
- १५ ऑक्टोबर २०२५ : महाराष्ट्रातील गडचिरोली येथे पोलिटब्युरो सदस्य मल्लोजुला वेणुगोपाल राव उर्फ अभय शरण.

२०२५ मध्ये माओवादी नेतृत्वाला मोठा धक्का बसला. नोव्हेंबर २०२५ मध्ये मधवी हिदमा आणि मे २०२५ मध्ये महासचिव नंबला केशव राव यांना ठार मारण्यात आले. सध्या २०१४ च्या पोलिटब्युरो आणि सेंट्रल कमिटी सदस्यांपैकी फक्त ५ सदस्य सुरक्षा दलांच्या जाळ्यातून सुटले आहेत. राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) माओवाद्यांविरुद्ध ५२ वेळा कारवाई केली. १८ मार्च २०२६ रोजी छत्तीसगढ एसआयएने 'अर्बन नेटवर्क'शी संबंधित ९ जणांविरुद्ध चार्जशीट दाखल केली. माओवाद्यांच्या सशस्त्र शाखा पीएलजीए (पीपल्स लिबरेशन गोरिला आर्मी) अस्तित्वात असल्याने चिंता कायम आहे. १४ मार्च २०२६ रोजी शरणागत नेते देवुजी यांनी पीएलजीए विघटन करून कायदेशीर मार्गाने काम करण्याची तयारी दर्शवली, परंतु त्यासाठी बंदी उठवण्याची मागणी केली. सप्टेंबर २००९ च्या शिखरावेळी २० राज्यांतील २२३ जिल्ह्यांत सक्रिय असलेला माओवादी संघटन आता अत्यंत कमकुवत झाला आहे.

**समारोप**

२०२५ हे भारतातील डाव्या विंग अतिरेक्यांविरुद्धच्या लढ्यात 'एकत्रीकरणाचे वर्ष' होते. सुरक्षा दलांच्या यशस्वी कारवाया, वाढती शरणागती आणि माओवादी प्रभावित क्षेत्रांचा संकुचित होत चाललेला भौगोलिक विस्तार याने हे दिसून येते. ३१ मार्च २०२६ च्या मुदतीनंतरही हिंसा पूर्णपणे संपवणे सोपे नसेल, परंतु एकूण रणनीतिक संतुलन राज्याच्या बाजूने झुकले आहे. भविष्यातील यशासाठी गुप्तचर-आधारित कारवाया, राज्य पोलीस दलांची क्षमता वाढवणे, आंतर-संस्थात्मक समन्वय आणि सामाजिक-आर्थिक चे निराकरण करणे आवश्यक आहे. माओवादी चळवळ मोठ्या प्रमाणात कमकुवत झाली असली तरी पूर्णपणे संपलेली नाही. तिची अवशिष्ट उपस्थिती हे स्मरण करून देते की प्रतिबंडक मोहीम केवळ लष्करी नव्हे, तर राज्य-निर्मिती, सामाजिक-आर्थिक आणि राजकीय परिवर्तनाची व्यापक प्रक्रिया आहे. ●●

# काचबिंदू जाणा, अंधत्व टाळा





गेल्या काही वर्षांतील विज्ञान आणि तंत्रज्ञानात झालेल्या वेगवान प्रगतीमुळे मानवी जीवनाची गुणवत्ता सुधारली आहे. वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे अनेक रोग आटोक्यात आले आहेत. सामान्यांपर्यंत हे औषधोपचार पोहोचल्याने सरासरी आयुर्मान वाढले आहे. वाढत्या वयोमानामुळे विविध आजारांची शक्यताही वाढते. यासंबंधीची जाणीव जनमानसात निर्माण करण्यासाठी, विविध दिनविशेष साजरे केले जातात. मार्च महिन्यात, ''जागतिक काचबिंदू जागरूकता कार्यक्रम'' आयोजित करण्यात येतो. संपूर्ण आठवडाभर काचबिंदूसंबंधीची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न केले जातात. व्याख्याने, चर्चासत्रे, नेत्रतपासणी या विविध मार्गांनी काचबिंदूसंबंधी जनजागरण केले जाते. विद्यासन एज्युकेशन फाउंडेशनतर्फे, आरसीएफच्या सहकार्याने, अलिबागला काचबिंदू जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन १४ मार्चला संध्याकाळी, पीएनपी नाट्यगृहात करण्यात आले होते. सुरुवातीला पनवेलमधील लक्ष्मी कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्रीच्या विद्यार्थ्यांनी काचबिंदूची माहिती देणारी लघुनाटिका सादर केली. नंतरच्या चर्चासत्रात अलिबागचे विविध नेत्रतज्ज्ञ आणि पनवेलच्या काचबिंदूतज्ज्ञ डॉ. संपदा चितळे यांनी काचबिंदूविषयीच्या विविध प्रश्नांना, सविस्तर उत्तरे दिली. या चर्चेचे कुशल समन्वयन ज्येष्ठ काचबिंदूतज्ज्ञ डॉ.रिटा धामणकर यांनी केले. नंतर काचबिंदूसाठी दीर्घकाळ उपचार घेणारे, प्रा.शाम जोगळेकर यांनी आपले अनुभव मांडले. शेवटी डॉ. राजीव धामणकर यांनी काचबिंदूविषयी, समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठीच्या प्रतिबद्धतेची उपस्थितांना शपथ दिली.

मुक्तांगण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

काचबिंदूविषयी जागरूकतेच्या अभावी संपूर्ण जगभर मोठ्या प्रमाणात अंधत्व येत आहे. जगातील विकसित आणि विकसनशील अशा सर्वच देशांमध्ये निम्म्या किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्येला काचबिंदूमुळे अंधत्व येते याची जाणीवच नाही. काचबिंदूमुळे अंधत्व आल्यास, नंतर त्यावर कोणताही इलाज होऊ शकत नाही, ही महत्त्वाची गोष्ट समजणे गरजेचे आहे. ग्लॉकोमा हा एक असा रोग आहे की, ज्यामध्ये डोळ्याचा आंतरिक दाब वाढल्यामुळे दृष्टी चेतातंतूवर (ऑप्टिकनर्व्ह) ताण येतो आणि त्यांची कार्यक्षमता घटते. दृष्टी चेतातूंचे झालेले नुकसान कधीही भरून येत नाही. यामुळेच काचबिंदूमुळे येणारे अंधत्व कायमस्वरूपी असते. डोळ्यांच्या मागील पोकळीत असणाऱ्या नेत्रजलामुळे डोळ्याला एक नियमित दाब प्राप्त होतो. त्यामुळे डोळ्यांचे कार्य सुव्यवस्थितपणे सुरू राहते. नेत्रजलाच्या मार्गात अडथळे आल्यास त्या द्रव्याचा दाब वाढत जातो आणि दृष्टी चेतातंतूंच्या कार्यावर विपरीत परिणाम होतो, यालाच काचबिंदू असे म्हणतात. ज्या व्यक्तींनी वयाची चाळीशी ओलांडली आहे, मधुमेह आणि रक्तदाब हे विकार असल्यास, दृष्टीमध्ये दोष असल्यास, डोळ्यांना दुखापत झाल्यास किंवा वारंवार स्टिरॉइड्स घ्यावी लागल्यास, ज्यांच्या कुटुंबात काचबिंदू झालेला आहे, अशांना काचबिंदू होण्याची शक्यता वाढते. काचबिंदू विकाराची सर्वसामान्यपणे कोणतीही लक्षणे जाणवत नसल्यामुळे, व्यक्ती या आजाराकडे दुर्लक्ष करते. परिणामी डोळ्यांचा सामान्य दाब जो १२ ते २१ एमएमएचजी एवढा असतो, तो वाढत जातो. सुरुवातीच्या काळात सभोवतालची दृष्टी अधू होत जाते, नंतर पूर्ण अंधत्व येऊ शकते. नेत्र तज्ज्ञांकडून नियमित तपासणी करून, त्यांनी दिलेल्या आयड्रॉप्समुळे डोळ्यांचा दाब नियंत्रणात ठेवता येतो. त्यामुळे त्या आजाराचे वेळीच निदान होणे गरजेचे असते. काचबिंदू पूर्णपणे कधीच बरा होत नाही. सुयोग्य उपचारांद्वारे नियंत्रणात ठेवता येतो. त्यासाठीची औषधे नियमितपणे आणि वेळेवर घेणे गरजेचे असते. पुरेशी काळजी सुरुवातीच्या अवस्थेतच घेतल्यास काचबिंदूचे होणारे दुष्परिणाम आणि येणारे अंधत्व टाळता येते. काचबिंदूचे भीषण दुष्परिणाम टाळण्यासाठी, सर्वांनी वर्षातून एकदा आपल्या डोळ्यांचे प्रेशर तपासून घ्यावे. तरच या सुंदर आणि लोभस जगाचे, दीर्घकाळ दर्शन घेण्याचा आनंद प्राप्त होईल.

माझ्या आईला काचबिंदू होता. त्यासाठी तिच्या एका डोळ्यावर १९७४ मध्ये रत्नागिरीला शस्त्रक्रिया झाली. त्यामुळे आम्हा भावंडांमध्ये जागरूकता निर्माण झाली. रत्नागिरीजवळ आईचे एक मोठे बंधू वृद्धापकाळे पूर्ण अंध झाले होते. नंतर त्यांचा मोठा मुलगाही! बहुधा त्यांना या आजाराची माहिती नसावी. वयाच्या ४३व्या वर्षी मला चष्मा लागला. नंतर काही वर्षांनी डोळा दुखत असल्याची जाणीव झाली. धामणकर कुटुंबीयांशी दीर्घकाळ जिव्हाळ्याचे संबंध असल्याने डॉ.रिटा यांची भेट घेतली. यांनी तपासणी केली आणि त्यांनी डोळ्यांचा दाब वाढल्याने आयड्रॉप्स सुरू केले. त्यानंतर दीर्घकाळ त्यांनी डोळ्यांची नियमितपणे तपासणी केल्याने आणि विनाखंड आयड्रॉप्स सुरू असल्यामुळे, डोळ्यांचा दाब नियंत्रणात होता.सुमारे २५ वर्षांनंतर माझ्या एका डोळ्यात मोतीबिंदू वाढू लागला. परिणामी त्यांच्या सल्ल्याने डाव्या डोळ्यावर १५ ऑगस्ट २०२४ रोजी पनवेलच्या लक्ष्मी आय इन्स्टिट्यूटमध्ये मोतीबिंदू आणि काचबिंदूवर, अनुक्रमे डॉ. सुहास हळदीपुरकर आणि डॉ. रिटा यांनी यशस्वी शस्त्रक्रिया केल्या. त्यानंतर १६ एप्रिल २०२५ रोजी, उजव्या डोळ्यावर तेथेच, या दोघांनी यशस्वी शस्त्रक्रिया केल्या. प्रत्येक शस्त्रक्रियेनंतर दहा ते बारा आठवडे, डोळ्यांमध्ये विविध प्रकारचे ड्रॉप्स सुरू होते आणि डोळ्यांचा व्यायामही. आता माझे डोळे उत्तम आहेत. कोणतेही ड्रॉप्स घालावे लागत नाहीत. दोन्ही डोळ्यांचे प्रेशरही नॉर्मल आहे. दर सहा महिन्यांनी डोळ्यांची तपासणी करण्याची मॅडमनी दिलेली सूचना मी अमलात आणणार आहे. काचबिंदू आणि मोतीबिंदू यावर वेळीच, यशस्वी शस्त्रक्रिया झाल्याने मला नव्याने 'दिव्यदृष्टी' प्राप्त झाली. या जाणिवेतूनच, कृतज्ञतेने ''काच बिंदू जाणा, अंधत्व टाळा'' हा अनुभवाधारित संदेश, नम्रपणे सर्वांना देऊ इच्छितो! ●●

# सोशल मीडिया आणि जनतेचा मेंदू...?



आजचा जमाना हा सोशल मीडियाचा आहे. कधीकाळी रेडिओ, टेलिव्हिजनने जनतेच्या केवळ ड्रॉईंगरुमचा ताबा घेतला होता. परंतु स्मार्टफोनच्या माध्यमातून सोशल मीडियाने जनतेच्या संपूर्ण मेंदूचा ताबा घेतला आहे. युजर घरात असो वा दारात, ऑफिसमध्ये किंवा प्रवासात, अगदी स्वच्छतागृहात बसूनही तो सोशल मीडिया हाताळत असतो. मनोरंजनाच्याही पलीकडे तो त्यातून आपली मते बनवत असतो. अत्यंत प्रभावी असलेल्या या सोशल मीडियाचा वापर जसा अजेंडे, नॅरेटिव्ह सेट करण्यासाठी होतो तसाच तो खोटे नेरेटिव्ह, फसवी माहिती खोडून काढत पडद्यामागचे सत्य लोकांपुढे आणण्यासाठीही केला जात आहे. इंडिपेंडेंट क्रिएटर्स, सोशल मीडिया एन्फ्लूएन्सर्सचा दबदबा सोशल मीडियात तयार झाला आहे. हा दबदबा मोडीत काढण्यासाठी आता केंद्र सरकार पावले उचलत आहे.


केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने आयटी नियम २०२१ मध्ये नुकताच बदलांचा नवीन मसुदा जारी केला आहे. या मसुद्यात अनेक नवीन आणि कठोर तरतुदी जोडण्यात आल्या आहेत. या तरतुदींच्या माध्यमातून केंद्र सरकार डिजिटल जगतातील कंटेंट क्रिएटर्स, एन्फ्लूएन्सर्सभोवती कारवाईचा फास आवळण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे या मसुद्याला सध्या जोरदार विरोध होत आहे. प्रसार माध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ मानले जाते. कधीकाळी सरकार आणि जनतेच्या मधला दुवा अशी माध्यमांची प्रतिमा होती. अँटी एस्टॅब्लिशमेंट किंवा सत्तेविरोधात भूमिका घेऊन प्रसारमाध्यमे कुठल्याही चुकीच्या धोरणा-निर्णयाविरोधात आवाज उठवून सरकारच्या डोळ्यात अंजन घालायचे. शोध पत्रकारितेची मोठी परंपरा भारतीय मीडियाला होती. परंतु मागच्या काही वर्षांमध्ये देशातल्या बहुतांश मुख्य प्रवाहातील प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडियातून केवळ सरकारच्या सोयीचा असाच कंटेंट दाखवण्याचा, पेरण्याचा प्रवाह रुळला आहे. सत्ताधाऱ्यांच्या विचारसरणीशी सुसंगत किंबहुना सरकारधार्जिण्या कंपन्यांनी देशातल्या मीडिया हाऊसेसमध्ये पसरलेले हातपाय हे यामागचे मुख्य कारण. त्यामुळे सरकारच्या हातचे बाहुले अशी समस्त भारतीय प्रसार माध्यमांची स्थिती झालेली आहे. कुठलीही वृत्तांकने किंवा डिबेट शोमध्ये याचा पुरेपूर प्रत्यय येतो. याउलट सरकारी निर्णय धोरणांना विरोध करणाऱ्या प्रसार माध्यमांना एकतर सरकारी जाहिरातींपासून मुकावे लागते किंवा त्यांच्यामागे कारवाईचा ससेमिरा लागलाच म्हणून समजा. मागच्या काही वर्षांमध्ये निष्पक्ष पत्रकारितेच्या नावाखाली मुख्य प्रवाहातील प्रसारमाध्यमांमधून बाहेर पडून अनेक पत्रकारांनी आपापले स्वतंत्र युट्यूब चॅनेल सुरू केलेत. त्यातून ते सरकारच्या चुकीच्या निर्णयांविरुद्ध आवाज उठवत असतात. पडद्यामागील सत्य लोकांसमोर आणत असतात, चुकीचे नॅरेटिव्ह खोडून काढत त्याची विश्लेषणात्मक चिरफाड करत असतात. त्याशिवाय असे अनेक कंटेंट क्रिएटर्स, सोशल मीडिया एन्फ्लूएन्सर्स आहेत जे आपापल्या पद्धतीने कधी व्यंगात्मक, कधी गंभीर मुद्दे उपस्थित करून जनतेचे प्रबोधन करतात. मात्र, यामुळे अडचणीत येणाऱ्या सरकारने अशा सगळ्यांना कायद्याच्या कचाट्यात अडकवण्याचा घाट घातला आहे. करणाऱ्या सोशल मीडिया कंपन्यांसाठी आहेत. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास मध्यस्थ म्हणजे असे प्लॅटफॉर्म जिथे एखादा कंटेंट क्रिएटर्स कंटेंट तयार करून पोस्ट करतो आणि तो कंटेंट युजर्सपर्यंत अर्थात लोकांपर्यंत पोहोचतो. व्हॉट्सॲप आणि टेलिग्रामसारखे मेसेजिंग ॲप्स, फेसबुक, इन्स्टाग्राम आणि एक्ससारखे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, गुगल आणि यूट्यूबसारखे सर्च आणि व्हिडिओ प्लॅटफॉर्म, ॲमेझॉन आणि फ्लिपकार्टसारखे ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म आणि नेटफ्लिक्स व प्राईमसारखे ओटीटी प्लॅटफॉर्म हे सर्व या श्रेणीत येतात. तुम्ही ऑनलाईन वापरत असलेल्या जवळपास प्रत्येक सोशल मीडियाला हा नियम लागू होईल. या मसुद्यातील तरतुदींमुळे कुठलाही सोशल मीडिया, टेक आणि डिजिटल प्लॅटफॉर्म यापुढे मनमानीपणे वागू शकणार नाहीत. त्यांना सरकारी निर्देश, मार्गदर्शक तत्त्वे, ॲडव्हायझरी पाळाव्याच लागतील. जर त्यांनी असे केले नाही, तर संबंधित डिजिटल मीडिया कंपन्यांना थेट जबाबदार धरले जाईल. या मसुद्यातल्या नियम ८वर सर्वाधिक आक्षेप आहे. याअंतर्गत आता बातम्या आणि चालू घडामोडींच्या कंटेंटची अधिक काटेकोरपणे तपासणी केली जाईल. हे नियम आता केवळ वृत्त प्रकाशकांपुरते मर्यादित राहणार नाहीत, तर सामान्य युजर्स जिथे ते असा मजकूर शेअर करतात त्या प्लॅटफॉर्मनाही लागू होतील. याचा अर्थ असा की, जर एखाद्या वापरकर्त्याने युट्युबवरील बातम्यांसंबंधीचा व्हिडिओ किंवा बातमी व्हॉट्सॲपवर फॉरवर्ड केली किंवा फेसबुकवर एखादी स्टोरी शेअर केली, तर तो प्लॅटफॉर्म कारवाईसाठी जबाबदार धरला जाईल.

शिवाजी चौगुले

सोशल मीडियावर मागच्या काही दिवसांपासून एक व्हिडिओ खूपच व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ पंतप्रधानांवर व्यंगात्मक टीका करणारा असल्याचे म्हटले जात आहे. या व्हिडिओत परदेशी राष्ट्रप्रमुखाला भेटून पंतप्रधानांची व्यक्तिरेखा साकारणारा केवळ हसताना दाखवलेला आहे. ही व्यंगात्मक टीका सरकारला झोंबल्यानंतर हा व्हिडिओ तात्काळ सोशल मीडियावरून काढून टाकत संबंधित अकाऊंट ब्लॉक करण्यात आले. तरीही विविध माध्यमातून हा व्हिडिओ व्हायरल झालाच. मागच्या काही दिवसांमध्ये हा व्हिडिओ सर्वाधिक व्ह्यूज मिळवणारा ठरला आहे. मध्यंतरी सरकारवर टीका करणारे असे बरेचसे युट्यूब चॅनेल व सोशल मीडियावरील अकाऊंट ब्लॉक करण्यात आले. सरकारसाठी अडचणीचे ठरणारे निष्पक्ष पत्रकार आता निशाण्यावर आहेत. म्हणूनच पुढचे पाऊल म्हणून हा कायद्यात बदल केला जात आहे. जेणेकरून मुख्य प्रवाहातील माध्यमांसोबतच सोशल मीडियाचीही मुस्कटदाबी करावी. निंदकाचे घर असावे शेजारी असे आपले संत महात्मे म्हणायचे. परंतु आजकाल सरकारवरील टीका म्हणजे देशावर केलेली टीका समजून त्याला देशद्रोही समजले जाते. १४ एप्रिलपर्यंत केंद्र सरकारने या मसुद्यावर सार्वजनिक सूचना, हरकती मागवल्या आहेत. मात्र, सोशल मीडियावरील या सेन्सॉरशीपला देशातून जोरदार विरोध होईल, असेच दिसते. ●●

# ...तर नद्यांचे अस्तित्व संपेल

**नदी ही केवळ पाण्याची धार नाही, तर जीवनाची वाहिनी आहे. हवामानबदलामुळे निर्माण झालेल्या संकटाने आपल्याला एक स्पष्ट संदेश दिला आहे, की आपण आजच ठोस पावले उचलली नाहीत, तर उद्या नद्यांचे अस्तित्व धोक्यात येईल. नद्या नसतील, तर मानवी सभ्यता टिकणेही अशक्य होईल. त्यामुळे नद्यांचे संरक्षण हे केवळ पर्यावरणीय कर्तव्य नसून, आपल्या अस्तित्वाशी निगडित असलेले अत्यावश्यक दायित्व आहे.**



नदी ही केवळ वाहणाऱ्या पाण्याची रेषा नसून संस्कृती, सभ्यता आणि जीवनाची अखंड वाहिनी आहे. मानवजातीचा इतिहास पाहता, प्रत्येक महान संस्कृती नदीकाठावरच फुलली आहे. नदीने केवळ तहान भागवली नाही, तर समाजाला आकार दिला, अर्थव्यवस्थेला बळ दिले आणि पर्यावरणाचा समतोल राखला. त्यामुळेच नद्यांचे महत्त्व केवळ भौगोलिक किंवा नैसर्गिक मर्यादेत न पाहता जीवनाच्या प्रत्येक अंगाशी जोडून पाहणे आवश्यक ठरते. नद्या पृथ्वीवरील गोड्या पाण्याचा सर्वात महत्त्वाचा स्रोत आहेत. पिण्याचे पाणी, शेतीसाठी सिंचन, उद्योगांसाठी आवश्यक पाणी आणि दैनंदिन जीवनातील असंख्य गरजा या सर्वांसाठी नद्या अत्यावश्यक आहेत. मानवाच्या शरीरात पाण्याचे महत्त्व जसे अनन्यसाधारण आहे, तसेच पृथ्वीच्या जीवनचक्रात नद्यांचे स्थान अपरिहार्य आहे. नद्यांशिवाय जीवनाची कल्पनाही करणे कठीण आहे. त्या जमिनीला सुपीक करतात, गाळ वाहून आणतात आणि शेतीला बळ देतात. त्यामुळे अन्नसुरक्षेच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. पर्यावरणाच्या दृष्टीने नद्यांचे योगदान व्यापक आहे. नद्या आणि त्यांच्याशी संबंधित आर्द्रभूमी ही जैवविविधतेची समृद्ध केंद्रे आहेत. असंख्य जलचर, वनस्पती, पक्षी आणि प्राणी यांचे जीवन नद्यांवर अवलंबून आहे. नदी म्हणजे एक सजीव परिसंस्था आहे, जी स्वतःचा समतोल राखत अनेक जीवसृष्टींना आश्रय देते. या परिसंस्थेचा समतोल बिघडल्याचे परिणाम केवळ त्या भागापुरते मर्यादित राहत नाहीत, तर संपूर्ण पर्यावरणावर दूरगामी परिणाम होतात. तथापि, आधुनिक विकासाच्या धावपळीत नद्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे.

मिलिंद बेंडाळे

आज विकास प्रकल्पांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर धरणे बांधली जात आहेत. नदीपात्रांचे रुंदीकरण, प्रवाह वळवणे आणि अतिक्रमण यांसारखे प्रकार वाढत आहेत. या प्रकल्पांमुळे जलविद्युत निर्मिती, सिंचन आणि पाणीपुरवठा यांसारख्या सुविधा नक्कीच उपलब्ध होतात; परंतु त्याचे दुष्परिणामही तितकेच गंभीर असतात. नदीचा नैसर्गिक प्रवाह खंडित होतो, गाळाचा प्रवाह थांबतो आणि नदीची परिसंस्था बाधित होते. अनेक जलचर प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर जातात. याशिवाय, मोठ्या धरणांमुळे हजारो लोकांचे विस्थापन होते. त्यांच्या उपजीविकेचे साधन हिरावले जाते आणि सामाजिक-आर्थिक असंतुलन निर्माण होते. विकासाचा लाभ काहींना मिळत असताना त्याची किंमत मात्र अनेकांना मोजावी लागते. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यामध्ये संतुलन राखणे ही काळाची गरज बनली आहे. नद्यांवर होणारा आणखी एक मोठा आघात म्हणजे प्रदूषण. औद्योगिक सांडपाणी, शहरी घाण, प्लास्टिक कचरा आणि रासायनिक द्रव्ये यामुळे नद्यांचे पाणी दिवसेंदिवस दूषित होत आहे. अनेक ठिकाणी नद्या जिवंत राहण्याऐवजी गटारासारख्या दिसू लागल्या आहेत. या प्रदूषणामुळे जलचरच नव्हे, तर मानवी आरोग्यावरही गंभीर परिणाम होत आहे. पाण्यातील विषारी घटकांमुळे विविध आजार वाढत आहेत आणि स्वच्छ पाण्याचा प्रश्न अधिक तीव्र होत आहे. हवामानबदलाने या समस्या अधिक तीव्र केल्या आहेत. अनियमित पाऊस, दुष्काळ आणि पूर यामुळे नद्यांचा स्वभाव बदलत आहे. काही नद्या उन्हाळ्यात आटतात, तर पावसाळ्यात प्रचंड पूर येतात.

हिमनद्या वितळल्यामुळे अनेक नद्यांच्या प्रवाहावर परिणाम होत आहे. या बदलांचा परिणाम शेती, पाणीपुरवठा आणि एकूणच मानवी जीवनावर होत आहे. या पार्श्वभूमीवर नद्यांचे संरक्षण ही केवळ पर्यावरणीय जबाबदारी राहिलेली नाही, तर मानवी अस्तित्वाची गरज बनली आहे. नद्यांचे संवर्धन करण्यासाठी एकात्मिक आणि दीर्घकालीन धोरणांची आवश्यकता आहे. पाण्याचा अपव्यय रोखणे, सांडपाण्याचे शुद्धीकरण, औद्योगिक प्रदूषणावर नियंत्रण, नदीकिनाऱ्यांचे संरक्षण आणि वृक्षारोपण यांसारख्या उपाययोजना प्रभावीपणे राबवणे गरजेचे आहे. यासोबतच लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. नदी ही केवळ शासनाची नाही, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. समाजाने आपल्या जीवनशैलीत बदल करून जलसंवर्धनाला प्राधान्य दिले पाहिजे. पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि स्थानिक स्तरावर पाण्याचे व्यवस्थापन या गोष्टींना चालना देणे आवश्यक आहे. एकूणच, नद्या या जीवनाच्या वाहिन्या आहेत. त्यांचे अस्तित्व टिकवणे म्हणजे आपल्या भविष्यासाठी सुरक्षित पायाभरणी करणे होय. विकासाच्या नावाखाली नद्यांचे शोषण करण्याऐवजी, त्यांच्याशी सुसंगत असा विकासाचा मार्ग स्वीकारणे हीच खरी शाश्वत प्रगती ठरेल. कारण नद्या वाचल्या, तरच जीवन वाचेल आणि जीवन वाचले, तरच भविष्यातील जग समृद्ध आणि संतुलित राहील. २०२६ साठी 'नद्यांचे रक्षण करा, लोकांचे रक्षण करा' ही थीम देण्यात आली असून नद्यांचे अस्तित्व सुरक्षित ठेवणे म्हणजेच मानवी जीवनाचे रक्षण करणे हा त्यामागील स्पष्ट संदेश आहे. नद्या या केवळ पाण्याचे स्रोत नसून मानवी जीवनाच्या सर्व अंगांशी निगडित असलेले महत्त्वाचे नैसर्गिक साधन आहेत. पिण्याच्या पाण्यापासून शेती, उद्योग, जैवविविधता आणि लाखो लोकांच्या उपजीविकेपर्यंत नद्यांचे योगदान अमूल्य आहे. पृथ्वीवरील जीवनाचा पाया म्हणून नद्यांकडे पाहिले जाते. त्या शेतीसाठी आवश्यक पाणी पुरवतात, अनेक जीवजंतूंचे निवासस्थान ठरतात आणि आर्थिक घडामोडींना गती देतात; मात्र आज जगातील अनेक नद्या गंभीर संकटाचा सामना करत आहेत. प्रदूषण, हवामानबदल आणि मोठ्या विकास प्रकल्पांच्या परिणामामुळे नद्यांचे नैसर्गिक स्वरूप बिघडत आहे. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय नदी कृती दिन लोकांना एकत्र येऊन नद्यांच्या संरक्षणासाठी ठोस पावले उचलण्याचे आवाहन करतो. हवामानबदल हा आजच्या काळातील सर्वात गंभीर जागतिक संकटांपैकी एक मानला जातो आणि त्याचे परिणाम पृथ्वीवरील प्रत्येक नैसर्गिक प्रणालीवर दिसून येत आहेत. या बदलांचा सर्वाधिक परिणाम अनुभवणाऱ्या घटकांमध्ये नद्यांचा समावेश अग्रक्रमाने करावा लागेल. नद्या या केवळ पाण्याचे स्रोत नसून त्या संपूर्ण जलचक्राचा आणि पर्यावरणीय संतुलनाचा कणा आहेत; मात्र वाढते तापमान, अनियमित पर्जन्य, हिमनद्यांचे वेगाने वितळणे आणि हवामानबदलातील घटनांची वाढती वारंवारता यामुळे नद्यांच्या अस्तित्वापुढेच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हिमालयासारख्या पर्वतरांगांमध्ये उगम पावणाऱ्या अनेक मोठ्या नद्या आज हवामान बदलाच्या थेट परिणामांना सामोऱ्या जात आहेत. हिमालय हा आशियातील प्रमुख जलस्रोत मानला जातो. कारण येथील हिमनद्या अनेक नद्यांना वर्षभर पाणी पुरवतात; परंतु वाढत्या तापमानामुळे या हिमनद्या झपाट्याने वितळत आहेत. गंगा नदीचा मुख्य उगम असलेली गंगोत्री हिमनदी गेल्या काही दशकांमध्ये मोठ्या प्रमाणात मागे सरकली आहे. सुरुवातीला यामुळे नद्यांमध्ये पाण्याचा प्रवाह वाढल्यासारखा वाटतो; परंतु दीर्घकालीन दृष्टीने पाहता ही प्रक्रिया धोकादायक आहे, कारण हिमनद्या संपल्यास नद्यांचा नैसर्गिक प्रवाह कायमस्वरूपी कमी होऊ शकतो. याचप्रमाणे ब्रह्मपुत्रा नदीच्या प्रवाहातही मोठे चढउतार दिसून येत आहेत. तिबेटमधील हिमनद्यांवर अवलंबून असलेली ही नदी कधी प्रचंड पूर तर कधी तीव्र पाणीकपात अशा टोकांच्या परिस्थितींना सामोरी जाते. यामुळे आसाम आणि ईशान्य भारतातील लाखो लोकांच्या जीवनावर परिणाम होत आहे. पूरस्थितीमुळे शेतीचे नुकसान, स्थलांतर आणि आर्थिक हानी होते, तर उन्हाळ्यातील पाण्याअभावी शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. हवामानबदलामुळे पर्जन्यपद्धतीत झालेला बदल हा नद्यांसाठी आणखी मोठा धोका आहे. पूर्वी संतुलित आणि नियमित असणारा मॉन्सून आता अत्यंत अनिश्चित झाला आहे. काही भागांमध्ये अल्पावधीत अतिवृष्टी होते, तर काही ठिकाणी दीर्घकाळ दुष्काळ पडतो. उदाहरणार्थ, गोदावरी आणि कृष्णा या दक्षिण भारतातील प्रमुख नद्या अनेकदा अनियमित पावसामुळे आटण्याच्या स्थितीत येतात. यामुळे शेतीवर गंभीर परिणाम होतो आणि जलसाठ्यांवर ताण वाढतो. ●●

# रामराज प्रीमिअर लीग स्पर्धेचा उत्साह

## || क्रीडांगणावर चौकार-षटकारांची आतषबाजी || चार संघ सुपर आठमध्ये दाखल

| रायगड | प्रतिनिधी |

**रामराज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच मोहन दत्तात्रेय धुमाळ पुरस्कृत रामराज विभाग प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धेच्या पहिल्या दिवशी तब्बल दहा सामान्यांचा खेळ झाला. या सामन्यांमधून चार संघ सुपर आठ फेरीसाठी पात्र ठरले. पहिल्या दिवशी धावीर क्रीडांगणावर झालेल्या सामन्यांमध्ये चौकार आणि षटकारांची आतषबाजी प्रेक्षकांना पहावयास मिळाली. एका सामन्यात खेळाडूंच्या अटीतटीच्या खेळामुळे सामना बरोबरीत सुटला आणि सुपर ओव्हरमध्ये जाऊन सामन्याचा निकाल लागला. एक सामन्यात महानवाडीतील खेळाडू अनिकेत चिखले याने धुरंधर खेळ करीत संघाला केवळ विजयच मिळवून दिला नाही तर आपल्या फटकेबाजीने हाफ सेंच्युरी करीत प्रेक्षकांच्या डोळ्यांची पारणे फेडले. दैनिक कृषीवल माध्यम प्रायोजक असणाऱ्या या स्पर्धेमध्ये ग्रामीण भागातील खेळाडूंचे वर्चस्व पाहायला मिळाले.**

पहिल्या दिवशी पहिल्या फेरीचे सामने खेळविण्यात आले. नीर ताजपुर आणि चिचाबादेवी राजेवाडी या संघांच्या सामान्याने प्रीमिअर लीगला शुभारंभ झाला. पहिल्या सामन्यात नीर ताजपुर संघाने चिचाबादेवी राजेवाडी संघाला पराभूत केले. त्यांनतर जयभवानी उमटे आणि निर्वी ११ सत्तेवाडी या संघांमध्ये सामना झाला. या सामन्यात जयभवानी उमटे संघ विजयी झाला. यानंतर ज्ञानी ११ नांगरवाडी आणि अनवी ११ रामराज कोळीवाडा या संघांमध्ये सामना झाला. या सामन्यात अनवी ११ रामराज कोळीवाडा संघाने बाजी मारली. महेश झावरे पुरस्कृत भिलजी आणि काश्मित ११ नांगरवाडी या संघांमध्ये सामना रंगला. हा सामना महेश झावरे पुरस्कृत भिलजी संघाने जिंकला.

दुसऱ्या फेरीतील पहिला सामना जय भवानी उमटे आणि नीर ११ ताजपूर यांच्यात झाला. या सामन्यांमध्ये नीर ११ ताजपूर संघ विजयी झाला. दुसरा सामना महेश झावरे पुरस्कृत भिलजी आणि अन्वी ११ रामराज कोळीवाडा यांच्यात रंगला. हा सामना अटीतटीचा झाला. या सामन्याचा निकाल शेवटच्या चेंडूपर्यंत गेला. शेवटच्या चेंडूवर खेळाडूला दोन धाव करायच्या होत्या. परंतु एकच धाव करण्यात खेळाडूला यश आल्याने हा सामना अनिर्णित राहिला आणि सामन्याचा निकाल सुपर ओव्हरमध्ये गेला. हा सामना अन्वी ११ रामराज कोळीवाडा संघाने जिंकला. तिसरा सामना निर्वी ११ सत्तेवाडी आणि चिंचबादेवी राजेवाडी या संघांमध्ये झाला. हा सामना चिंचबादेवी राजेवाडी या संघाने जिंकला या सामन्यात खरे लक्ष वेधले ते महानवाडी येथील खेळाडू अनिकेत चिखले याने. त्याने हा सामना संघाला जिंकून देताना त्याने वैयक्तीक ५० धाव करीत प्रेक्षकांचे लक्ष वेधले. चौथा सामान ज्ञानी ११ नांगरवाडी आणि काश्मित ११ नांगरवाडी या संघांमध्ये झाला. हा सामना ज्ञानी ११ नांगरवाडी संघाने जिंकला. पाचवा सामना चिंचबादेवी राजेवाडी आणि जय भवानी उमटे या संघांमध्ये खेळाला गेला. या सामन्यात चिंचबादेवी राजेवाडी संघ विजयी झाला. पहिल्या दिवसातील शेवटचा सामना महेश झावरे पुरस्कृत भिलजी आणि ज्ञानी ११ नांगरवाडी यांच्यात झाला. या अटीतटीच्या सामन्यात महेश झावरे पुरस्कृत भिलजी संघाने विजय मिळवला. पहिल्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर चार संघ सुपर आठयामध्ये पात्र ठरले त्यामध्ये नीर ११ ताजपूर , चिचबादेवी राजेवाडी, अन्वी ११ रामराज कोळीवाडा आणि महेश झावरे पुरस्कृत भिलजी हे चार संघ सुपर आठमध्ये पोहोचले आहेत.

- **पहिल्या दिवसातील लक्षवेधी क्षण**
- **सुपर ओव्हरने आणली रंगत**
- **चौकार-षटकारांची आतषबाजी**
- **अनिकेत चिखलेची हाफ सेंच्युरी**
- **चॅलेंजिंग ओव्हरचा अविस्मरणीय थरार**




## निवडक

### ज्येष्ठ नागरिकांसाठी क्रिकेट लीग

**मुंबई :** 'आयसी ग्राऊंड मॉर्निंग वॉकर्स ग्रुप'तर्फे ज्येष्ठ नागरिक आणि सकाळी चालण्यासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी सांताक्रूझ, वाकोला येथे 'आयसी ग्राऊंड मास्टर्स लीग-सीझन ४' ही विशेष टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. ज्येष्ठ नागरिकांच्या विविध चार संघांनी यात सहभाग घेतला. आयसी ग्राऊंड किंग्ज, टायटन्स, वॉरियर्स व लेजेण्ड्स असे या संघांची नावे होती. ज्येष्ठ खेळाडूंचा उत्साह वाढावा आणि आरोग्यदायी क्रीडा संस्कृतीला चालना मिळावी, यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील थरारक सामन्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये उत्साह निर्माण झाला होता.

### धारावीत कबड्डीचे आयोजन

**मुंबई :** धारावी प्रीमियर लीग-३ च्या यशस्वी आयोजनानंतर नवभारत मेगा डेव्हलपर्सच्यावतीने धारावीत आयोजित करण्यात आलेल्या 'कबड्डी लीग'लादेखील स्थानिक खेळाडूंचा उदंड प्रतिसाद लाभला. या स्पर्धेदरम्यान धारावीकरांना 'कबड्डीचा थरार' अनुभवता आला. कबड्डी लीगच्या पहिल्याच हंगामात धारावीतील एकूण १० संघ (८ पुरुष संघ, २ महिला संघ) स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेत एकूण ९६ पुरुष कबड्डीपटू आणि २४ महिला कबड्डीपटूंनी आपल्या क्रीडा नैपुण्यांचे प्रदर्शन करत प्रेक्षकांना खिळवून ठेवले. पुरुष गटातील अंतिम सामन्यात जेपीआर संघाने बाजी मारली, तर शिवाजी स्पोर्ट्स क्लबला उपविजेते पदावर समाधान मानावे लागले. महिला गटात शताब्दी स्पोर्ट्स क्लबने रंगतदार सामन्यात विजयश्री खेचून आणली. राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या अनुभवी खेळाडूंच्या सहभागाने धारावीतील कबड्डीच्या गुणवत्तेचे अनोखे प्रदर्शन या स्पर्धेत पाहायला मिळाले. विशेष म्हणजे, महिलांच्या सामन्यामध्ये दोन्ही संघांना समनसमान गुण मिळाल्याने एक्स्ट्रा टाइममधील खेळातून सामन्याचा विजेता ठरविण्यात आला. अशा आयोजनांमधून स्थानिक युवकांच्या आत्मविश्वासात भर पडते.

### कॅरम स्पर्धेत दिग्गजांची आगेकूच



**मुंबई :** संतोष मर्चड, शांतीलाल जातिया, गिरीधर भोज आणि योगेश केरकर यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यावर मात करत रोटरी क्लब ऑफ मुंबई पार्लेश्वर आयोजित व छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, जुहू यांच्या सहकार्याने सुरू झालेल्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत दमदार प्रवेश केला. मर्चड यांनी किरण बोबडेवर, जातिया यांनी नरेंद्र तरेवर, भोज यांनी विश्वनाथ शिवलकरवर तर केरकर यांनी शंकर सावर्डेकर विरुद्ध संघर्षपूर्ण विजय मिळवला. सुमारे ५०० खेळाडूंचा सहभाग असलेल्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेचे उद्घाटन रोटेरियन भालचंद्र बर्वे, अजित दुबे यांनी खेळलेल्या प्रतीकात्मक डावाने झाले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष अरविंद प्रभू, डॉ. हेमंत मोंडकर, महाराष्ट्र कॅरम संघटनेचे सचिव अरुण केदार आणि मुंबई उपनगर कॅरमचे कार्याध्यक्ष संतोष चव्हाण उपस्थित होते.

### नवोदित खेळाडूंना आर्थिक पाठबळ

**वसई :** वसई-विरार शहरात उदयोन्मुख खेळाडू, क्रीडा संघांना प्रोत्साहन देत क्रीडा संस्कृतीचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने शहर क्रीडा दत्तक योजना मिशन राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी अंदाजपत्रकात दोन कोटींची तरतूद प्रस्तावित आहे. मोबाईलच्या गराड्यात अडकलेल्या मुलांना मैदानी खेळांसह अन्य खेळांमध्ये नेपुण्य मिळवण्यासाठी वसई-विरार शहर महापालिकेने लक्ष केंद्रित केले आहे. याच अनुषंगाने शहरात क्रिकेट, बॉक्सिंग, कबड्डी, खो-खो, हॉकी, टेनिस, मॅरेथॉन, व्हॉलीबॉल, फुटबॉल, बॉक्सिंग, अथलेटिक्स, कुस्ती, रायफल शूटिंग खेळातील खेळाडूंना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी क्रीडा दत्तक योजना राबवली आहे.

## महिलांचीही टी-२० मुंबई लीग घोषणा

| मुंबई | प्रतिनिधी |

भारताचा तारांकित फलंदाज रोहित शर्माच्या उपस्थितीत मुंबई क्रिकेट असोसिएशनने (एमसीए) ऐतिहासिक घोषणा केली. एमसीएतर्फे यंदा प्रथमच महिलांच्या टी-२० मुंबई लीगचे आयोजन केले जाणार आहे. आयपीएल संपल्यानंतर जूनमध्ये वानखेडे स्टेडियमवर ही लीग रंगणार आहे. तसेच पुरुषांच्या चौथ्या टी-२० मुंबई लीगचे आयोजनही याच कालावधीत केले जाईल.

एमसीएतर्फे २०१८ पासून पुरुषांसाठी टी-२० मुंबई लीग आयोजित केली जायची. २ वर्षे उत्साहात पार पडल्यावर कोरोनामुळे काही वर्षे या लीगमध्ये खंड पडला होता. गेल्या वर्षी भारताचा माजी कर्णधार रोहितला या स्पर्धेचा चेहरा तसेच सदिच्छादूत म्हणून घोषित करण्यात आले होते. गतवर्षी सिद्धेश लाडच्या नेतृत्वात मराठा रॉयल्स संघाने या स्पर्धेचा तिसरा हंगाम जिंकला.

आता एकीकडे आयपीएल सुरू होण्याचे चाहत्यांना वेध लागलेले असतानाच त्यानंतर टी-२० मुंबई लीगचे पुरुषांचे चौथे पर्व जूनमध्ये रंगणार असल्याचे एमसीएने जाहीर केले. मुंबईतील ताज लँड्स येथे झालेल्या कार्यक्रमात याची घोषणा करण्यात आली.

पुरुषांच्या टी-२० मुंबई लीगमध्ये यावेळी देखील ८ संघ सहभागी असतील. तसेच तीन महिला संघांचा समावेश असलेल्या स्पर्धेचेही यावेळी प्रथमच आयोजन करण्यात येईल. महिला संघांची नावे काही कालावधीनंतर समजतील.

रोहितच्या उपस्थितीत दोन्ही स्पर्धांच्या चषकांचे अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमाला मुंबईची महिला खेळाडू तसेच भारताचे प्रतिनिधित्व करणारी सायली सतघरे, एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक, एमसीए माजी अध्यक्ष आशिष शेलार, लीग गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष राजदीप गुप्ता, एपेक्स कौन्सिल आणि लीग गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते. लवकरच स्पर्धेचे वेळापत्रक, तारखा व ठिकाण जाहीर करण्यात येईल.

> मुंबईचा क्रिकेटचा वारसा नेहमीच एका मजबूत तळागाळातील रचनेवर आणि खेळाडूंना स्वतः ला पुढे नेण्यासाठी आणि उच्च ध्येय ठेवण्यासाठी प्रोत्साहित करणाऱ्या संस्कृतीवर बांधला गेला आहे. टी-२० मुंबई लीग शहरातील प्रतिभावान क्रिकेटपटूंना त्यांच्या क्षमता दाखवण्यासाठी एक व्यावसायिक व्यासपीठ उपलब्ध करून देऊन त्या तत्वज्ञानाचे प्रतिबिंबित करते. टी-२० मुंबई महिला लीगची सुरुवात आमच्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. महिला क्रिकेट वेगाने वाढत आहे. -अजिंक्य नाईक
> एमसीएचे अध्यक्ष

## जलतरणात महाराष्ट्राची पदक पंचमी

**मुंबई :** पहिल्या खेलो इंडिया ट्रायबल स्पर्धेत महाराष्ट्राच्या जलतरणपटूंनी १ सुवर्ण, ३ रौप्य व १ कांस्य पदकांची लयलूट केली आहे. नागपूरच्या तन्वी धुर्वे ने महारााष्ट्राच्या सुवर्ण पदकाचे खाते उघडले. तन्वी पाठोपाठ पलाश ठाकुरने पदकांचा डबल धमाका करीत दिवस गाजवला आहे. ट्राइबल स्पर्धेच्या पहिल्याच पर्वात महाराष्ट्राचा जयजयकार दुमदुमला. तन्वी धुर्वेने १०० मी. बटरफ्लाय प्रकारात सुवर्ण ती १०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये रूपेरी यशाला गवसणी घातली. पलाश ठाकूरने १०० मी. ब्रेस्टस्ट्रोक व ५० मी. ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात रौप्य पदकाची कामगिरी केली. २०० मीटर फ्रीस्टाईल प्रकारात भक्तीश कुमारे कांस्य पदकाचे यश संपादन केले. खेलो इंडियातील कामगिरीबाबत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, क्रीडा आयुक्त शीतल तेली उगले व भाग्यश्री बिले यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

## वर्ल्ड कपचा 'लूटबॉल' सुरू

### तिकिटांच्या दरात प्रचंड वाढ

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



आगामी फुटबॉल वर्ल्ड कप हा मनी कप आहे का? असा संताप आता फुटबॉलप्रेमींच्या मनातून उफाळून बाहेर पडू लागला आहे. अजून वर्ल्ड कप सुरू व्हायला अडीच महिने आहेत, पण फिफाने आधीच तिकिटांच्या दरवाढीचा असा झटका दिलाय की, सामान्य चाहत्यांचे स्वप्नच धुळीस मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. ४८ संघाची नावे निश्चित होताच वर्ल्ड कपचा फुटबॉल नव्हे तर लूटबॉल सुरु केल्याची भावना उफाळू आली आहे.

वर्ल्ड कपचे ४८ संघ निश्चित होताच फिफाने फुटबॉलप्रेमींच्या खिशावरच डल्ला मारण्याची किक मारली. अंतिम सामन्यासाठी कमाल तिकीट दर तब्बल १०,९९० अमेरिकन डॉलरपर्यंत नेण्यात आला आहे. यापूर्वी जाहीर केलेल्या दरांच्या तुलनेत ही प्रचंड वाढ असून, आधी श्रेणी एकचे तिकीट ८,६८० डॉलर होते. याचाच अर्थ ७.२० लाखांची तिकीट त्यांनी आता ९.१३ लाखांच्या घरात नेली आहे. तब्बल दोन लाख रुपयांची वाढ झाली आहे.

न्यू जर्सीतील मेटलाइ स्टेडियम येथे १९ जुलैला होणाऱ्या अंतिम सामन्यासाठी श्रेणी दोनचे तिकिट ५,५७५ डॉलरवरून थेट ७,३८० डॉलरपर्यंत पोहोचले आहे. तर श्रेणी तीनचे तिकिट ४,१८५ डॉलरवरून तब्बल ५,७८५ डॉलरपर्यंत वाढले आहे. या दरवाढीमुळे सामान्य चाहत्यांसाठी हा महोत्सव पाहणे आता जवळपास अशक्यच बनत चालले आहे.

## काळभैरव भारजे ठरला अंतिम विजेता




| पाली /बेणसे | प्रतिनिधी |

सुधागड तालुका स्पोर्टस असोसिएशनच्या मान्यतेने स्वयंभू हनुमान रहिवासी मंडळ पुणे (चीवे सुधागड) यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय श्री बापूजी चषक कबड्डीचे आयोजन करण्यात आले होते.

अंतिम सामन्यात श्री काळभैरव संघ भारजे यांनी सोमजाई माता संघ गोमाशी यांच्यावर मात करून प्रथम क्रमांक पटकावला. सोमजाई माता संघ गोमाशी व्दितीय क्रमांक, उल्हास क्रीडा मंडळ अंबोले तृतीय क्रमांक, ओम काळभैरव आपटवणे चतुर्थ क्रमांक, सर्वोत्कृष्ट खेळाडू शुभम शिंदे सर्वोत्कृष्ट चढाई सुरज मगर, उत्कृष्ट पकड ऋतिक सावंत, पब्लिक हिरो रोशन बैकर ठरला.

## हॉकीपटू गुरजंत सिंग निवृत्त

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारताच्या पुरुष हॉकी संघातील आघाडीचा फॉरवर्ड खेळाडू गुरजंत सिंगने शुक्रवारी नवी दिल्ली येथे झालेल्या हॉकी इंडिया पुरस्कार सोहळ्यात आंतरराष्ट्रीय हॉकीमधून निवृत्तीची घोषणा केली. दोन ऑलिम्पिक पदकांचा मानकरी असलेल्या ३१ वर्षीय गुरजंतने भारतासाठी १३० सामन्यांत ३३ गोल नोंदवले. २६ जानेवारी १९९५ रोजी पंजाबमधील अमृतसरजवळील खैलारा येथे जन्मलेल्या गुरजंतला लहानपणापासूनच हॉकीची आवड होती. कठोर परिश्रमाच्या जोरावर त्याने या खेळात आपली वेगळी ओळख निर्माण केली.

## तलवारबाजीत अस्मिता,सान्वीची कमाल

| मुंबई | प्रतिनिधी |



मुंबईतील तलवारबाजी करणाऱ्या आणि इच्छुक असलेल्या तब्बल दोनशे खेळाडूंनी छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात अस्मिता तलवारबाजी स्पर्धेत आपली कमाल दाखवली. विविध गटांत सान्वी साळुंखे, किमया कमाल, रिद्धिमा सिंग आणि अनुजा लाड यांनी जोरदार खेळ करत सोनेरी यश संपादले.

शेकडो युवा खेळाडूंच्या सहभागाने रंगलेल्या या स्पर्धेत सुवर्णपदकांची अक्षरशः बरसात केली. १७८ खेळाडूंच्या सहभागाने रंगलेल्या या स्पर्धेत १२ वर्षांखालील गटात सानवी साळुंखे, बरीरा खान आणि कुणी शेट्टी यांनी सुवर्णपदक पटकावत वर्चस्व गाजवले. १४ वर्षांखालील गटात किमया कुणाल, समारा पेवेकर आणि सिया इंदाणी यांनी दमदार खेळ करत सुवर्णावर नाव कोरले.

१९ वर्षांखालील गटात रिद्धिमा सिंग, अनुष्का यादव आणि क्षेत्री प्रिशा यांनी अचूक वार करत सर्वोच्च स्थान पटकावले. वरिष्ठ गटात अनुजा लाड, हेदवी सावंत आणि संथा यादव यांनी अनुभव आणि कुशल्याच्या जोरावर सुवर्णपदके जिंकत आपली ताकद दाखवली.

या स्पर्धेचे उद्घाटन आ. कालिदास कोळंबकर यांच्या हस्ते झाले. तर जॉय निकाळजे, मंजिरी मराठे आणि भास्कर करकेरा आणि संघटक राहुल वाघमारे यांची उपस्थिती लाभली. मुंबई तलवारबाजी संघटना आणि सावरकर स्मारक यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या स्पर्धेमुळे नवोदित खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर झेप घेण्याची संधी मिळाली.

## राज्यस्तरीय वॉटर पोलो स्पर्धेत सुवर्णपदक | सामन्यात प्रभावी खेळाचे सादरीकरण

# नागोठणे स्कूलच्या देदीप्यमान विजय

| पाली /बेणसे | प्रतिनिधी |

रिलायन्स फाऊंडेशन स्कूल (मराठी माध्यम)नागोठाणे च्या विद्यार्थ्यांनी २०२५-२६ या वर्षातील राज्यस्तरीय वॉटर पोलो स्पर्धेत अप्रतिम कामगिरी करत सुवर्णपदक (प्रथम क्रमांक) पटकावत नावलौकिक संपादन केले आहे. ही स्पर्धा पुणे येथील बालेवाडी क्रीडा संकुलात पार पडली होती.

कठोर सराव, उत्कृष्ट संघभावना आणि जिद्दीच्या जोरावर संघाने संपूर्ण स्पर्धेत वर्चस्व राखत प्रत्येक सामन्यात प्रभावी खेळ सादर केला.

या स्पर्धेत संघाने केवळ विजय मिळवला नाही, तर उत्कृष्ट खेळशैली, संयम आणि चिकाटीचे दर्शन घडवले.



**सामन्यांचे निकाल**
- मुंबई विरुद्ध नागपूर - १६ : ३
- मुंबई विरुद्ध पुणे क्रीडा प्रबोधिनी - १७ : ६
- मुंबई विरुद्ध अमरावती - ४ : ३

**विजेता संघ**
वेद कुथे, मनन घासे, मयूष ठाकूर, श्रावण कुथे, श्लोक पाटील, आर्यन पाटील, सर्वेश पाटील, हर्ष दैंगडे, श्रावण इंद्रे, जय कोळी, प्रजोत शिर्के, हर्ष ठाकूर, कृतक लाडगे यांचा समावेश होता.

प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि खेळाडूंची मेहनत यामुळेच हे यश शक्य झाले आहे. या संघाला संघ प्रशिक्षक सुनील पवार, संघ व्यवस्थापक तेजस भैरवकर रिलायन्स फाऊंडेशन स्कूल नागोठणे यांचे मौलिक व परीक्षाभिमुख मार्गदर्शन लाभले. या अभूतपूर्व यशाबद्दल सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि शाळा व्यवस्थापनाचे सर्व स्थरातून अभिनंदन होत आहे.

## भारताला तिरंदाजीत कांस्यपदक

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आशिया चषक तिरंदाजी जागतिक क्रमवारी स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात भारतीय तिरंदाजांनी दमदार कामगिरी करत दोन कांस्यपदकांची कमाई केली. महिला कंपाऊंड संघाने मागील स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते. मात्र, यावेळी अंतिम फेरीत प्रवेश करून पदकाचा रंग उंचावण्याची संधी निर्माण केली आहे. उपांत्य फेरीत त्यांचा सामना तिसऱ्या मानांकित कझाकिस्तानशी होणार आहे. पुरुष कंपाऊंड गटाच्या पात्रता फेरीत अव्वल स्थान मिळवूनही भारतीय संघाला विजेतेपद राखण्यात अपयश आले आणि त्यांना कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)